# माणूस

शनिवार
२५ मे १९७४
एक रुपया





# भारताचा पहिला यशस्वी अणुस्फोट

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २५ मे | अंक : बावन्नावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# हा चिंतनीय स्फोट

प्रभाकर पाध्ये

भारताने अणु स्फोट केला ही गोष्ट प्रत्येक भारतीय राष्ट्रवाद्याला अभिमानास्पद वाटेल. आपले राष्ट्र आज अनेक संकटात सापडलेले आहे. हे संकट राजकीय आहे, आर्थिक आहे, आणि विशेष म्हणजे नैतिक आहे. आणि तरी या राष्ट्रात चैतन्य सळसळत आहे, जिवंतपणा आहे, ताकद आहे, पराक्रम आहे इत्यादी गोष्टींचा हा अणुस्फोट एक ज्वलंत पुरावा आहे. तेव्हा राष्ट्रवाद्यांचे अंतःकरण अभिमानाने आणि आश्वासनाने भरून जावे अशीच ही घटना आहे.

काँग्रेसवाल्यांना एक निराळाच आनंद वाटेल. त्यांच्या सरकारच्या डोक्यात ही एक नवीच रंगीत फीत शोभेल ! इंदिरा गांधींच्या कर्तृत्वाची ही एक नवी पताका असा पुकारा त्यांना करता येईल. मुख्य म्हणजे आज महागाई, भ्रष्टाचार वगैरे विरुद्ध जो प्रचंड असंतोष माजला आहे त्याचे थोडे विसर्जन करता येईल. लोकांचे लक्ष या नव्या विजय शिखराकडे खेचता येईल. कदाचित यासाठीच हा स्फोट आताच करण्यात आला असेल.

पण ही गोष्ट राजकीय शहाणपणाची झाली किंवा दूरदर्शीपणाची झाली का हा प्रश्न महत्त्वाचा वाटतो.

या अणुस्फोटाचे आव्हान सर्वप्रथम कोणाला जाणवेल ? पाकिस्तानला. हा स्फोट केवळ विधायक कार्यासाठी आहे यावर पाकिस्तान विश्वास ठेवणार नाही. म्हणजे पाकिस्तान देखील अणुस्फोटाच्या दिशेने पावले टाकील आणि तो करायला त्याला फार काल लागेल असे समजण्याचे कारण नाही. म्हणजे पाकिस्तानशी आपली ही एक नवीच स्पर्धा सुरू होईल.

ही स्पर्धा आपल्याला परवडणारी आहे का, हा प्रश्न आहे.

एक दाखला देतो. रशिया–अमेरिकेची अवकाश–अन्वेषणाची जी स्पर्धा सुरू झाली ती मुळात लष्करी स्पर्धाच होती. या स्पर्धेत प्रारंभी रशियाने अमेरिकेवर मात केली. अंतराळात प्रथम माणूस पाठविण्याचा मान सोव्हिएट रशियाला मिळाला. मग अमेरिकेने आपली शक्ती पणाला लावली आणि माणूस चंद्रावर उतरविला. आता अवकाशात स्थानके बांधण्याची, अंतराळाचा नवनवीन वेध घेण्याची भाषा क्वचित ऐकू येते, पण एवढे स्पष्ट झाले आहे की हे दोघेही समर्थ देश या प्रकरणी थकले आहेत. हे प्रकरण परवडणारे नाही हे दोघांनाही जाणवू लागले आहे.

आपण तर गरीबच आहोत. पण एकदा या स्पर्धेत उतरल्यावर आपल्याला थांबता येणार नाही. हा अणुस्फोट ही नुसती सुरुवात आहे. उद्या पाकिस्तान असा स्फोट करील. मग आपल्याला त्याहून मोठा स्फोट करणे भाग आहे. मग त्याहूनही मोठा पाकिस्तान करील. मग पुन्हा आपण. अशी ही सक्तीची सक्त स्पर्धा सुरू ठेवावीच लागेल. आणि ही गोष्ट आपल्याला, आपल्या अर्थव्यवस्थेला परवडणारी नाही.

चीनचा दाखला येथे निरुपयोगी आहे. चीन आपल्यासारखाच गरीब आहे, आणि तरीही तो अणुस्पर्धेत उतरला आहे. पण त्याची अर्थव्यवस्था समर्थ आहे–आणि ती समर्थ राखण्याची, श्रीमंती हव्यासापासून, चैनबाजीपासून, भ्रष्टाचारापासून सुरक्षित राखण्याची ताकद चिनी राज्यकर्त्यांपाशी आहे. मुख्य म्हणजे त्यांच्यापाशी ती दानत आहे, ते चारित्र्य आहे. ( माझी माहिती बरोबर असेल तर) चीन हे असे एकच राष्ट्र आहे की ज्याला परराष्ट्रीय कर्ज नाही, जेथे खाजगी मोटरगाड्या नाहीत, जेथे फॅशन परेड्स नाहीत, आणि जेथे जीवनाचे अमेरिकन हव्यास नाहीत. या अशा राष्ट्राशी स्पर्धा करणे आपल्याला परवडणारे नाही.

राष्ट्राची खरी शक्ती लष्करी लवाजम्यात नसते तर आर्थिक नाड्यात असते. आपल्या आर्थिक नाड्या ठीक काम देत नाहीत. आपल्या उद्याच्या अर्थव्यवस्थेला आणि जीवनाला आजच्या अणुस्फोटाने सूचित होणारी संभाव्य स्पर्धा–अक्षरशः जीवघेणी स्पर्धा – मुळीच परवडणारी नाही. कारण मुख्यतः तिची उभारणी ज्या राष्ट्रीय चारित्र्यावर, राष्ट्रीय शिस्तीवर, राष्ट्रीय त्यागावर व्हायला पाहिजे ते चारित्र्य, ती शिस्त, तो त्याग आपल्या राष्ट्रापाशी नाही. या चारित्र्याची-त्यागाची-शिस्तीची आपल्या राज्यकर्त्यांना पर्वा दिसत नाही. तिच्या अभावाचा सत्तासंपादनासाठी आणि सत्तास्थापनेसाठी उपयोग करण्याची विद्या त्यांनी झकास पैदा केली आहे. ही जादूची कांडी फिरवीतच ते सत्तेची अस्त्रे फेकीत असतात.

म्हणूनच भावी पिढ्यांच्या दृष्टीने हा स्पर्धेच्या नव्या पायऱ्या चढणारा हा प्रयोग धोकेबाज ठरण्याचा संभव आहे अशी भीती मला वाटते. अर्थात पाकिस्तानने त्याचा प्रारंभ केला असता तर इलाज नव्हता. पण तसा संभव क्षितिजावर दिसत नव्हता. आपणच याची सुरुवात केली आहे आणि ती करताना, आपल्या राज्यकर्त्यांच्या डोक्यात जे हिशेब होते त्यात भारताच्या भावी पिढ्यांच्या सुस्थिर जीवनाचा हिशेब होता असे वाटत नाही.

आपले राज्यकर्ते भावी पिढ्यांची काळजी करीत नाहीत असे कोण म्हणेल ? आजच्या एकच नव्हे तर भावी सात पिढ्यांची सोय करून ठेवण्यासाठी ते धडपडत असतात. त्यांचे उखळ पांढरे होईल अशी व्यवस्था ते करीत असतात. (याला एकादाच अपवाद.) पण त्या पिढ्या त्यांच्या स्वतःच्या असतात. त्यांच्या आर्थिक–राजकीय चौकटीबाहेर असलेल्या जनतेच्या भावी पिढ्यांचा विचार करण्यास त्यांना फुरसत नसते. त्यांच्या हिशेबात ते बसत नाही. या जनतेच्या दृष्टीने हा प्रयोग परवडेल काय, हा प्रश्न आहे.

पंडित नेहरूंनी अशा अणुस्फोटास सतत विरोध केला होता. अर्थव्यवस्थेपेक्षा शांततेचाच वेध त्यांना अधिक लागला होता. असेल–पण त्यांचा निर्णय आपल्या राष्ट्रीय शक्तीशी सुसंगत होता. वडिलांचे अनेक संकेत इंदिराजींनी मोडले, त्यातला हा एक – आणि त्याबद्दल पुनः एकवार त्यांचा प्रचंड गौरव होईल.

त्यांनी वडिलांचा निराळाच संकेत मोडावा अशी काहींची इच्छा आहे. तो म्हणजे भ्रष्टाचारी सहकाऱ्यांना पाठीशी घालण्याचा. पण तो मोडण्यास त्यांचा सक्त विरोध दिसतो. आजच्या राष्ट्रीय दुरवस्थेचे हे एक जबरदस्त कारण आहे. जयप्रकाशांना यासाठीच आजच्या त्यांच्या आजारी अवस्थेत खडे व्हावे लागले आहे. त्यांच्या सारख्यांना उत्तर देण्यास हा नेत्रदीपक बनाव उपयोगी पडेल, एवढे मात्र नक्की. □

# अर्थव्यवस्था कोलमडूद्याच !

माहितगार

कधी कधी वाईटातूनही चांगले घडते. पण त्यासाठी प्रथम वाईट घडावे लागते ! रेल्वे संपामुळे अर्थव्यवस्था कोलमडेल असे वारंवार सांगण्यात येत होते. आजची आर्थिक परिस्थिती का निर्माण झाली आणि ती बदलण्याचे मार्ग आहेत की नाही ? असा विचार आर्थिक परिस्थिती कोलमडणार असे सांगण्यात येते तेव्हा मनात येतो. अशा परिस्थितीत काही गोष्टींचा नव्याने विचार केला पाहिजे. तो केला तरच देशाचे भवितव्य उज्वल घडू शकेल. अन्यथा वादळात सापडलेले तारू जसे भरकटत जाते तसे होईल. स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षं झाली पण देशाच्या विकासाची वाटचाल दिशाहीन चालली आहे. नियोजनाचे फायदे सामान्य माणसापर्यंत पोचत नाहीत. त्यामुळे सामान्य माणसाला नियोजनात रस नाही. तो त्यात सहभागी होत नाही. विकास काही क्षेत्रात झाला. त्याचे फायदे ठराविक लोकांना मिळत आहेत. ७५ घराण्यांचा पैसा पुराच्या पाण्यासारखा, एकसारखा वाढतच आहे. पंचवीस वर्षं सतत एका पक्षाचे स्थिर सरकार असताना देशाची ही अवस्था आहे. दिवसेदिवस अर्थव्यवस्था मोडीत निघत आहे. परकीय आक्रमणे, नैसर्गिक आपत्ती यामुळे ही अवस्था झाली आहे असे सरकारने खुशाल सांगावे; पण देश म्हटला की या आपत्ती जमेस धरल्याच पाहिजेत !

आक्रमणे व आपत्ती यामुळेच आजची परिस्थिती निर्माण झाली हे तेवढे खरे नाही. अर्धवट धोरणे, दूरदृष्टीचा अभाव, गलिच्छ राजकारण यामुळेच प्रामुख्याने आजची अवस्था निर्माण झाली आहे. किंमती भरमसाठ वाढत आहेत. सामान्य माणसाला जगणे कठीण होत आहे. किंमत वाढीमुळे वेतनवाढ, बोनस यांची मागणी जोर धरीत आहे. वेतनवाढ, बोनस यातून पुन: किंमतवाढ असे दुष्टचक्र फिरत आहे. किंमती वाढत आहेत. त्या थोपवण्यासाठी कामगार, चळवळ, मागणी वा आंदोलन करीत नाही. तर किंमती वाढत असल्याने वेतनवाढीची मागणी केली जाते. सरकारही किंमतवाढ रोखण्याचे उपाय योजीत नाही. तर थातूर-मातूर करून काही रुपड्या लोकांच्या तोंडावर फेकते. वेतनवाढीमुळे महागाईचा भस्मासूर रोखता येणार नाही. आपले राजकारण खेळण्यासाठी सत्तारूढ पक्ष भांडवलदारांकडून पैसा घेत असतो. त्यामुळे त्याला भांडवलदारवर्गाचे हितही सांभाळावयाचे असते. त्यामुळे महागाई रोखण्याचे सामर्थ्य सरकारजवळ राहिलेलं नाही. महागाईचे दुष्टचक्र फिरतच आहे. सरकारने ठाम पावले उचलल्याशिवाय ते थांबणार नाही. निवडणुकीसाठी व आपल्या राजकारणासाठी सत्तारूढ पक्ष मोठ्या प्रमाणावर भांडवलदारांकडून पैसा घेत असल्याने हे सरकार त्यांच्या हिताची काळजी घेते. परिणामी महागाईचे चक्र थांबत नाही. आजची अवस्था पाहिली की हे चक्र त्याची गती संपल्यावर थांबणार असे वाटू लागते ! त्याची गती अर्थव्यवस्था कोलमडेल तेव्हाच थांबणार आहे. अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडून अराजक माजण्याची वेळ येईल तेव्हा जगण्याचा प्रश्न उभा राहील. वैयक्तिक वा पक्षाचे स्वार्थ बाजूला ठेवावे लागतील आणि परिस्थितीवर मात करण्याची आवश्यकता निर्माण होईल समजा, राजकारणी, अर्थकारणी लोक परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी स्वतःहून एकत्र आले नाहीत तर जनतेच्या संतापाचा रेटा एवढा जबरदस्त असेल की त्या रेटयामुळे त्यांना एकत्र यावे लागेल. विचार करावा लागेल ! हा विचार जेव्हा केला जाईल तेव्हा गेल्या पंचवीस वर्षांच्या धोरणांचा आढावा घेऊन झालेल्या चुका दुरूस्त कराव्या लागतील. महागाई झाली म्हणून वेतनवाढ मागण्यात आली. अपुरा पुरवठा, कृत्रिम टंचाई, वाटप व्यवस्था व जीवनावश्यक वस्तूचे उत्पादन सरकारकडे नसल्याने किंमतवाढ, किंमतवाढीनंतरची वेतनवाढ व या वेतनवाढीच्या कितीतरी अधिक प्रमाणात किंमतवाढ करून नफे उकळणारे उद्योगपती ही आजच्या परिस्थितीची कारणे आहेत. शेतीत घातलेला पैसा निघत नाही म्हणून लहान शेतकरी, शेतीवर राहण्यापेक्षा दुसऱ्या मार्गाच्या शोधात असतो. त्यावेळी त्याला बँका, खासगी उद्योगातील चतुर्थश्रेणी, तृतीयश्रेणीच्या कर्मचाऱ्यांच्या नोकरीचे आकर्षण दिसू लागते. या कर्मचाऱ्यांना ३०० रुपयापर्यंत मिळणारा पगार, भविष्य निर्वाह निधी, रजा, नोकरीची शाश्वती, बोनस मिळतो. शेतकऱ्याला यातील काहीही फायदे मिळत नाहीत. लहान शेतकरी व शेतमजूर यांना वर्षभर राबूनही हे फायदे मिळत नाहीत तेव्हा तो शेतीवर राबण्याऐवजी अशा नोकऱ्यांच्या मागे लागतो. त्यामुळे शेतीवरचा माणूस कमी होत आहे. शेती त्याला परवडत नाही. त्याचे परिणाम उत्पादनावर होतात. अपुऱ्या उत्पादनामुळे शेतमालाच्या किंमती वाढत असतात. हा पैसा शेतकऱ्याच्या खिशात जात नाही. शेतकऱ्याला पैशांची तावडतोब गरज असल्याने तो मिळेल त्या भावात व्यापाऱ्याला माल विकतो. व्यापारी भाव पाडून खरेदी करतो व दामदुप्पट भावात तो विकतो. शेतमालाच्या किंमती वाढल्याने, वाढत्या महागाईने मजूरांचे वेतन वाढल्याने पक्क्या मालाच्या उत्पादनाचा खर्च वाढतो. उत्पादन खर्च वाढत असल्याचे निमित्त करून कारखानदार पक्क्या मालाच्या किंमतीत वाढ करतो. जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन व वाटप सरकारच्या हातात नसल्याने किंमती स्थिर करण्याचे सामर्थ्य सरकारजवळ नाही. किंमती स्थिर ठेवण्यासाठी शेतकरी शेतावर राहील, त्याला शेती परवडेल असे पाहिले पाहिजे.

पृष्ठ ३० वर

## मुक्काम मुंबई

# रेल्वे संप : दोन अनुभव

प्रत्येक देशाचे स्वतःच असे काही तरी वैशिष्टय असते. स्वतःचे म्हणजे अगदीच स्वतःचे. म्हणजे असे की, जपान हा उगवत्या सूर्याचा देश. जर्मनी हा शिस्तीचा देश. डेन्मार्क दूध दुभत्याचा तर इजिप्त पिरॅमिडस्चा देश. तर या परंपरेप्रमाणेच भारताचेही काही खास वैशिष्टय आहे. आता भारतात तशी अनेक वैशिष्टये आहेत. तरीपण अगदी खास भारताचे असे वैशिष्टय सांगायचे म्हणजे भारत हा संपांचा देश असे म्हणता येईल. गेल्या दहा वर्षातले कुठल्याही दिवशीचे वर्तमान पत्र उघडा. संपाची, आंदोलनाची, मोर्चाची एकही बातमी नाही असे पत्र काय, त्या पत्राचे एक जरी पान दाखवून दिलेत तरी आपण लेखणी खाली ठेवायला तयार आहोत. असो.

तर हे पुराण सांगायचे कारण सध्या देशात एक हलचल माजून राहिली आहे. तमाम जनता हवालदिल झाली आहे. याला कारण काय ? तर रेल्वे कामगारांचा संप. कदाचित हा लेख छापून येई-पर्यंत हा संप मिटलाही असेल. रेल्वेचे सर्व कर्मचारी आपापल्या ऑफिसाच्या पायऱ्या मानाने चढतही असतील. पण तरीही गेल्या आठ-नऊ दिवसात या देशाने आणि विशेषतः या मुंबईने जे काही अनुभवलेय ते काही विलक्षणच. रेल्वे गाडयांच्या वजनाने सतत दबून राहिलेले रूळ जेव्हा सुस्त पडलेले पाहिले तेव्हा आम्ही धन्य झालो. नेहमी दहाच्या ठोक्याला ऑफिसात पाऊल ठेवणारे कामसू कर्मचारी अकरा वाजेपर्यंत वांद्रयाला बसच्या क्यूमध्ये ताटकळताना दिसले तेव्हा आम्ही गहिवरलो. बेल बॉटम आणि पंजाबी ड्रेसवाल्या सुकान्त चंद्राननां जेव्हा भर उन्हात उघडया टेंपोतून जाताना आमच्या नजरेस पडल्या तेव्हा आमच्या काळजाचे पाणी पाणी झालं. ठाण्याहून लोकांना घेऊन येणाऱ्या ट्रकशी टक्कर झाल्याची बातमी कळताच आमच्या छातीत धस्स झाले. तर असे या संपामुळे आम्हाला बरेच काही झाले आणि बरेच काही वाटले. ते सारे इथ सांगणे केवळ जागेअभावी शक्य नाही. तर संपातल्या काही घटना ज्या आम्ही पाहिल्या, अनुभवल्या त्या सांगतो.

दिनांक ९ मे संपाचा दुसरा दिवस. स्थळ. मध्य रेल्वेचे बोरीबंदर स्टेशन. वेळ संध्याकाळची. रेल्वे स्टेशन शुष्क झालेले. रोज धडाधड धावणाऱ्या गाडया शांत झोपलेल्या. आम्ही रेल्वे स्टेशनवर प्रवेश करते झालो आणि आपण कुठल्या परीनगरीत वगैरे आलो की काय असे वाटायला लागले. बोरीबंदरसारख्या स्टेशनवर संध्याकाळच्या-वेळी चालायला फक्त जागाच नव्हे तर ऐसपैस रस्ता मिळाला. आम्ही उगाच इकडे तिकडे हुंदडून घेतले. नंतर लक्षात आले की, काही डोळे आमच्यावरच रोखले गेलेत. ड्रेसातले आणि बिना ड्रेसातले सखारामबापू आमच्याकडे 'कोण हे महाभाग ?' अशा स्टायलीत पहात होते. पण आमचा चेहरा जात्याच इतका भोळसट आणि निरुपद्रवी की, काही सेकंदातच आम्ही फक्त प्रवासीच आहोत अशी त्यांची खात्री पटली असावी. असो.

तर इतक्यात स्टेशनवरचा अनौन्सर बोंबलू लागला. 'संध्याकाळी ठीक पाच वाजता बोरीबंदर रेल्वे स्टेशनवरून कुर्ल्याकडे जाणारी लोकल सुटेल. ही गाडी वाटेतल्या सर्व स्टेशनावर थांबेल. अनौंसर एकाच लकबीत ही घोषणा हिंदी आणि इंग्रजीतही करीत होता. जवळ जवळ पंधरा मिनिटे ही बोंबाबोब झाल्यानंतर त्याचा घसा बसला असावा किंवा माईक फुटला असावा पण ती कटकट बंद झाली. पावणे पाच वाजून गेले. स्टेशनवरचा एक इंडिकेटर चालू झाला. बंद पडलेल्या सिग्नलसपैकी एकाने डोळे मिचकावले. प्लॅट-फॉर्मवर इतस्ततः पेंगलेले रेल्वेचे इमानदार पोलीस चड्डया झटकत उठले. एकूण स्टेशनात थोडासा प्राण आला.

आम्ही उगाचच जी गाडी सुटणार होती, त्या गाडीची पाहणी केली. प्रत्येक डब्यात डोकावलो. अगदी लेडीज आणि भाजीवाल्याच्या डब्यात सुद्धा. पण कुठे औषधाला सुद्धा माणूस नव्हता. इतक्यात प्रत्येक डब्यात दोनतीन माणसे चढली. त्यांच्या कपडयावरून ते स्टेशनवरचे बूटपॉलीशवाले आणि हमाल होते हे शेंबडं पोरही ओळखू शकले असते. साहजिकच आम्ही सुद्धा त्यांना ओळखले. त्यांच्या मागून एक गणवेशातला माणूस, बहुतेक तो गार्ड असावा, फिरत होता. तो महामानव अस्मादिकांपाशी आला.

क्यों, यहाँ क्या कर रहे हो ? प्रश्न
काही नाही, सहज फिरतोय–उत्तर
कुर्ला तक आयेंगे ? श्री. गार्ड
नको. तिथे कशाला ? आमचे भोळसट उत्तर
'फिर बोरीबंदर गाडी आयेगी'
'मला दादरला सोडाल ?' आमचा प्रश्न.
हाँ ! हाँ ! !
'माझ्याजवळ तिकिट नाही. पासही नाही.'
'उससे क्या बिगडता है ? चलो.'

गणवेशातला माणूस इतक्या अदबीने वागण्याचा हा आमचा पहिलाच अनुभव. अस्मादिक डब्यात बसले. फर्स्टक्लासच्या. पहि-ल्यांदा अंग चोरून आणि नंतर ऐसपैस. गाडी हलली. फर्स्टक्लास-


पृष्ठ २९ वर


विदर्भ साहित्य संघातला गैरव्यवहार पाहून, वाचून संघाची 'ग्रेस' गेली.
डिस'ग्रेस' FOOL!
छ्याः! छ्याः!! अतिशय ग्रेस


"रल्वे संपामुळे येऊ शकलो नाही, पण पुढे तुमचे कधी तरी लग्न झाले तर अवश्य येऊ!"


हवं तर आणखी एखादं मत देऊ पण रेल्वे चालवायला जमणार नाही.

संप, मारामाऱ्या, महागाई, टंचाई, जाळपोळ, बंद, लुटालूट इत्यादींवर मात करण्याच्या हेतूने मानवी शरिरात मूलभूत बदल केले तरच तरणोपाय आहे. काही सोप्या शस्त्रक्रिया सुचवताना आम्हास आनंद होत आहे.








राइसप्लेट बरोबर
चमच्याप्रमाणे
देता येईल.


मारामाऱ्या, लुटालूटीवर मात!



चौफेर
चष्मे



कोणत्या दुकानात
काय आलय हे
कळण्यासाठी लागणारी
चौफेर नजर


एस.टी., टॅक्सी, रेल्वे संपावर मात. त्यामुळे बूट कंपन्यांना चाके बनवावी लागतील!
अन्नटंचाईवर तोडगा!
काळी कृत्ये दिसू नयेत, वाईट गोष्टी ऐकू येऊ नयेत, हालचालीचा त्रास होऊ नये अशी व्यवस्था 'शेवटच्या' शस्त्रक्रियेत आहे!

# सोलकढी

## □ दोन कवींची कुस्ती : २

महाराष्ट्रातल्या प्रत्येक मराठी माणसाला मत असते. म्हणजे ते निवडणुकीतले मत नाही हो, 'माझे असे मत आहे की—' किंवा 'माझ्या मते' यातले 'मत'. ते नेहमीच स्वच्छ, ठाम, निश्चित असते. काहीजणांना तर, एकाच विषयाबद्दल, एकाच वेळी, दोन परस्परविरुद्ध मते असतात, आणि ती दोन्ही स्वच्छ, ठाम, निश्चित असतात शिवाय आपले मत आपल्यापाशी ठेवण्याऐवजी ते दुसऱ्याला पटवण्याचा एक घरंदाज छंद मराठी माणसाने स्वतःला लावून घेतला आहे. त्यामुळं वाद किंवा तत्सम गोष्टी महाराष्ट्रात फक्कड रंगतात. त्यांना एक सांस्कृतिक प्रतिष्ठादेखील प्राप्त झाली आहे.

वादांकडे माझे बारीक लक्ष असते. कोठेही जरा बऱ्यापैकी वाद सुरू झाला की मला स्फुरण चढते. हाडाचा भित्रा असल्यामुळे कोणत्याही बंद्या–चिल्लर वादात मी सक्रीय सहभागी होत नाही, वाद पहायला बघ्यांची थारोळी जमा करण्याचे मात्र मला छान जमते.

६ एप्रिल १९७४ च्या 'माणूस'मध्ये 'सोलकढी'तून दोन कवींच्या कुस्तीची हकीगत माझ्या प्रिय वाचकांसाठी मी सादर केली होती. ग्रेस आणि अनिल हे विदर्भातले दोन मोठाले कवी तेथल्या साहित्य संघाच्या निवडणुकीत भांडले. एकमेकाला त्यांनी शिव्या दिल्या. ग्रेस पडले, अनिल निवडून आले. अशा कुस्तीत निकालाकडे मी पाहात नाही. कुस्ती जोशात झाली म्हणजे माझा आत्मा निवतो. दोन कवींची ही कुस्ती जोशात झाली, त्यामुळे मी आपला आनंद लपवून ठेऊ शकलो नाही. मला एकच वाटले होते : विदर्भातल्या त्या कुस्तीची दखल घेण्याएवढा साक्षेप माझ्याशिवाय दुसऱ्या कोणातही असणार नाही.

पण तसे झाले नाही. १४ एप्रिलच्या महाराष्ट्र टाईम्सच्या अंकात छाया दातार यांनी 'जेव्हा महाराष्ट्रातही सोल्झेनित्सिन घडतो !' या शीर्षकाचा एक जळजळीत लालभडक लेख लिहिला. त्यांच्या मते, अनिल आणि ग्रेस या दोन कवींच्या कुस्तीमध्ये 'प्रस्थापित विरुद्ध जिवंत मनाचा माणूस असे भीषण आणि भव्य नाटय होते.' 'महाराच्या हाती विदर्भ साहित्य संघ देणार काय ?' असा प्रचार ग्रेस विरुद्ध अनिलांच्या बाजूने करण्यात आल्याची माहिती देऊन 'ग्रेसला सोल्झेनित्सिनसारखी हद्दपारी भोगावी लागली. सोल्झेनित्सिन प्रकरणे रशियातच घडतात असे नाही, ती प्रजासत्तक सार्वभौम लोकशाही भारततही घडतात' असा क्रांतिहासिक निष्कर्ष त्यांनी काढला. (छाया दातार एकीकडे साध्या, सरळ, सोप्या गोष्टी लिहितात आणि दुसरीकडे सर्वप्रकारच्या अन्यायाला वाचा फोडतात. कोणत्याही अन्यायाला असलेला विशाल सामाजिक संदर्भ त्या विसरू शकत नाहीत. आता त्यांनी सांगितले म्हणूनच सोल्झेनित्सिन आणि ग्रेस यांच्यातले अदृश्य साम्य आमच्या ध्यानात आले. एरवी त्या दोघांनाही दाढी आहे— आणि साम्यवादी रशियात तशीच प्रजासत्ताक सार्वभौम लोकशाही भारततही पुरूषांना दाढी येते.— एवढेच दृश्य साम्य आम्हाला जाणवले होते. परिस्थितीने ग्रेस प्रस्थापित नाहीत आणि जातीने ते महार आहेत, या गोष्टीदेखील छाया दातारांनी सांगितल्यामुळं सर्वांना कळल्या. असो.)

छाया दातारांचा उपरिनिर्दिष्ट लेख शिवाजीनगरच्या पु. ल. देशपांड्यांनी वाचला तेव्हा त्यांच्या कनवाळू अंतःकरणाला अपार वेदना झाल्या. आणि दिवाळीचा मोसम नसतानासुद्धा कागद पुढे ओढून व पेनचे टोपण काढून त्यांनी 'महाराष्ट्र टाईम्स'ला एक प्रदीर्घ पत्र लिहिले. त्यात, चांगले साहित्य कोणते, मराठी साहित्याने कसला अहंकार धरावा, लेखकाच्या पोस्टाच्या पत्त्याकडे किती लक्ष द्यावे इत्यादी मूलभूत प्रश्नांचा उहापोह (म्हणजे बोलायला तोंड उघडल्यावर मराठीचा कोणताही प्राध्यापक करतो ते) आहे. तो सोडा. पु. ल. देशपांड्यांनी मुख्य मुद्याची गोष्ट अशी सांगितली की छाया दातारांनी उल्लेखलेल्या पद्धतीने जर प्रचार झाला असेल तर त्याची खात्री करून घेऊन अनिलांनी निवडून आलेल्या पदाचा राजिनामा द्यावा. (हे गंभीर पत्र वाचल्यावर, विनोदी लिहिणारे पु. ल. देशपांडे आणि गंभीर लिहिणारे पु. ल. देशपांडे असे दोन पु. ल. देशपांडे या मायमराठीत आहेत की काय, अशी शंका कित्येकांना आली होती. पु. ल. देशपांडे कितीही असोत, सगळे पु. ल. देशपांडे प्रस्थापित असतात, असे म्हणतात. एकूण विनोदी लेखक होणे ही गोष्ट गंभीरच असते म्हणायची.)

छाया दातारांनी लेख लिहिला. पु. ल. देशपांड्यांनी पत्र लिहिले. पाठोपाठ सुरेश भटांचा खुलासा प्रसिद्ध झाला. (महाराष्ट्र टाईम्स—२१ एप्रिल १९७४) हे सुरेश भट म्हणजे कवी सुरेश भट. नागपूरहून निघणाऱ्या 'महासागर' या दैनिकाचे कार्यकारी संपादन ते करतात. ग्रेसविरुद्ध काही असभ्य मजकूर त्यांच्या दैनिकातून प्रसिद्ध झाला असा आरोप छायाबाईंनी केला होता. संपादक असलो तरी प्रसिद्ध झालेला (असभ्य) मजकूर आपण लिहिला नव्हता, आपल्या दैनिकातून दोन्ही पक्षांना भरपूर जागा दिली होती, असे सांगून भट मोकळे झाले. त्याच अंकात माधव मनोहरांच्या (होय, आपलेच माधव मनोहर) सौजन्याने ग्रेसचे निवडणुकीबाबतचे एक खाजगी पत्र प्रसिद्ध झाले आहे. त्यात ते आक्रोशून विचारतात : 'छाती फोडली तर जानवे निघते म्हणून दलित द्रोही ठरवतात मला— आणि फोडलेल्या छातीत जानवे नाही म्हणून ब्राह्मणही द्रोही म्हणतात. माधवराव, शेवटी माझी जात कोणती ?'

'महाराष्ट्र टाईम्स'मधून दोन कवींची कुस्ती अशी यथास्थित घुमायला लागली. बाकीच्या वर्तमानपत्रांचे कुस्तीकडे लगेच लक्ष गेले नव्हते. इतक्यात 'नवशक्ती'मध्ये कोणा प्रकाश तायडेने पत्र लिहून, नेहमी अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या दुर्गा भागवतांनी ग्रेसवर झालेल्या मनगटशाही अन्यायाबाबत आवाज का चोरावा, असा सवाल केला. (नवशक्ती : १७ एप्रिल ७४) दुर्गाबाई जणू अशा निमित्ताचीच वाट पाहात असाव्या. १९ एप्रिलच्या 'नवशक्ती'त एक विस्तृत पत्रलेख लिहून दोन कवींच्या कुस्तीबद्दलची आपली भूमिका त्यांनी नेहमीच्याच

कडकडीतपणे मांडली. दुर्गाबाईंच्या पत्रलेखात सहा मुद्दे आहेत. 'युगवाणी'च्या सल्लागार मंडळावर असल्यामुळे निवडणुकीच्या गदारोळात काही बोलणे आपल्याला शक्य नव्हते; विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत मनगटशाही नव्हती : जात, गट, पैसा, अधिकार इत्यादींचा विचार मनगटशाहीच्या संदर्भात अप्रस्तुत आहे; 'महाराच्या हाती विदर्भ साहित्य संघ देणार काय?' हे विधान एका अर्थाने संदिग्ध आहे, कारण नक्की कोण असे बोलले याचा बोध त्यावरून होत नाही. संदिग्ध विधाने करून ग्रेसच्या प्रतिस्पर्ध्यांवर कुठलाही आरोप मी कसा करू शकते; हे दुर्गाबाईंचे खुद्द कुस्तीबद्दलचे तीन मुद्दे. पुढल्या अर्ध्या भागात, कुस्तीच्या प्रसंगाने घसा खरवडून कुस्तीगिरांपेक्षा घामाघूम झालेल्या पुस्तीगिरांची संभावना आहे. त्यात पहिले आम्हीच आहोत. आमच्याबद्दल दुर्गाबाईंनी म्हटले आहे. 'माणूस'मध्ये 'अनंतराव' (म्हणजे आम्ही बरं का) यांनी या निवडणुकीतल्या डावपेचांच्या कुस्तीचे वर्णन खोचकपणे केले आहे आणि त्यात अनिलांना टोमणे हाणले आहेत. ग्रेसच्या पराभवाचे शल्य अनेक नव्या विचारसरणीच्या लेखकांना जाणवले यात शंका नाही. (या दुर्गाबाईंचीसुद्धा कमाल आहे. खोचकपणा करणार नाही, टोमणे कोणाला मारणार नाही, अशा प्रतिज्ञेने माझे सदर मी चालवीत असतो. असे असताना 'दोन कवींची कुस्ती' या स्फुटात दुर्गाबाईंना खोचक वर्णन आणि टोमणेहाणी दिसली असेल तर मला ताबडतोब अंतर्मुख झाले पाहिजे. मी होईन. वर दुर्गाबाई मला 'नव्या विचारसरणी'चा म्हणतात. हे मला माझे चारित्र्यहनन वाटते. त्याबद्दल मी सौम्य निषेध करतो.)

ग्रेस प्रकरणाला छाया दातारांच्या लेखाने वेगळी कलाटणी मिळाली; परंतु ग्रेसची बाजू त्यामुळे बळकट न होता अधिक दुबळी होत गेली, असे दुर्गाबाईना वाटते. ग्रेसची सोल्झेनित्सिनशी छायाबाईंनी केलेली तुलना गैरलागू आहे. तसेच त्यांनी उपस्थित केलेला प्रस्थापित–अप्रस्थापित हा मुद्दासुद्धा या प्रकरणात अप्रस्तुत आहे, असे दुर्गाबाईंचे (जवळजवळ आमच्यासारखे) मत आहे. ('जवळजवळ आमच्यासारखे' असे आम्ही मुद्दामच म्हटले. वास्तविक नुसते 'आमच्यासारखे म्हणणे युक्त झाले असते. पण ते फार ठाम व निश्चित वाटते; म्हणून 'जवळजवळ.' दोन अधिक दोन, जवळजवळ चार होतात, असे म्हणण्याची एक सावध सवय आम्ही अंगी बाणवली आहे)

दुर्गा भागवतांच्या पत्रलेखातला अखेरचा आणि बराच मोठा भाग अर्थात पु. ल. देशपांड्यांसाठी खास राखून ठेवलेला आहे. दुर्गाबाईंना असे प्रामाणिकपणे वाटते की जर.. तरची भाषा वापरून पु. ल. देशपांड्यांनी ग्रेसची बाजू घेतल्यासारखे दाखवीत चतुराईने अनिलांचीच पाठराखण केली आहे; या प्रकरणाच्या निमित्ताने, संदर्भ नसतानाही, अनिलांसकट दहावीस जुन्या-नव्या लेखकांची भलावण त्यांनी उरकून घेतली आहे; पु. ल. देशपांड्यांना सर्व चौकशी पुराव्यासकट करणे शक्य असूनही ते छाया दातारांच्या सावलीला गेले; पूर्ण माहितीच्या अभावी माझ्यासारख्यांना (म्हणजे दुर्गाबाईंसारख्यांना) गप्प बसायचे जे ठाऊक असते ते पु. ल. देशपांड्यांना ठाऊक नाही.

दुर्गा भागवतांची आमच्या बाबतीत सपशेल फसगंमत झाली असली तरी पु. ल. देशपांड्यांचे इंगित त्यांनी अचूक ओळखले याने व्यक्तिशः मला फार्फार संतोष झाला. कारण पु. ल. देशपांड्यांच्या पत्राबद्दलची माझी मनोमन प्रतिक्रिया दुर्गाबाईंसारखीच होती. मी भित्रा आणि लाचार असल्यामुळे बोललो नाही; निर्भिड आणि निःस्पृह असल्यामुळे दुर्गाबाई बोलल्या. पु. ल. देशपांड्यांच्या पत्रातले केवळ कोरडे शब्द वाचणाऱ्या भाबड्या वाचकांना वाटले असणार की आपले पु. ल. किती किती शूर आहेत; जणु रामशास्त्री प्रभुणेच ग्रेससारख्या निराधार दलिताच्या पाठीमागे ते उत्स्फूर्तपणे उभे राहिले आणि त्यांनी अनिलांना राजिनाम्याचे प्रायश्चित घेण्यास फर्मावले. पण हे खरे नव्हे हे दुर्गाबाई जाणतात आणि मी जाणतो. ग्रेसच्या पाठीमागे उभे असल्याची हूल दाखवून अनिलांना राजिनाम्याच्या कोंडीत पकडण्याचे नुसते लोकनाट्य या विनोदी म्हणवणाऱ्या साहित्यिकाने केले. हे कसले रामशास्त्री प्रभुणे?(सहज आठवण झाली. मागे एक अस्सल प्रातिनिधिक तमाशा उभा करायची योजना ठरत होती. त्या तमाशात पु. ल. देशपांडे सोंगाड्या होणार होते. दुर्गाबाईंना सगळ्यातले सगळे माहित. वर निर्भिड आणि निःस्पृह. तेव्हा त्यांनी पु. ल. देशपांडे सोंगाड्या व्हायला लायक नाहीत, असा उंच पुकारा केला होता. त्यावर जो विषय आपला नाही, त्यात लक्ष न घालण्याचा मित्रसल्ला पु. ल. नी दुर्गाबाईंना दिला होता. तेव्हापासून दुर्गाबाई पु. ल. हा खास आपला विषय मानतात.)

भाबड्या वाचकांची आणखी एक गंमत पाहा : प्रत्यक्ष पुरावे हाती लागले नसल्यामुळे दुर्गाबाई सुरुवातीला या वादात उतरल्या नव्हत्या. हे योग्य, उचित, स्वाभाविकच होय. पण त्याचप्रमाणे, पु. ल. नी सुद्धा, प्रत्यक्ष पुरावे नसल्यामुळे, जर...तरची सभ्य भाषा वापरली नसेल काय? तसे असेल तर तेही तितकेच योग्य, उचित, स्वाभाविकच होय. छे छे, या भाबड्या वाचकांचे कसे होणार, असे मनात येऊन मी खिन्न होतो. जे दुर्गाबाईंना योग्य, उचित, स्वाभाविक आहे तेच पु. ल. देशपांड्यांना अयोग्य, अनुचित, अस्वाभाविक आहे, एवढा साधा तर्क आणि शहाणपणा त्यांना सुचू नये ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होय.

दोन कवींच्या कुस्तीचे लोकनाट्य असे उत्कर्षाला पोचले. मग त्याची दखल सर्वांनी घेतली. 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये पत्रव्यवहार चालूच राहिला. 'सोबत'मध्ये प्राध्यापक हरिहर चंद्रशेखर घोंगे या घवघवीत नावाच्या नागपूरकराने एक लेख लिहून, पिढ्यानपिढ्यांच्या विशिष्ट वैदर्भी मनोवृत्तीमुळे ग्रेसचा पराभव झाला, असे जरा अवघड समाजशास्त्रीय स्पष्टीकरण केले. 'प्रभंजन'-मधील 'बेधडक' सदरात मोतीराम बऱ्हाडपांडे यांनी ग्रेसपक्षीय पु. ल. देशपांड्यांना ते काँग्रेसपक्षीय खासदारासारखे आहेत असे टोलवले आहे. त्याशिवाय नागपूर टाईम्स, लंडन टाईम्स, न्यूयॉर्क टाईम्स, टोकियो टाईम्स, मॉस्को टाईम्स, पेकिंग टाईम्स इत्यादी जगातल्या बहुतेक सगळ्या पुरोगामी आणि प्रतिगामी अशा दोन्ही वर्तमानपत्रातून, कागदटंचाईला न जुमानता, दोन कवींच्या कुस्तीचा परामर्श घेण्यात आल्याचे कळते.

नुसत्या कविता लिहिणाऱ्या कवींना आजकाल कोणी विचारीत नाही.

नुसत्या कुस्त्या खेळणाऱ्या कुस्तीगिरांना आजकाल कोणी विचारीत नाही.

मात्र कुस्त्या खेळणाऱ्या कवींना सगळे विचारतात असे दिसते.

—अनंतराव

# पेकिंग व दिल्लीच्या शिखर बैठका

वा. दा. रानडे

गेल्या काही दिवसात जवळ जवळ एकाच वेळी दोन शिखर बैठका झाल्या. पाकचे पंतप्रधान भुट्टो यांनी पेकिंगला भेट देऊन माओ-त्से-तुंग आणि चौ-एन-लाय यांच्याशी केलेली बोलणी ही एक शिखर बैठक तर दिल्लीत पंतप्रधान इंदिरा गांधी आणि बांगला देशचे पंतप्रधान शेख मुजीब रहमान यांची झालेली बोलणी ही दुसरी शिखर बैठक. आपल्या शेजारी देशाशी या बैठकांचा संबंध असल्याने त्यांना विशेष महत्त्व आहे.

एकाच वेळी समांतर राजकीय हालचाली व वाटाघाटी करावयाच्या हे पाकचे तंत्र काही नवीन नाही. भारताने रशियन नेत्यांशी केलेल्या वाटाघाटींचे वेळी हा अनुभव पूर्वी आलेला आहे. या वाटाघाटींच्या फेऱ्या ज्या वेळी झाल्या, नेमक्या त्याच वेळी इस्लामाबादमध्ये पाक व चिनी नेत्यांची बोलणी पाकने घडवून आणली होती. आताही तसेच घडले आहे. इंदीरा गांधी व मुजीब यांची दिल्लीत बोलणी झाली त्याच सुमारास भुट्टोंनी पेकिंगला भेट देऊन चिनी नेत्यांनी बोलणी केली.

भुट्टोंच्या पेकिंग भेटीमागे मुख्यतः तीन उद्देश होते. इराण हा आपला विश्वासू मित्र व खात्रीचा आधार असे भुट्टोंना वाटत होते. पण इराणच्या शहांनी त्यांची निराशा केली. पंतप्रधान गांधींच्या तेहरान भेटीत त्यांनी इराणशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले. तेव्हा आपण एकटे नाही हे दाखविण्यासाठी भुट्टो पूर्वेकडील आपल्या मित्राकडे, चीनकडे वळले. चीनकडून लष्करी मदत मिळविण्याचा प्रयत्न त्यांनी केला असला पाहिजे. संयुक्त पत्रकात त्याचा उल्लेख नाही हे स्वाभाविकच आहे. कारण अशा महत्त्वाच्या गोष्टी संयुक्त पत्रकात उल्लेखल्या जात नाहीत. भारत तुमचा मित्र असेल तर भारतापेक्षाही प्रबळ असलेला चीन हा आमचा मित्र आहे हे विसरू नका असे अप्रत्यक्ष दडपण बांगला देशवर आणणे हा भुट्टोंच्या भेटीचा दुसरा उद्देश होता.

या दोन उद्देशांपेक्षाही तिसरा उद्देश पाक-भारत संबंधांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा होता. पाकने बांगला देशला मान्यता दिल्यानंतर उपखंडात आता शांततेचे व सलोख्याचे वातावरण निर्माण होईल. अशी आशा व्यक्त केली जात होती. भारत व पाकमध्ये व्यापार व दळणवळण सुरू करण्याबाबत वाटाघाटी होऊन त्या दिशेने पावले पडतीलही. पण दोन्ही देशात राजकीय संबंध प्रस्थापित झाल्याशिवाय खरे सहकार्य वाढणार नाही. सर्व अनिर्णित प्रश्न सुटल्याशिवाय राजकीय संबंध प्रस्थापित करण्यात अर्थ नाही. अशी भारताची सुरुवातीची भूमिका होती. पण त्यात आता बदल झाला असून सर्व प्रश्न सुटण्याची वाट न पहाता राजकीय संबंध प्रस्थापित करून अनिर्णित प्रश्नावर बोलणी चालू ठेवण्याची भारताची तयारी दिसते. पण भारताने आपली पहिली भूमिका बदलली तशी पाकिस्ताननेही आपली सुरुवातीची भूमिका बदलली आहे. राजकीय संबंध लवकर प्रस्थापित करावे असा पाकचा पूर्वी आग्रह होता पण तो आता राहिलेला नाही. राजकीय संबंध सुरू करण्याच्या मोबदल्यात काश्मीर प्रश्नाचा आपणास अनुकूल निर्णय लावून घेता आला तर पहावा, निदान तो प्रश्न पुन: धसास लावावा असा पाकचा प्रयत्न आहे.

पाक-चीन संयुक्त पत्रकात काश्मिरी जनतेच्या स्वयंनिर्णयास चीनने उघडपणे पुन्हा एकदा पाठिंबा दर्शविला ही घटना या दृष्टीने महत्त्वाची आहे. काश्मीर प्रश्नावर चीनने पाकिस्तानला पाठिंबा दिला म्हणून भारताने चिंता करण्याचे कारण नाही. कदाचित पाकिस्तान हा प्रश्न युनोमध्ये पुन्हा उपस्थित करण्याचा प्रयत्न करील पण पाकला अनुकूल ठराव होण्याची शक्यता नाही. कारण रशिया आपल्या बाजूस असून तो जरूर तर नकाराधिकार वापरल्याशिवाय राहणार नाही. दोन्ही देशांनी आपसात वाटाघाटी करूनच या प्रश्नावर तोड काढली पाहिजे. तशी शक्यता सध्या दिसत नाही.

तर पूर्वेकडील नद्यांच्या पाण्याचे वाटप, बांगलादेश-भारत सीमा आखणी हे प्रश्न समाधानकारकपणे सुटण्याच्या मार्गास लागतील असे दिल्लीस नुकत्याच झालेल्या इंदिरा गांधी-मुजीब वाटाघाटीवरून दिसते. पाकच्या स्थापनेपासून हे प्रश्न त्याच्या आडमुठ्या धोरणामुळे अनिर्णित राहिले होते. पाकशी युद्धातून निर्माण झालेले प्रश्न सुटल्याशिवाय या प्रश्नाकडे लक्ष द्यायला बांगला देशला उसंतच नव्हती. दिल्ली वाटाघाटीत प्रथमच त्यावर चर्चा झाली. पूर्वीच्या पाकचे कटकटी निर्माण करण्याचे धोरण आणि मुजीब यांचे सहकार्याचे-समजूतदार धोरणातील तफावत यावेळी प्रकर्षाने जाणवली. गंगेच्या पाण्याच्या वाटपाचा प्रश्न एक वर्षात सोडविण्याचे दोन्ही देशांच्या नेत्यांनी ठरविले आहे. त्यासाठी संयुक्त कमिशन नेमण्यात आले आहे. सीमा आखणीवरही दोन्ही नेत्यात एकमत झाले. सीमेवरचा जो भाग ज्या देशात समाविष्ट केला जाईल त्याचे नागरिकत्व स्वीकारणे ऐच्छिक ठेवण्यात आले आहे हा या कराराचा विशेष आहे. बांगला देशाच्या विकासासाठी भारत ४१ कोटी रुपयाची कर्जे देणार असून पोलाद, खत व सिमेंटचे कारखाने उभारण्यास मदत करणार आहे.

बांगला देश स्वतंत्र झाल्यानंतर मुजीबना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. एका बाजूला पाक हस्तकांच्या हालचाली व

दुसऱ्या बाजूला भाषाणींच्या नेतृत्वाखाली पेकींगवादी गटाच्या हालचाली अशा दुहेरी आव्हानाशी त्यांना सामना करावा लागला व अजूनही करावा लागत आहे. बांगला देशातील अस्थैर्याचा फायदा घेऊन आपल्या हाती सत्ता आणावी असे पेकींगवादी कम्युनिस्टांचे प्रयत्न आहेत पण जलद आर्थिक विकासाचा कार्यक्रम मुजीब यांनी निर्धाराने अंमलात आणला तर पाकहस्तक व पेकींगवाद्यांचे उद्देश सफल होणार नाहीत. ☐

# पश्चिम जर्मनीचे नेते ब्रँट यांचा राजीनामा

अठरा वर्षांपूर्वीची गोष्ट. पूर्वजर्मनीतून पश्चिम जर्मनीत आलेल्या निर्वासितांबरोबर गंथर गिलॉमे पश्चिम जर्मनीत आला. पण इतर निर्वासितांसारखा तो साधा निर्वासित नव्हता. पूर्व जर्मनीसाठी हेरगिरी करण्याच्या कामगिरीवर तो पश्चिम जर्मनीत आलेला होता. त्यावेळी त्याच्याबद्दल काहीही संशय आला नाही. कारण त्याने आपल्या हालचाली अत्यंत कौशल्याने व पद्धतशीरपणे केल्या होत्या. पूर्व जर्मनीत असतानाच पश्चिम जर्मनीसाठी तो हेरगिरी करीत होता. त्यामुळे पश्चिम जर्मनीत प्रवेश करून महत्त्वाच्या अधिकारपदापर्यंत शिरकाव करून घेण्यात त्याला काही अडचण पडली नाही. फ्रँकफुर्टमध्ये काही वर्षे छायाचित्रकार व विक्रेता म्हणून त्याने काम केले. सोशल डेमोक्रेटिक पक्षाचा तो सभासद व कार्यकर्ता झाला. पक्षात महत्त्वाची अधिकारपदे स्वीकारण्याइतका विश्वास त्याने संपादन केला होता. त्याची पत्नीही सोशल डेमोक्रेटिक पक्षाची कार्यकर्ती बनली. पश्चिम जर्मनीचे पंतप्रधान विली ब्रँट यांच्या कार्यालयात विश्वासू अधिकारी म्हणून गिलॉमे याची नेमणूक झाली. हेरगिरीसाठी या अधिकार पदाचा तर त्याला फारच उपयोग झाला असला पाहिजे. अनेक महत्त्वाची गुपिते त्याला उपलब्ध झाली असावीत असा अंदाज आहे. त्याची हेरगिरी उघडकीस येऊन त्याला अटक झाल्यानंतर विली ब्रँट यांनी या प्रकरणाची राजकीय जबाबदारी पत्करून लगलीच त्यागपत्र दिले, नेत्याचे चारित्र्य संशयातीत असले पाहिजे, ते नुसते संशयातीत असणे पुरेसे नसून संशयातीत असल्याचे दिसले पाहिजे. लोकांची त्याबद्दल खात्री पटली पाहिजे. वास्तविक हेरगिरी प्रकरणाशी ब्रँट यांचा काही संबंध नव्हता. गिलॉमे हेर असल्याचे त्यांना माहीतही नव्हते पण हेरांच्या हालचालीबद्दल सरकार गाफील राहिले व पंतप्रधान या नात्याने त्याची जबाबदारी आपण स्वीकारली पाहिजे आणि हलगर्जीपणाचे प्रायश्चित घेतले पाहिजे या विचाराने ब्रँट यांनी त्यागपत्र दिले व चारित्र्यवान नेतृत्वाचा आदर्श देशापुढे ठेवला.

पश्चिम जर्मनीत निरनिराळ्या देशांचे पंधरा हजार हेर असून त्यात पूर्व जर्मनीचे सर्वात जास्त आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणवर हेरगिरी चालते ती सरकारच्या गाफीलपणामुळेच हे उघड आहे. या हेरगिरीने ब्रँट यांचा राजकीय बळी घेतला. पश्चिम जर्मनीचे संरक्षणखाते यापुढे अधिक जागरूक राहील. पण सरकारला ब्रँट यांचे नेतृत्व गमवावे लागले ही हानी मोठी आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर दोन तपांनी प्रथम सोशल डेमोक्रेटिक पार्टी आणि फ्री डेमोक्रेटस पार्टी यांच्या आघाडीने सप्टेंबर १९६९ मध्ये पश्चिम जर्मन बुन्डस्टॅगमध्ये—पार्लमेंटचे कनिष्ट सभागृह—बहुमत मिळवून आपले सरकार बनविले. सोशल डेमोक्रेटिक पक्षाचे नेते ब्रँट पंतप्रधान झाले. त्यानंतर तीन वर्षांनी नोव्हेंबर १९७२ मध्ये झालेल्या निवडणुकात ४८ जागांचे बहुमत मिळवून आघाडीने आपले स्थान अधिक बळकट केले. पण गेल्या काही महिन्यात ब्रँट व त्यांच्या पक्षाची लोकप्रियता घसरू लागली होती. हॅम्बुर्ग शहर राज्याच्या दोन महिन्यापूर्वी झालेल्या निवडणुकात याचे प्रत्यंतर आले. हॅम्बुर्ग हा सोशल डेमोक्रेटिक पक्षाचा बालेकिल्ला. पण तेथे तो निर्णायक बहुमत मिळवू शकला नाही. त्याने १४ जागा व १० टक्के मते गमावली. त्यानंतर ऱ्हाइन लँडच्या निवडणुकीतही पक्षाचे बळ घटले.

रशिया व पूर्व युरोपाशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले आणि थंडे युद्ध संपवून पश्चिम जर्मनीच्या परराष्ट्र धोरणाला नवी दिशा लावली हे ब्रँट यांचे सर्वात मोठे कार्य. पण हेरगिरी प्रकरणाने हे सहकार्याचे संबंध काही काळ तरी दुरावल्याशिवाय राहणार नाहीत. हेरगिरी प्रकरणाचा दुसरा परिणाम म्हणजे सध्याच्या सत्तारूढ आघाडीविरुद्ध प्रचार करण्यास विरोधी ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन पक्षाला एक विषय मिळेल व पुढच्या निवडणुकात त्याचा फायदा त्या पक्षास मिळण्याची शक्यता आहे.

पश्चिम जर्मनी हा युरोपातील सर्वात संपन्न देश. त्याचा परकीय चलनाचा साठा अमेरिकेच्या दुप्पट आहे. पण ही आर्थिक संपन्नता संपुष्टात येऊ लागल्याचे काही घटनांवरून स्पष्ट होत आहे. यावर्षी चलनवाढ दहा टक्के झाली. बेकारांची संख्या वर्षात दुपटीने वाढली. संप वाढत्या प्रमाणात होत आहेत. अधिक शैक्षणिक स्वातंत्र्यासाठी विद्यार्थी आंदोलन करीत आहेत.

सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ही ब्रिटनमधील मजूर पक्षासारखी आहे. लोकशाही समाजवादाचा पुरस्कार करणारा हा पक्ष. पण त्याचा लोकशाही समाजवाद म्हणजे प्रत्यक्षात सुधारणावादच झाला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेस आंतरराष्ट्रीय भांडवलाच्या पकडीतून मुक्त करून सरकारी क्षेत्रातील कारखानदारीचा मजबूत पाया सरकारने घालावा अशी पक्षातील तरुण समाजवादी गटाची मागणी आहे. पण त्या दृष्टीने पावले टाकण्याची सरकारची तयारी नाही. भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या प्रस्थापित हितसंबंधाना ज्यामुळे बाध येईल असे कोणतेही उपाय ब्रँट यांच्या सरकारने योजले नाहीत. त्यांच्या पक्षाने सुरुवातीला निर्माण केलेल्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने सरकारविरुद्ध असंतोष वाढत आहे व पुढच्या निवडणुका जिंकणे त्यास कठीण जाणार आहे. ☐



प्रकाश नं प्रभु

# गूढ हवेली



ही कथा आहे ' जर्मन सीक्रेट सर्व्हीस 'मधील अधिकाऱ्यांच्या जिद्दीची व धाडसाची. युद्धाचे दिवस. एका निर्जन आणि ओसाड प्रदेशातला तो एक जुनाट वाडा. विलक्षण गूढ. तिथे कोणीतरी रशियासाठी हेरगिरी करून आपल्या लष्कराच्या हालचाली रशियन आघाडीवर कळवतोय असा जर्मन अधिकाऱ्यांना संशय आला. तपास सुरू झाला आणि नंतर उलगडत गेलं मती गुंगवून टाकणारं एक रहस्य...

प्रात:काळची प्रसन्न वेळ. उबदार सूर्य-किरणात बसून कर्नल वॉरमेझिस्टर पुढच्या डावपेचांचे चिंतन करीत होते. त्यांचे एक सहकारी फेलीक्स एक विशेष काम आटोपून नुकतेच परत आले होते आणि त्यांच्याकडून मिळालेला रिपोर्ट उत्साह-वर्धकच होता. मिळालेला रिपोर्ट आणि आपले नवे डावपेच यांचा उत्तम समन्वय साधला पाहिजे हे ते जाणून होते व त्या बाबतीतील त्यांचं कौशल्य समस्त जर्मन सैनिकांना विदीत होतं.

एवढ्यातच समोरून फेलीक्स येत असल्याचे त्यांनी पाहिले.

" गुड मॉनिंग, " प्रसन्नमुखाने त्यांनी त्यांचं स्वागत केलं.

" गुड मॉनिंग, " तेवढ्याच अदबीने प्रतिसाद देत फेलीक्स समोरच्या खुर्चीवर स्थानापन्न झाले

" एनिथींग न्यू ? " त्यांच्या चेहेऱ्याचे बारीक अवलोकन करीत वॉरमेझिस्टरनी विचारले. ' अर्थातच, ' डावा हात दाढी-वरून फिरवीत फेलीक्स म्हणाले. ' मि. वॉरमी, मला दाट संशय येतो आहे की जवळपासच्या जंगलात कुठंतरी रशियन हेरगिरीचं केंद्र असलं पाहिजे आणि तिथून आपल्या सैनिकांच्या बारीक-सारीक हाल-चालीसुद्धा शत्रूपक्षाला समजत असल्या पाहिजेत. आपल्याला अजून त्याचा सुगावा लागू नये ही मोठी दुर्दैवाची गोष्ट. "

" पण तसा काही पुरावा ? "

" पुरावा सापडल्यावर कोणतंच प्रकरण तडीस न्यायला वेळ लागत नाही जर्मनांना. तसा सबळ पुरावा हातात असता तर ते केंद्र उध्वस्त केल्याची बातमीच मी आपल्या-कडे आणली असती मि. वॉरमी "

" नाईस. माझा विश्वास आहे तुमच्यावर मि. फेलीक्स. पण तुमच्या या तर्काचं मूळ कुठेतरी असेलच ना ! "

" सांगतो. एकदोनदा तशाप्रकारचे कोड मेसेज मी टेलीफोनवरनं ऐकलेत. ते मेसेज रशियनांना कुठून दिले जातात हे मी निश्चित सांगू शकलो नाही. तरी एक गोष्ट ठामपणे मी सांगतो की जवळपासच्या या भकास, ओसाड जंगलातच हे केंद्र असलं पाहिजे. "

कर्नल वॉरमीचा चेहेराही एव्हाना गंभीर

बनला होता." शक्य आहे मि. फेलीक्स. या जंगलाचे काही भाग एवढे दुर्गम आहेत की काही ठिकाणं आमच्या पाहाण्यातही आली नसतील. पण तुमची ही बातमी कानी आल्यावर आता स्वस्थ बसण्यात अर्थ नाही,' ते विचार करीत म्हणाले.

मि. फेलीक्सना आपल्या सहकाऱ्याचा हा निर्णय ऐकून फार बरं वाटलं. एक तर अशा गूढ प्रकरणांचा तपास करण्याची मनापासून त्याना आवड होती आणि दुसरी गोष्ट अशी की हा तर त्यांच्या देशाच्या हिताचाच प्रश्न होता.

थोड्याच वेळात फेलीक्स आणि निवडक सहकाऱ्यांना बरोबर घेऊन बॉरमेक्ष्स्टर त्या जंगलाची तपासणी करण्यासाठी बाहेर पडले. सारं रान पालथं घालणं ही फारच अवघड बाब होती. आणि समजा, एखादा रशियन हेर आत असलाच तर त्याला शोधून काढण्यासाठी पंधरवडाही अपुराच पडला असता नि तेवढ्या अवधीत विलक्षण गती घेतलेल्या युद्धाचे काही आगळेच परिणाम घडूनही आले असते.

"इथं आपल्याला मदत झालीच तर ती आपल्या सुदैवाचीच केवळ," मि. बॉरमी बोलून गेलेही.

फेलीक्स यावर नुसते हसले.

आणि खरं पहाता या प्रकरणाचाच तपास लावण्यासाठी मि. बॉरमीना आपला सारा वेळ खर्च करणे शक्यही नव्हते. हेरगिरीचा हा प्रश्न महत्त्वाचा तर होताच, पण याहीपेक्षा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर होत्या. शिवाय त्यांचे सहकारी मि. फेलीक्स तपासाची ही जबाबदारी खचितच पार पडू शकतील असा त्यांना विश्वासही होता. तेव्हा जंगलातील परिस्थितीची सामान्य माहिती करून घेतल्यावर त्यांनी तपासाची सारी सूत्रं मि. फेलीक्सच्या स्वाधीन केली. पेट्रोव्हस्की नावाचा दुसरा तसाच एक कर्तबगार अधिकारी त्यांनी त्यांच्या मदतीला दिला आणि ते स्वतः आपल्या कामगिरीवर परत फिरले. जाता जाता तिथल्या मिलिटरी पोलिसांनाही जोरदार तपास करण्याचे व त्या धोकेबाज गुप्तहेराला पकडण्याचे आवाहन त्यानी केले.

त्यानंतर जवळ जवळ पंधरा दिवसांची गोष्ट. अनपेक्षितपणेच फेलीक्सचा संदेश कर्नल बॉरमीच्या हाती आला. कोणत्याही परिस्थितीत क. बॉरमीना त्यानी त्याच जंगलातल्या पीक्स नावाच्या भागात बोलाविलेले होते. हव्या असलेल्या जागेचा आपण शोध लावल्याचेही त्यांचे आत्मविश्वासपूर्ण म्हणणे होते. मात्र त्याच्यापेक्षा अधिक काहीच त्या संदेशात नव्हते.

त्याच दिवशी संध्याकाळी क. बॉरमी नियोजित ठिकाणी पोहोचले. फेलीक्स आणि पेट्रोव्हेस्की यांनी मोठ्या उत्साहाने त्यांचे स्वागत केले. तिथल्याच एका छोट्याशा घरात चहापानाचा कार्यक्रम झाला. तो आटोपल्यावर मि. फेलीक्सनी तपासाची सारी हकिगत सांगायला प्रारंभ केला.

"खरं सांगायचं तर आम्ही हा जो तपास केला आहे, त्याच सारं श्रेय आहे इथं आल्यावर आमचा मित्र बनलेल्या एका पोलीश नागरिकाला. इथून जवळच झाव्होरस्कोई महाल आहे. फार जुनाट. सभोती सारी दल दल नि काटेरी झुडपे. अगदी भयानक वाटतं ते सारं. तर त्या पोलीश नागरिकानेच आम्हाला त्या महालासंबंधी सांगितले. कोणत्याही प्रकारे लोकांचा संबंध या महालाशी पोहोचूच शकत नाही, आणि आमच्या पोलीश मित्राचा तर विश्वास की हा महाल साधासुधा नाही. तिथे काहीतरी गूढ आहे."

"पण त्याने कशावरून तर्क केला हा?" क. बॉरमी यानी विचारले.

"सांगतो," मि. फेलीक्स म्हणाले, "तसा काही चटकन पटणारा पुरावा त्या पोलीश मित्रापाशी नाही की आमच्यापाशीही नाही. पण मलासुद्धा असं वाटतं की तिथे काहीतरी संशयास्पद घडत असले पाहिजे. दुर्दैवाची गोष्ट अशी की तो वाडा आणि त्याच्या सभोवतालचे कुंपण यावर दोन भयानक शिकारी कुत्र्यांचा सदैव जागता पहारा असतो. रात्रंदिन वाऱ्याशीही भांडत असतात ते दोन्ही सैतान. त्यामुळे कुंपणाच्या जवळपासही फिरकणे मला किंवा पेट्रोव्हेस्कीला शक्य झालं नाही. एवढ्या मोठ्या त्या जुनाट वाड्यात केवळ एक म्हातारा नोकरच रहातो, तरीसुद्धा तिथले दिवे रात्री-बेरात्री संथपणे पेटत असलेले दिसतात. तेव्हा आमची अगदी खात्री पटली की इथं काहीतरी गूढ असलंच पाहिजे. अखेरीस आमची उत्सुकता तर एवढी ताणली की काही वाटेल ते झालं तरी या प्रकरणाचा पुरा तपास लावण्यासाठी झाव्होरस्कोईलाच भेट द्यायची."

"नाईस," सिगारेटचा फकारा सोडीत क. बॉरमी म्हणाले, व्हाट नेक्स्ट?"

"या महालापासून जवळ जवळ पाच किलोमीटर्स अंतरावर एक लहानसं खेडं आहे. खेडं कसलं म्हणा? रानगवताच्या छपराची सात-आठ बसकी घरं एकत्रित आहेत एवढंच!" मि. फेलीक्सनी म्हटले.

कर्नल बॉरमी स्वस्थ चित्ताने त्यांचं म्हणणं ऐकून घेऊ लागले.

"मुद्दामच मी या खेडेगावाला भेट दिली. तिथले शेतकरीही बरेच अतिथ्यशील. मोठ्या आदराने उठबस केली माझी त्यांनी. मी फेरीवाला व्यापारी असल्याचे त्यांना सांगितले. माझ्या जवळच्या ब्रँडीच्या बाटल्या मुद्दामच त्यांना दिसतील अशा बेताने मी पिशवीत ठेवल्या, आणि खरोखरच त्याचा अपेक्षित परिणाम झाला. ते खेडूत अगदी सलगीने माझ्याशी बोलू लागले. मग मीही ब्रँडीची एक बाटली त्यांच्यासमोर ठेवली आणि त्याबद्दल काहीच पैसा न घेण्याचे मी त्यांना जेव्हा सांगितले तेव्हा तर त्या सर्वांचे चेहेरे आनंदाने फुलले."

कर्नल बॉरमीनी कौतुकाने मान डोलावली.

"थोड्याच वेळात त्यांच्यावर ब्रँडीचा परिणाम दिसू लागला. ते अधिक मोकळेपणाने बोलू लागले. तसे खेड्यातलेच लोक ते. बिचाऱ्यांना पोटभर अन्नही जिथे मिळत नाही तिथे एवढी सुरेख ब्रँडी कुठून मिळणार? ते रंगात आल्याचे पाहून अतिशय सावधपणे मी संभाषणाची गाडी त्या जुनाट महालाकडे वळविली."

क. बॉरमीनी हातातली सिगारेट बुटाच्य टाचेखाली विझवली आणि अतिशय उत्सुकतेने ते पुढची हकिगत ऐकू लागले.

"गप्पांच्या ओघात मी म्हणालो, 'कालपरवा सहज फिरता फिरता या जंगलात मी एक चमत्कारिक गोष्ट पाहिली. एका जुनाट वाड्यासमोर एक माणूस दोन शिकारी कुत्र्यांबरोबर खेळत बसला होता. तसा तो माणूस वयस्कर दिसत होता. केसही पिकले होते त्याचे. तो ज्या कुत्र्यांना खेळवीत होता ते कुत्रे मात्र अगदी धिप्पाड आणि तिखट

होते. बरं, घरही तसं रानात, एकाकी. सभोती सारी दलदल नि काटेकुटे!"

"अगदी बरोबर. तसा आहे एक महाल इथं," त्यांच्यापैकी एक शेतकरी मला म्हणाला, "आणि आमचा तुम्हाला मित्रत्वाचा सल्ला आहे की त्या बाजूला तुमच्यासारख्या अपरिचितांनी न जाणे चांगले. त्या हवेलीचे मालक आता रशियन सैनिकांबरोबरच निघून गेलेत. तो म्हातारा नि ते दोन कुत्रेच तिथे असतात फक्त."

"अकस्मात त्या शेतकऱ्यांपैकी कोणा एकाची वृद्ध आई आमच्या संभाषणात सहभागी झाली व म्हणाली, 'काही दिवसांपूर्वीच मी अंडी घेऊन त्या हवेलीकडे गेले होते. तिथल्या त्या म्हाताऱ्या नोकराशी मी बोललेही.'

'अच्छा,' मी मुद्दामच तिच्या बोलण्याबाबतची माझी उत्सुकता प्रकट केली.

"'मी सारी खरी परिस्थिती सांगते तिथली, या लोकांना तर फारच थोडी माहिती आहे,' बसलेल्या शेतकऱ्यांकडे बोट दाखवीत ती मला म्हणाली, 'ती हवेली तशी गूढ आहे. लहानपणीच मी एका सी. आय. डी. अधिकाऱ्याकडे नोकरीला होते. तिथं खूप काही ऐकलंय नि पाहिलंयसुद्धा मी. त्यामुळेच की काय अशा गूढांबद्दल मला नेहमीच आकर्षण वाटतं नि मी त्यांचा अभ्यास करीत रहाते. या हवेलीचेही मी तसेच बारीक निरीक्षण करीत आलेय आणि माझी अशी खात्री आहे की, त्या हवेलीतला तो म्हातारा नोकरही एका तरुण स्त्रीला आपली कैदी म्हणून तिथे ठेवून आहे.'

त्या म्हाताऱ्या स्त्रीकडून आणखी बरंच काही समजण्याची शक्यता आहे. हे लक्षात घेऊन मी तिच्यासमोर ब्रँडीचा आणखी एक ग्लास ठेवला व पुढे बोलायला तिला विनंती केली.

'पण माझी' अशी खात्री तरी कशावरून झाली? तिने पुढे सांगावयाला प्रारंभ केला. 'तशी कारणेही आहेत त्याला. तोसुद्धा तुम्हाला मी सांगते नि मग या हवेलीच्या गूढाबद्दल माझी मते बरोबर आहेत की चूक आहेत ते तुम्हीच पहा. प्रामुख्याने दोन गोष्टींचे मला मोठे नवल वाटते. तिथे जो म्हातारा नोकर आहे— ज्याला अंडी विकत देण्यासाठी मी जाते— त्याचे केस साफ पिकलेले आहेत. अगदी बर्फासारखे शुभ्र दिसतात ते. पण त्याच्या चेहेऱ्याशी जर त्याच्या केसांची तुलना केली तर ती मोठी विसंगत दिसते. त्याचा चेहरा एकदम तरुण वाटतो. परवा एकदा तर मी त्याच्या चेहऱ्याचे बारीक निरीक्षण करीत उभीच राहिले.

'एवढं काय टक लावून पहाते आहेस माझ्याकडे?' त्याने वैतागून विचारले. माझी तर पार गाळणच उडाली. माझा तसा काही उद्देश नसल्याचे मी कसेबसे त्याला सांगितले व तो तणाव दूर करण्यासाठी वाड्याचे मालक कुठे दूर गेले आहेत की काय अशी सहज चौकशी केली.

'अर्थातच. इथे नाहीत म्हणजे ते दूर गेलेत. रशियन सैनिकांबरोबर ते निघून गेल्याचे वास्तविक सर्वांनाच माहिती आहे आणि इथे आता सर्वत्र जर्मन सैनिक वावरत असताना त्यांना इथे रहाणे कसे शक्य झाले असते? त्यांची रशियावरची भक्ती सर्वश्रुतच आहे. इथे फक्त मी एकटाच असतो. नाही म्हणायला दोन शिकारी कुत्रे मात्र आहेत माझ्याबरोबर,' त्या म्हाताऱ्या नोकराने सांगितले.

'तिथून घरी परतले तेव्हा माझ्या मनात एकच विचार सारखा घोळत होता. या म्हाताऱ्या नोकराचा चेहरा एवढा तरुण कसा हाच तो विचार. त्यामुळे या महालासंबंधी नि त्यातील माणसासंबंधी माझी उत्सुकता अधिकच ताणली आणि त्या माणसाला अधिक चांगल्या तऱ्हेने आणि सावधानपणे पहाण्यासाठी त्या हवेलीवर पुन्हा एकदा मी चक्कर टाकली. पिकलेले केस नि तरणा चेहरा हे व्यस्त समीकरण काही केल्या माझ्या मनातून दूर व्हायला कबूल नव्हतं.'

'त्या महालाच्या कुंपणाजवळ मी पोहोचले. तिथला रस्ता तसा मुळी वापरातच नसतो. त्यावर एवढा चिखल आहे की, एखाद्या साध्या खटाऱ्याने जरी त्याच्यावरून जाण्याचे धाडस केले तरी तो तिथेच रुतून बसेल. रस्त्याच्या दुतर्फा दाट झाडी आहे. त्यातही पुन्हा काटेरी झुडुपांचे प्रमाण अधिक आहे. तिथून ती हवेली अस्पष्टशी दिसते. मी सहज तिकडे नजर टाकली व मला आश्चर्याचा धक्काच बसला. महालाच्या एका खिडकीजवळ उभी राहून एक सुंदर तरुण स्त्री केस विंचरीत होती. मी डोळे चोळले. झुडुपे हातांनी जरा बाजूला केली व पुन्हा काळजीपूर्वक पाहिले. ती स्त्री अजूनही तिथेच उभी होती. तिचा एकंदर रुबाब आणि लावण्य पाहिल्यावर त्या महालात पूर्वी राहाणाऱ्या त्या घरंदाज रशियनांपैकीच कोणीतरी असावी असं मला वाटलं. कदाचित ती घराची मालकीणही असावी.

'हे सारं पाहिल्यावर अर्थातच त्या म्हाताऱ्या नोकराच्या बोलण्याची मला आठवण झाली. आपण त्या हवेलीत एकटेच रहातो असं खोटं का बोलला तो माझ्याशी? ती स्त्री होती तरी कोण? खरोखर माझ्या तर्काप्रमाणे तीच जर घराची मालकीण असेल तर तिने असं लपून रहाण्याचे कारण काय? त्या म्हाताऱ्या नोकराने तिला आपल्या कैदेत ठेवले होते का? असे अनेक प्रश्न माझ्यासमोर उभे राहिले आणि खरं सांगायचं तर यापैकी एकाही प्रश्नाचं समाधानकारक उत्तर अजून मला सापडलेलं नाही. तेव्हा अशी आहे या हवेलीची एकंदर हकीकत. आता तुम्हाला यासंबंधी काय वाटतं ते सांगा पाहू,' ती वृद्धा मला म्हणाली.

"या बाबतीत आपण शक्यतो अज्ञानाचं ढोंग केलं पाहिजे, एकंदर गूढात आपल्याला काही खास आकर्षण आहे असं या खेडुतांना वाटता कामा नये. याबाबत मी अतिशय सावध होतोच आणि म्हणूनच तो म्हातारा नोकर सक्तीने त्या घरमालकिणीला आपल्या कैदेत ठेवीत असला पाहिजे असा तर्क करून मी तिथल्या तिथे मोकळा झालो. अर्थात माझ्या मनात मात्र वेगळीच विचारचक्रे फिरत होती.

"या प्रकाराची आणखीही काही अधिक माहिती मिळवावी म्हणून मी गुपचूपपणे त्या वृद्धेला पाच रुबल काढून दिले. बाकीच्या शेतकऱ्यांना एव्हाना ब्रँडी एवढी चढली होती की त्यांच्या वागण्याबोलण्यात काही ताळतंत्रच उरला नव्हता. अखेरीस मी त्यांना ओरडूनच सांगितले, 'मित्रांनो, माझ्या निवासस्थानी परत फिरायला आता मला बराच उशीर होतो आहे. इथले रस्तेही एवढे खराब आहेत की रात्रीच्या अंधारात त्यावरून घोड्याला पिटाळल्यावर उद्याला त्याचे पायही शिल्लक रहावयाचे नाहीत. तेव्हा

तुमचा सहवास सोडणे यावेळी माझ्या जिवावर येत असले तरी मला निघालेच पाहिजे, "नाहीतर इथे माझ्या रहाण्याची व्यवस्था तरी व्हायला पाहिजे."

अखेरीस पूर्वी पाच रुबल दिलेल्या त्या वृद्धेलाच मी एखादी खोली मला भाड्याने देण्याची विनंती केली.

"जरूर, जरूर व्यवस्था करते मी तुमच्या रहाण्याची." तिने उत्तर दिले, "शिवाय माझ्या घराशेजारी एक छोटासा तबेलाही आहे. तिथे तुमच्या घोड्यालाही बांधता येईल."

"परत एकदा त्या शेतकऱ्यांना मी सिगारेट्स वाटल्या आणि त्या वृद्धेबरोबरच तिच्या घरी आलो. झोपता झोपता तिने त्या महालासंबंधीचे आपले अनुभव परत एकदा रंगवून सांगितले आणि आपली डोकेदुखी ठरलेल्या रशियन हेरगिरीचे केंद्र हेच असले पाहिजे याबद्दल माझ्या मनात आता तिळमात्र संदेह राहिलेला नाही."

मि. फेलीक्सनी अशा प्रकारे आपले अनुभव क. बॉरमीपुढे ठेवले आणि मोठ्या अपेक्षेने त्यांनी त्यांच्याकडे पाहिले.

"मग आता तुम्हाला काय वाटतं याबाबत मि. बॉरमी?" त्यांनी विचारले.

"याबाबत आत्ताच काही सांगता येणार नाही मला. परत एकदा तुमच्या या सर्व रिपोर्टचा विचार केल्यावरच काहीतरी निश्चितपणे सांगता येईल मला. मात्र एक गोष्ट खरी मि. फेलीक्स, की त्या हवेलीला भेट द्यायला आता मीही उत्सुक आहे." क. बॉरमींनी शांतपणे उत्तर दिले.

"थँक्स," मि. फेलीक्सने सवईप्रमाणे आभार मानले आणि पेट्रोव्हेस्कीसह तिथली आवराआवर त्यांनी सुरू केली.

"उद्या बोलूच आपण पुन्हा याविषयी." म्हणत क. बॉरमीही उठले.

एव्हांना तिन्हीसांजा झालेल्या होत्या. कडाक्याच्या थंडीच्या जोडीला आज आणखी चावरा वारा होता. रस्त्यावर कोणाचीच जाग नव्हती. झाडाझुडपात घुमणाऱ्या वाऱ्याचे वेगवेगळे आवाजच काय ते ऐकू येत होते. आता झपाझप ते निघाले होते आपल्या निवासस्थानाकडे.

दुसऱ्या दिवशी सकाळीच क. बॉरमींनी मि. फेलीक्सची भेट घेतली. रात्रभर विचार करून ते आता निर्णयाला येवून पोहोचले होते. आल्याआल्याच त्यांनी म्हटलं, "मि. फेलीक्स, तुमची त्या गूढ हवेलीबद्दलची आणि त्यातल्या 'वृद्ध' नोकरासंबंधीची मते तुमच्याएवढीच मला मान्य आहेत.

जर्मनीसाठी फारच मोठी कामगिरी तुम्ही बजावली आहे."

"मेनी मेनी थँक्स कर्नल," फेलीक्स समाधानाने म्हणाले.

"पण आता स्वस्थ बसण्यातही अर्थ नाही. काहीतरी योजना आखून हे प्रकरण तडीस नेले पाहिजे." क. बॉरमी म्हणाले नि तेवढ्यातच गरमागरम चहाचा ट्रे त्यांच्यासमोर आला.

चहा पिता पिता त्या हवेलीचे नि 'वृद्धा'चेच विचार क. बॉरमीच्या डोक्यात खेळत होते. मि. फेलीक्सना भेटलेली ती वृद्धा खरोखरच कोणा सी. आय. डी. अधिकाऱ्याच्या खास नोकरीत कधीकाळी असली पाहिजे हे त्यांनाही पटले. नाहीतर एवढ्या तपासाची तिला तरी काय जरूरी होती? तिच्या सांगण्यातून ज्या गोष्टी स्पष्ट झाल्या त्यात एक बाब निर्विवाद होती की त्या 'म्हाताऱ्या' नोकराने आपले केस रंगवून घेतलेले असले पाहिजेत. पण त्याने तसे का करावे? शिवाय आपण त्या हवेलीत एकटेच रहातो असं खोटं का बोलला असावा तो? ती तरुण स्त्री त्या हवेलीत कशासाठी रहात असावी? किंवा तो 'म्हातारा' सेवक म्हणजे खराखुरा घरमालक व ती मालकीण तर नाही ना? त्यांनी हा प्रदेश सोडल्याचे व रशियन सैनिकांबरोबर गेल्याचे केवळ नाटक केले नसेल कशावरून? तो निर्जन जागी असलेली जुनाट हवेली म्हणजे रशियन गुप्तहेरांचा अड्डा तर नसेल? मि. फेलीक्सनी टेलिफोनवरून ऐकलेले कोड मेसेज इथूनच तर दिले जात नसतील? अशा प्रकारचे अनेक विचार क. बॉरमीच्या मनात घोळत होते. चहाचा शेवटचा घोट त्यांनी संपविला नि तिथे प्रश्नशृंखलाही स्थिरावली.

अखेरीस थोड्या वेळातच मनाशी त्यांनी एक योजना तयार केली व ती मि. फेलीक्सच्या समोर ठेवली.

"असं पहा मि. फेलीक्स," क. बॉरमी म्हणाले, जर्मनांनी पकडलेल्या व नंतर त्यांच्या तावडीतून निसटलेल्या एखाद्या रशियन अधिकाऱ्याच्या पेहेरावात मी स्वतः त्या हवेलीत जाण्याचा यत्न करीन. त्या 'म्हाताऱ्या' नोकराकडे मी आश्रयच मागेन. पहिल्याने अर्थातच तो खूप आढेवेढे पण परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नंतर तो आश्रय खचितच देईल. त्या 'नोकराच्या' मनात विश्वास उत्पन्न करण्याची जबाबदारी माझी. त्यानंतर मात्र तिथली एकंदर परिस्थिती पाहूनच काय करायचं ते मी तिथल्या तिथेच ठरवीन. त्यासंबंधी अगोदर कोणत्याच योजना आखता येणार नाहीत. अर्थात हे सारं करताना आपण होऊनच मी काळाच्या जबड्यात शिरतोय याची मला जाणीव आहे. त्याचबरोबर, यापूर्वीही अनेकदा रशियन आर्मी ऑफिसर्स बनून मी सुखरूपपणे यशस्वी होऊन परत आलेला असल्यामुळे या कामातही यशस्वी होईन असा मला विश्वास आहे. रशियन आर्मी, त्यांच्या सर्व सांकेतिक खुणा यांची मला माहिती असल्याचे तुम्हालाही ठाऊक आहेच. तेव्हा तुम्हालाही हा योजनेचा आराखडा पसंत पडेलच."

मि. फेलीक्सना मात्र ही योजना तितकीशी पसंत पडली नाही. क. बॉरमींनी जाणून बुजून हा धोका पत्करू नये, दुसऱ्या काही मार्गाने त्या गूढाचा शोध लावता येईल असे त्यांचे म्हणणे होते.

पण बॉरमींचा निर्णय पक्का होता. कोणत्याही धोक्याच्या कल्पनेने पाऊल मागे घ्यायला आता ते तयार नव्हते. फेलीक्स, पेट्रोव्हेस्की यांची मदत मात्र या कामात त्यांना जरूर हवी होती. अर्थात ती सुद्धा त्यांनी हवेलीबाहेरून करावयाची होती. आत प्रवेश फक्त ते स्वतः एकटेच करणार होते.

"मि. फेलीक्स, तुम्ही आणि पेट्रोव्हेस्की दोघांनीही हवेलीजवळच्या त्या दलदलीच्या रस्त्यावरच थांबावे; तिथून ती हवेली तुम्ही नीट पाहू शकालच," क. बॉरमी म्हणाले, 'रस्त्यावरून जी खोली सरळ दिसेल तिथेच थांबण्याचा मी प्रयत्न करीन. समजा, मला काही दगाधोका आहे असे जर दिसलेच तर माझ्या जवळच्या इलेक्ट्रीक टॉर्चने खिडकीतून तीन वेळा मी सिग्नल देईन. तसं दिसलंच तर ताबडतोब तुम्ही हवेलीत घुसायचे."

अखेरी मि. फेलीक्सनीही या योजनेला मान्यता दिली.

दुसऱ्या दिवशीच सारं काम उरकून घेण्याचे त्यांनी ठरविले. शत्रूच्या कैदेतून निसटून शिणून आलेल्या रशियन सैन्याधिकाऱ्याचा वेश चढवून जेव्हा बॉरमींनी आरशात पाहिले तेव्हा त्यांना स्वतःलाच हसू आवरेना. मुलाला कुठेही व कसाही ओळखून काढण्याचा मातेचा अभिमानही गळून पडावा एवढं बेमालूम वेशपरिवर्तन झालं होतं ते! ✤

“कोण आहे?” मि. बॉरमींनी प्रवेशदारावरची बेल दाबताच आतून करडा आवाज आला. ‘रात्री-बेरात्री केव्हाही येऊन सतावतात हे लोक!’

“कृपया जरा गेटजवळ या’ मि. बॉरमी अस्सल रशियन भाषेत म्हणाले,

“एक फार महत्त्वाची गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे.”

अतिशय सावधपणे पावले टाकीत तो ‘म्हातारा नोकर’ प्रवेशदाराच्या दिशेने पुढे येऊ लागला. त्याच्या हातात एक दिवा होता आणि त्याचे ते दोन्ही भयानक शिकारी कुत्रे त्याच्यामागोमाग चालत होते. प्रवेशदार उघडून त्याने त्या दिव्याच्या प्रकाशात बारीक नजरेने क. बॉरमींना न्याहाळले. याच वेळी त्याचाही चेहेरा मि. बॉरमींना अगदी जवळून पहाता आला. त्याचे केस पिकलेले दिसत असले तरी त्यामानाने त्याचा चेहेरा खूपच तरुण आहे हे त्यांनी आता प्रत्यक्षातच पाहिले.

“जर्मन सैनिकांचे तुम्ही कोणी हितचिंतक तर नाही ना?’ भेदरलेल्या आवाजाने मि. बॉरमींनी विचारले.

“पण मला का विचारताय तुम्ही हे?”

“यासाठी की नुकताच मी त्यांच्या कैद्यांच्या छावणीतून निसटून आलोय. मी रशियन सेनाधिकारी असल्याचे तुम्ही ओळखले असालच. कोणत्याही स्थितीत इथून रशियन आघाडी मला गाठायची आहे,’ अस्खलित रशियन भाषेत मि. बॉरमी म्हणाले.

ते बोलत असताना पुन्हा एकदा त्या नोकराने त्यांना नीट न्याहाळून घेतले आणि हातातला दिवा बाजूला ठेवला. एव्हाना तो बराच विचारात पडल्याचेही त्याच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसत होते. क. बॉरमींच्या शोधक नजरेने ही गोष्ट चटकन टिपली.

“पण तू एखादा गुप्तहेर वगैरे नाहीस हे मी कशावरून समजायचं?” त्याने पुन्हा सावधपणे विचारले.

मि. बॉरमिनीही या प्रश्नावर क्षणाचाही वेळ न दवडता आपण एका घरंदाज रशियन कुळाचे असल्याचे त्याला सांगितले. एवढी बारीकसारीक माहिती सच्च्या रशियनाशिवाय अन्य कोणालाच असणार नाही असा विचार त्या ‘वृद्ध नोकरा’च्या मनात येणे अर्थातच अस्वाभाविक नव्हते.

“कृपा करून निदान ही रात्र मला आपण आश्रय द्या. बाहेर कमालीची थंडी आहे. वारा नुसता अंग चिरून काढतोय. अधूनमधून पाऊसही सडसडतोय;” दीनवाण्या आवाजात क. बॉरमी म्हणाले.

आणि त्यांची ही मनधरणी वाया गेली नाही.

“आजची रात्र आश्रय देईन मी तुला पण उद्या सकाळी मात्र तुला इथून निघावे लागेल,” तो तथाकथित वृद्ध सेवक म्हणाला, “खरं म्हणजे फार मोठा धोका पत्करतोय मी हा. दुर्दैवाने जर जर्मन सैनिकांनी तुला इथं येऊन पकडलं तर तुझ्या अगोदर माझीच गर्दन छाटतील ते.”

यापूर्वी मि. फेलीक्सकडून महालाची व त्यातल्या या गूढ नोकराची कथा ऐकल्यावर तो ‘वृद्ध नोकर’ प्रत्यक्षात नोकर नसावा, नोकर असल्याचे नाटकच तो करीत असावा असा तर्क क. बॉरमींनी त्यावेळी केलेला होता. पण तो तर्क खरा असल्याची आता त्यांना खात्री पटली होती. तो ‘वृद्ध नोकर’ रशियन भाषा एवढी स्पष्ट व अस्खलित बोलत होता की हा कोणी नोकर असावा यावर कोणाचाच विश्वास बसला नसता. मनातल्या मनात क. बॉरमी त्याला म्हणाले— “म्हातारबुवा, तुम्हाला ही भूमिका मुळीच जुळत नाहीये हो, फार मोठ्या नि गंभीर चुका करताय तुम्ही.”

अखेरी प्रवेशद्वारातून क. बॉरमींनी मृत्यूच्या गुहेत पाऊल टाकले. “पुढे चलायचंय तुम्ही”, तो म्हातारा त्यांना म्हणाला.

अगोदरच त्या हवेलीत भयानक शांतता. त्यात पुन्हा रात्रीची वेळ. बुटांच्या तालबद्ध टकटकीची स्वतःलाच भीती वाटावी अशी स्थिती!

दार उघडून ते एका प्रशस्त दिवाणखान्यात आले. एका मंद दिव्याच्या पिवळसर प्रकाशात तो दिवाणखाना न्हाऊन निघत होता. आतलं फर्निचर हवेली एवढंच जुनाट वाटत होतं. त्या दोन शिकारी कुत्र्यांपैकी एक क. बॉरमींच्या पायाजवळच येऊन बसला नि दुसरा बाहेर रेंगाळू लागला.

चेहेऱ्यावर पूर्ण अज्ञानाचा आव आणीत क. बॉरमी त्या वृद्ध नोकराला म्हणाले,— “एवढ्या उदार मनाने धोका पत्करूनही आश्रय दिल्याबद्दल हवेलीच्या मालकांचे खास आभार मानून येऊ का मी आतून?”

“छे, छे, त्याचा काहीच उपयोग नाही,” तो ‘वृद्ध नोकर’ म्हणाला, “या घराचे मालक आणि मालकीण केव्हाच रशियाला गेलीत. इथं फक्त मीच असतो नि मदतीला हे दोन कुत्रे.”

मि. बॉरमींना या उत्तराची अपेक्षा होतीच. त्यांनी उगाच हसल्यासारखं केलं आणि त्याने पुढे केलेल्या आरामखुर्चीत अंग झोकून दिलं. भिंतीवरचा तो मंद दिवा आता पिवळसर प्रकाशाचे त्यांना स्नान घालीत होता व बाकी त्या भल्यामोठ्या दिवाणखान्यात स्पष्ट अस्पष्टसा काळोखच होता. काही फुटावर तो कुत्रा त्यांच्यावर तशीच नजर रोखून बसलेला होता.

या पुढच्या काही तासात कदाचित आपण फार मोठ्या संकटात सापडणार आहोत हे क. बॉरमी जाणून होतेच. तशा स्वरूपाचे काही विचार त्यांच्या मनात घोळत असतानाच अगदी अस्पष्ट असा टेलिफोनच्या घंटेचा आवाज त्यांच्या कानी पडला. जिथे ते बसले होते त्याच्या बरोबर खालून ती किणकिण ऐकू येत होती. ‘म्हणजे इथे एखादे तळघर तर नाही ना?’ त्यांच्या मनात विचार चमकून गेला. शेजारी बसलेला कुत्राही यावेळी विशिष्ट आवाजात गुरगुरला आणि तो ‘म्हातारा नोकरही’ काहीसा अस्वस्थ झाल्यासारखा दिसला. क. बॉरमी सारं सावधपणे टिपून घेत होते. त्यांच्या लक्षात तर काही आलं नाही ना या शंकेने त्या नोकराने एक शोधक दृष्टिक्षेप त्यांच्यावर टाकला. परंतु क. बॉरमी असल्या कामात

काही नवखे नव्हते. आपल्याला जणू काही समजलेच नाही अशा आविर्भावात त्यानीच उलट त्या नोकराला विचारले, "कुत्रा का असा गुरगुरायला लागलाय ?"

त्याचा जीव भांड्यात पडल्यासारखा झाला नि तो म्हणाला—"बाजूच्या रस्त्याने कोणी तरी जात असेल झालं."

या विषयातले आपले औत्सुक्य संपले असं ढोंग करीत क. बॉरमीनी एक दीर्घ जांभई दिली.

एवढ्यात एक विलक्षण दृश्य त्यांना दिसले. ते जिथे बसलेले होते त्याच्या समोरच्या भिंतीवरचा पडदा किंचित बाजूला सरकला होता आणि दोन धारदार डोळे त्यांच्याकडे रोखून पहात होते. पलीकडे कोणीतरी तरुण सुंदर स्त्री असली पाहिजे हे त्यानी तत्क्षणी ओळखले. पण सारा प्रकार लक्षात येऊनही चेहेऱ्यावर काडीमात्र परिवर्तन त्यानी होऊ दिले नाही. समोर बसलेला तो 'म्हातारा नोकर' सिगारेट पिता पिता कसल्यातरी विचारतंद्रीत रंगलेला होता.

क. बॉरमीच्या डोक्यातील विचारचक्र जोराने गरगरू लागले. त्या म्हाताऱ्या शेतकरी स्त्रीने मि. फेलीक्सना सांगितलेल्या बऱ्याच गोष्टी सत्य होत्या. दुसराही एक विचार याचवेळी त्यांच्या मनात चमकून गेला. 'तळघरातली ती टेलिफोनची रिंग ऐकल्यावर अजून पुरती दोन मिनिटेही झालेली नाहीत. पडद्यामागची ही स्त्री बहुतेक संदेश देऊन वा घेऊन आली असावी व जाता जाता या नवख्या अतिथिला ती पाहून घेत असावी. अर्थात हवेलीला तळघर असेल तर तियेच पडद्याच्या जवळपास तिकडे जाण्यायेण्याचा रस्ता असला पाहिजे.'

अशा प्रकारे पहिल्या दहा मिनिटातच क. बॉरमिनी बऱ्याच गोष्टीचा खात्रीलायक शोध लावला होता. पहिली गोष्ट अशी होती की आपण नोकर असल्याचे जो 'म्हातारा' सांगत होता त्याने आपले केस रंगवून घेतले होते व बहुधा तो त्या हवेलीचा मालकच होता. दुसरी गोष्ट अशी की हवेलीत त्याच्याबरोबर एक तरुण स्त्री रहात होती आणि ती प्रत्यक्षात त्याची पत्नीच असण्याची दाट शक्यता होती. तिसरी गोष्ट ही की हवेलीला बहुधा तळघर होतं नि त्यातच—म्हणजे जिथे क. बॉरमी बसलेले होते त्याच्या बरोबर खाली टेलिफोन होता.

अर्थात इथे उलट आपणच सापळ्यात अडकून पडणे शक्य आहे हेही क. बॉरमीना माहिती होते. आता लवकरात लवकर, आपण मि. फेलीक्स व पेट्रोव्हेस्की थांबलेल्या रस्त्याच्या दिशेला असलेल्या खोलीतच आहोत याची खात्री करून घेणे त्यांना अत्यावश्यक होते. नाहीतर त्यांना खुणा कसे करू शकणार होते ते ? तशी खोली आपल्याला मिळाली तरच आपली धडगत आहे या विचाराने क्षणभर ते शहारलेही. तेवढ्यातच पुन्हा एकदा टेलिफोनची रिंग अस्पष्टशी त्यांना ऐकू आली. परत एकदा कुत्रा विशिष्ट आवाजात गुरगुरला आणि समोरच्या त्या 'वृद्ध नोकरालाही' आपली अस्वस्थता लपवता आली नाही. काहीतरी बोलले पाहिजे म्हणून त्याने मि. बॉरमीना त्यांना रात्रीसाठी दिलेले शयनगृह दाखविण्यासाठी बोलावून आत नेले.

आता त्यांना त्या गूढ हवेलीचे निरीक्षण करणे अधिक सुकर झाले. रस्त्यावरून ती हवेली जेवढी दिसत होती त्यापेक्षा प्रत्यक्षात तिचा आकार फारच मोठा वाटत होता. समोरच्या बाजूला लांबलचक गच्ची होती. भिंतीच्या डाव्या बाजूनाच फक्त दरवाजे होते. उजवी बाजू किल्ल्यासारखी बंद केलेली होती. जमिनीपासून जवळजवळ सहा फूट उंचीवर लहान लहान खिडक्या होत्या व त्या मात्र उघड्याच होत्या. त्यातून नुकताच उगवलेला चंद्र क्षितिजाच्या कुशीवर विसाव-



लेला दिसत होता. उंच उंच झाडांच्या रांगाही त्याच बाजूला दिसत होत्या. म्हणजे फेलीक्स आणि पेट्रोव्हेस्की ज्या रस्त्यावर थांबले होते तो रस्ता त्याच्या विरुद्ध दिशेला होता तर! क्षणभर निराशेने त्यांचंही डोकं सुन्न झालं. पण लागलीच त्यांनी स्वतःला सावरलं. ही तर संकटांची नांदी होती. तिथेच हातपाय गाळून कसे चालेल? एव्हाना त्या 'म्हाताऱ्या नोकराने' दरवाजा उघडला आणि जुन्या पद्धतीचा एक तेजस्वी दिवा पेटवून त्यांना आत बसावयाची खूण केली.

"खरं म्हणजे ही काही खास बेडरूम नाही," तो म्हणाला, "तरीसुद्धा इथं फार उबदार आणि उत्साहवर्धक वाटेल तुम्हाला."

मि. बॉरमीनी मंद हसून प्रतिसाद दिला.

"बरं तुम्ही थकून आला असाल नाही?" तो म्हणाला नि तिथल्या एका सोफावर त्यांच्या बिछान्याची व्यवस्था तो करू लागला.

बिछाना तयार करण्याचे त्याचे काम चालू असताना क. बॉरमीनी त्या गूढ 'वृद्ध नोकरा'ला नीट पाहून घेतले. त्याचे केस जरी रंगविलेले असले तरी नंतरची काळजी त्याने घेतलेली दिसत नव्हती. नंतरच्या काळात त्या केसांची जी वाढ झाली होती, त्यामुळे त्या सर्वांचा मुळाकडचा भाग काळाच दिसत होता. इतरही बाबतीत त्याची वृद्धाची भूमिका साफ फसतच होती.

बिछान्याचे काम झाल्यावर त्याने मि. बॉरमीसाठी जेवणही आणून दिलं, आणि व्यवस्था झाल्याचे पाहून त्यांचा निरोप घेऊन तो घरात परतला. जाता जाता मात्र आपण आता दुसराही कुत्रा आवारात मोकळा सोडणार असल्याचे तो सांगून गेला.

यानंतर आपल्या हालचालीवर सक्त पहारा ठेवला जाणार आहे हे मि. बॉरमीना माहीतच होते. 'हीच खोली आपणाला मुद्दाम देण्यात काहीतरी उद्देश खचित असलाच पाहिजे, नाहीतर एवढ्या मोठ्या इमारतीत पाहुण्यांसाठी बेडरूम नाही असं थोडंच होतंय?' ते मनात म्हणाले.

जेवणातही विषप्रयोगाचा काही प्रकार असेल की काय अशीही शंका त्यांच्या मनात येऊन गेली. पण ते शक्य नव्हते. त्यांचा काटाच काढायचा तर यापेक्षा अनेक मार्ग त्या वृद्ध नोकराकडे होते. त्यामुळे मि. बॉरमीनी निर्धास्तपणे जेवण घेतले. मात्र यापुढे अतिशय सावधानतेची जरूरी आहे हे लक्षात घेऊन मद्य त्यांनी टाळले. नंतर तिथे पडलेली काही पुस्तके त्यांनी उगाच चाळली नि जांभया देत कपडेही त्यांनी उतरले. प्रत्यक्षात मात्र याच वेळी आपल्यावर एका गुप्त जागेवरून पहारा ठेवला जात आहे हे त्यांच्या सावध नजरेने टिपून घेतले. भिंतीजवळ पुस्तकांची दोन कपाटे होती नि त्यांच्यामध्ये कोणा जुन्या सरदाराची तसबीर होती. सहज येरझाऱ्या घालता घालता क. बॉरमीना कळून चुकले की, चित्रातल्या सरदाराच्या डोळ्यांच्या भोकातून प्रत्यक्षात मानवी डोळे लुकलुकताहेत. भिंतीच्या पलीकडून त्यांची अशी प्रत्येक हालचाल टिपली जात होती.

पण अज्ञानाचे ढोंग करण्यात क. बॉरमी फारच निष्णात होते. त्यांनी मोठा दिवा बंद केला आणि सोफ्यावर आपलं अंग पसरून दिलं. जिथे ती तसबीर होती तिथल्या भिंतीच्या पलीकडे पावलांचे मंद आवाज त्यांनी ऐकले व ते स्वतःशीच हसले. त्यानंतर मात्र सगळीकडे स्मशानशांतता पसरली. ऐकू येत होती ती पावसाच्या थेंबांची टपटप.

तो दुसरा शिकारी कुत्रा क. बॉरमीजवळ पहाऱ्यासाठी न बसवता बागेत सोडण्यात त्या वृद्ध नोकराने फार मोठी चूक केली होती. पलीकडे शस्त्रसज्ज फेलीक्स आणि पेट्रोव्हेस्की पोलिसांचे तीन कुत्रे घेऊन वाट पहात बसलेच होते! त्यापैकी प्रत्येकजण आपलं काम चोखपणे बजावणारा आहे हे क. बॉरमीना माहिती होतंच.

थकव्याने झोप आल्यासारखे वाटल्यामुळे क. बॉरमी बिछान्यावर उठून बसले. थोड्याच वेळात त्यांना आपल्या कार्याला प्रारंभ करावयाचा होता. शेजारच्या खोलीतल्या घड्याळाने बाराचे ठोके दिले आणि पुन्हा सारं शांत झालं. पावलांचा आवाज न करता ते उठले व दरवाजापर्यंत आले. अतिशय सावधानतेने त्यांनी दरवाजा उघडला. खिशात लपवलेले रिव्हॉल्व्हर त्यांनी मुठीत गच्च पकडले आणि हळूहळू एकेक पाऊल ते पुढं टाकू लागले. बाहेर गच्चीतही सारं काही शांत वाटत होतं. सभोवतालच्या झाडीतून वाऱ्याचे वेगवेगळे आवाज तेवढे ऐकू येत होते.

पलीकडच्या रस्त्यावर फेलीक्स व पेट्रोव्हेस्की डोळ्यांत तेल घालून क. बॉरमीच्या संदेशाची प्रतीक्षा करीत होते. या घटकेला सुद्धा क. बॉरमी खिडकीतून त्यांना सिग्नल्स करू शकले असते, पण त्यांनी ते हेतुपुरस्सरच टाळले. अजूनही त्यांना ती हवेली नीट पाहून घ्यावयाची होती. कोणताच उतावळेपणा तिथे क्षम्य नव्हता. बोटांनी भिंत चाचपडत ते परत एकेक पाऊल सावधपणे पुढे सरकू लागले. गच्चीतून दिवाणखान्यात जायचा दरवाजा तसा बंद होता. तरी पण दरवाजाच्या फटीतून आतल्या प्रकाशाची एक शलाका बाहेर गच्चीत पडलेली दिसत होती. अगदी मांजरीच्या पावलाने क. बॉरमीनी दरवाजा गाठला नि कान देऊन आत काय चाललंय हे ते ऐकू लागले.

"मला अधिक काही सांगता येणार नाही, पण तुमच्या या अभ्यागताविषयी माझं मत मुळीच चांगलं नाही," ती सुंदर स्त्री त्या 'म्हाताऱ्या नोकरा'ला सांगत होती, "तो उत्तम रशियन बोलतो, तिथल्या मोठमोठ्या खानदानांची त्याला बारीक सारीक माहिती आहे हे सारं खरं, तरी पण तीन आठवड्यापूर्वी मी याच माणसाला 'वार्सा'मध्ये जर्मन लष्करी अधिकाऱ्याच्या पोशाखात पाहिल्याचे खात्रीपूर्वक सांगते."

"काय करावं तेच मला समजत नाही," तो 'म्हातारा नोकर' म्हणाला, "पण आधी तो नीट झोपलाय की नाही ते पाहून येतो. जेवणाबरोबर दिलेली दारू जर तो प्याला असेल तर स्वस्थ झोपण्यापलीकडे काहीच करता येणार नाही त्याला सकाळपर्यंत."

एवढं बोलल्यावर तो दरवाजाच्या दिशेने यायला निघाला आहे हे क. बॉरमीनी पावलांच्या आवाजावरून ओळखले. चटकन त्यांनी शेजारच्या कोपऱ्यात उडी मारली. क्षणात त्यांचं अंग घामाने डबडबून आलं. मिनिटा दोन मिनिटाच्या अवधीत आता बरंच काही घडणार होतं. रिव्हॉल्व्हरची पकड त्यांनी घट्ट केली.

पण क. बॉरमी नशिबवान. तेवढ्यातच काही कामासाठी त्या स्त्रीने त्या वृद्ध नोकराला परत मागे बोलावून घेतले.

पण परत एकदा दुर्दैवाने क. बॉरमीना दुसरा तडाखा दिला. स्वतःचे शरीर सावरीत

त्या कोपऱ्यातून उठताना तिथल्या लहानग्या टेबलाला त्यांचा धक्का बसला. त्या शांततेत तो आवाज फारच मोठा वाटला. 'बापरे! त्यांच्या कानी हा आवाज गेला असेल तर!' या विचाराने ते परत एकदा शहारले.

हळूहळू हातांनी भिंत चाचपडीत ते परत फिरले. एकाएकी त्यांच्या हाताला पडदा लागला. या हवेलीत आल्याबरोबर त्या 'वृद्ध नोकरा'शी गप्पा करीत ते दिवाणखान्यात बसलेले असताना ज्या पडद्यामागून त्याना न्याहाळणारे ते दोन डोळे दिसले होते तोच हा पडदा आहे हे त्यानी चटकन ओळखले. कारण दिवाणखान्याला पडद्याचा एकच दरवाजा आहे हे त्यांनी पूर्वी पाहून घेतलेले होतेच. 'म्हणजे इथेच तळघराचाही दरवाजा असला पाहिजे तर,' असे म्हणत हलूवार हातानी त्यानी पडदा बाजूला केला आणि पॉकेट टॉर्च पेटविली. ते एका कोपऱ्यात उभे होते. फरशीवरचा गालिचा सोडला तर कोपरा इतर कोपऱ्यांसारखाच होता. मग तळघराचा दरवाजा कुठे होता तर? सहज म्हणून त्यानी तो गालिचा दूर केला आणि तिथेच कळीचा लाकडी दरवाजा असलेला त्यांना दिसला.

पण त्यांचा हा आनंदही क्षणात मावळला. कोणीतरी सरपटत आपल्या पाठीमागून येत आहे असा त्यांना सारखा भास होवू लागला. विनाकारणच आपल्याला ही भीती वाटत असावी असा मनाला धीर देऊन त्यांनी वेळ न दवडता दरवाजाची कळ दाबली आणि टॉर्चच्या प्रकाशात जिना उतरून ते खाली तळघरात येऊ लागले. तेवढ्यातच भयानक कर्कश आवाज झाला नि त्यानी चमकून वर पहायच्या आतच कळीचा तो दरवाजा बंद झालेला त्यानी पाहिला नि मागोमाग बाहेरून बोल्ट लावल्याचा आवाजही ऐकू आला.

दरवाजापलीकडून तो म्हातारा सेवक जोरजोराने हसत होता आणि अखेरी आपणच सापळ्यात अडकलो या जाणीवेने क. बॉरमीचा घसा सुकत आला होता. ◻

काळाच्या जबड्यातून निसटणे आता आपल्याला अशक्य आहे हे क. बॉरमीनी ओळखले असले तरी एवढ्या सहजपणे मृत्यूला सामोरे जायला तयार नव्हते. मरायचंच तर ते फुकाफुकी नको, प्रतिपक्षालाही त्याची तेवढीच जबर किंमत मोजावी लागावी हा त्यांचा मानस होता. त्या कळीच्या दरवाजावर पुन्हा त्यानी हातातील टॉर्चने प्रकाशझोत टाकला आणि शत्रूच्या लक्षात येण्यापूर्वी दरवाजाला आतूनही कडी लावून घेतली.

नंतर झपाझप ते खाली आले. धान्याच्या कोठारासारखं ते एक कोंदट व जुनाट तळघर होतं. कोपऱ्यातील एका टेबलावर टेलिफोन होता नि बाजूला दोन आरामखुर्च्या टाकलेल्या होत्या. टेबलावर विविध प्रकारचे कागद पसरून पडलेले होते. तळघराला कोणत्याच बाजूला खिडकी दिसत नव्हती, मात्र डाव्या बाजूच्या भिंतीला एक दरवाजा होता आणि त्याला जुन्या पद्धतीचे भलेमोठे पितळी कुलूप लावलेले दिसत होते.

लागलीच क. बॉरमीनी खिशातली हत्यारे बाहेर काढली. या दरवाजातून बाहेर पडल्यावर रस्त्यासमोरच्या खोलीत जाता येत असले पाहिजे असा त्यांचा तर्क होता. आत्मसंरक्षणाचा तोच एकमेव उपाय होता.

दरवाजा उघडण्याची त्यांची खटपट चालू असतानाच त्या तळघरात मानवी आवाजाचे प्रतिध्वनी ऐकू येवू लागले. क. बॉरमी तर साफच गोंधळले. पुन्हा तोच आवाज कानावर आल्यानंतर तिथे कोपऱ्यात एक स्पीकींग ट्यूब बसवलेली असल्याचे त्यांच्या लक्षात आले. धावतच जावून त्यांनी ती ट्यूब उचलली व कानाला लावली. तो 'म्हातारा नोकर' क. बॉरमीना उद्देशूनच बोलत होता–

"माझ्या परमप्रिय जर्मन सुहृदा, अखेरी तूच या सापळ्यात अडकावास ना! मूर्खा, आम्हाला तू एवढे वेडपट समजत होतास? धन्य तुझी. दुसऱ्या टेलिफोनची सुरवातीलाच व्यवस्था करून ठेवण्यात आम्ही फारच दूरदर्शीपणा दाखवला म्हणायचं! आता या तळघरातून जिवंतपणे तू बाहेर पडू शकणार नाहीसच. तेव्हा उगाच तुझी उत्सुकता मरू नये म्हणून सांगतो; घरासमोरच्या बागेत जी छोटीशी घुमटी आहे ना, तिथेच आमचा दुसरा टेलिफोन आहे. आठवड्यानंतर मी खाली तळघरात येईन तो तुझे शव दफन करण्यासाठीच बरं!"

त्याचे ते पाशवी विचार ऐकल्यावर क. बॉरमीना आपलं सर्वांग गोठून गेल्यासारखं क्षणभर वाटलं. पण लागलीच त्यानी स्वतःला सावरलं आणि पुन्हा आपल्या कामाला प्रारंभ केला. अशा प्रकारची काही हत्यारे हा जर्मन घेऊन आला असेल असे त्या 'म्हाताऱ्या नोकरा'ला वाटणे शक्यच नव्हते. सुदैव परत इथे एकदा क. बॉरमीच्या मदतीला धावले. ते जुनाट पितळी कुलूप उघडण्यात त्यांना यश आले आणि कधी काळी कोणी उघडलेला जो लाकडी दरवाजा हळूहळू करकरत उघडला. समोरच्या खोलीत रस्त्याच्या दिशेने दुर्दैवाने खिडकी नसलीच तर आपला अवतारच संपला या विचाराने क. बॉरमीच्या काळजाची धडधड वाढली आणि त्यांनी त्या खोलीत प्रवेश केला. पण उंबऱ्यातच कशाला तरी ते अडखळले. टॉर्चचा झोत त्यांनी पायाखाली टाकला नि एकदम भीतीने त्यांच्या हृदयाचे ठोके क्षणभर थांबले. कोणा वयस्कर माणसाचं कुजण्याच्या अवस्थेला आलेलं ते प्रेत होतं.

पण या क्षणाला त्याचा विचार करण्यापूर्वी आपल्या स्वतःच्या अडचणी सोडवण्यासाठी त्यांना धडपडावयाचे होते. रस्त्याच्या दिशेने भिंतीला खिडकी आहे की काय हे पहाण्यासाठी त्यांनी स्विच ऑन केला व तत्क्षणी आनंदातिशयाने ते वेडे होऊन गेले. भिंतीवर मध्यभागीच रस्त्याच्या दिशेने एक खिडकी होती व तीवर काळ्या जाड कापडाचा पडदा सोडलेला होता. आता त्यांना भीती नव्हती.

हातातल्या टॉर्चने खिडकीतून रस्त्याच्या दिशेने त्यांनी तीन सिग्नल्स केले. मि. फेलीक्स आणि पेट्रोव्हेस्की यांच्या ते लक्षात


फुकट, फुकट, फुकट,

**पांढरे डाग**

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पांढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॅकेट औषध फुकट मागऊन फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**

यावेत म्हणून मनोमनी परमेश्वराची प्रार्थना केली. चंद्र निवांतपणे आकाशात वर वर सरकत होता नि त्याच्या चांदण्यात हवेलीच्या गेटपर्यंतचे सारे दृश्य त्या खिडकीतून क. बॉरमीना दिसत होते. एकदम आनंदाने ते ओरडलेच! फेलीक्स व पेट्रोव्हेस्की गेट ओलांडून हवेलीच्या दिशेने धावत येत होते.

क. बॉरमी झपाझप पुन्हा तळघरात आले नि जिना चढून त्या कळीच्या दरवाजाजवळ येऊन थांबले. वरच्या हॉलमधून ठो ठो असे अस्पष्टसे आवाज त्यांच्या कानावर आले. 'खचितच माझ्या सहकाऱ्यांच्या बंदुकांचे आवाज आहेत हे." ते स्वतःशीच म्हणाले व अधीरतेने पुढे काय होते याची वाट पाहू लागले. पुन्हा सर्व शांत. ते काहीसे अस्वस्थ झाले. पुन्हा वरून एक आर्त किंकाळी ऐकू आली. वरच्या कोपऱ्यात परत गालीचा टाकलेला असेल तर कदाचित आपल्या मित्रांना तळघराचा दरवाजा सापडणार नाही म्हणून उजव्या हाताच्या मुठीने त्यांनी तो लाकडी दरवाजा ठोठवायला प्रारंभ केला. आतला बोल्टही काढून टाकला. जवळ जवळ पाच मिनिटांनी त्या दरवाजाचा आतला बोल्टही काढल्याचा आवाज त्यांच्या कानांवर आला व मागोमाग तो कळीचा दरवाजाही उघडला. समोर फेलीक्स आणि पेट्रोव्हेस्की उभे होते. आनंदाने बेहोश होऊन त्यांनी क. बॉरमीला घट्ट मिठ्या घातल्या.

आपल्या दोघाही सुहृदांबरोबर क. बॉरमी जेव्हा बाहेर दिवाणखान्यात आले तेव्हा म्हातारा नोकर असल्याचे नाटक करणारा तो रशियन हेर न त्याची पत्नी पायात बेड्या पडलेल्या अवस्थेत खाली मान घालून बसलेली त्याला दिसली. पळून जाण्याचा प्रयत्न करताना फेलीक्सच्या कुत्र्यांशी झालेल्या झटापटीत दोघांचाही पोशाख काहीसा फाडला गेलेला दिसत होता. त्या रशियन हेराचे दोन्ही शिकारी कुत्रे प्रवेशदारापाशीच पेट्रोव्हेस्कीच्या बंदुकीला बळी पडलेले होते.

आता या रशियनांची टर उडविण्याची संधी क. बॉरमीना मिळालेली होती. "पान उलट पडलंय आता, माझ्या रशियन सुहृदांनो," ते म्हणाले, "तळघरात कोंबून उपासमारीने मला मारण्याचा बेत होता ना तुमचा? पण आता त्याच्या विपरितही घडू शकेल. एका बाबतीत या विदुषीला मात्र मानतो हं. वॉर्साला मला जर्मन सेनाधिकाऱ्याच्या पोशाखात पाहिल्याचे तिला नीट आठवले. मलाही आठवतो तो प्रसंग आता. त्यावेळी तुम्ही दोघेही तिथं होता. पण आज केस पिकून आलेल्या या नटसम्राटाचे केस त्यावेळी अगदी काळेभोर होते."

करकरून दातओठ चावीत नि डोळ्यातून आग ओकीत त्या रशियन हेराने त्यांच्याकडे पाहिले.

मि. फेलीक्सना बरोबर घेऊन क. बॉरमी नंतर त्या तळघरात गेले व तिथले सारे कागदपत्र त्यांनी गोळा केले. त्यातले बरेचसे कागद त्या दोघांच्या हस्ताक्षरातलेच होते. मात्र पलीकडच्या खोलीतले ते प्रेत कोणाचे याचा काहीच सुगावा लागत नव्हता.

पेट्रोव्हेस्कीने अनेकदा त्या दोघांनाही त्या प्रेतासंबंधी विचारून पाहिले पण एका शब्दानेही त्यांनी उत्तर दिले नाही.

क. बॉरमी आणि सहकाऱ्यांची इतर आवराआवर चालली असतानाच इकडे त्या रशियन जोडप्याने मात्र त्यांना साफ चकवले. दोघांनीही त्यांच्या नकळत विष भक्षण केलं. पेट्रोव्हेस्कीच्या लक्षात ही गोष्ट आली तेव्हा तो जोराने किंचाळलाही, पण त्याचा काहीच उपयोग नव्हता.

एव्हाना पहाट होत आलेली होती. पाऊस अजूनही शिडशिडत होता.

वेळ न दवडता फेलीक्स नि पेट्रोव्हेस्कीने दफनाची तयारी केली व त्या अज्ञात शवाबरोबर ते रशियन दांपत्यही भूमीच्या उदरात चिरनिद्रा घेऊ लागले.

नंतर आणखीन एक दिवस ते तिघेही त्या हवेलीचा कसून तपास करीत होते. हा तपासही व्यर्थ ठरला नाही. जर्मन पिछाडीवर वावरणाऱ्या आणखी तीन रशियन हेरांचा त्यामुळे सुगावा लागला.

तिसऱ्या दिवशी ते तिघेही त्या हवेलीतून बाहेर पडले तेव्हा सर्व बाजूंनी धुकं त्या हवेलीभोवती जमा होऊ लागलं होतं. त्या धुक्यात ती जीर्ण इमारत दुरून अस्पष्टही दिसत नव्हती. □ □

(आधारीत)

---

# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : **छत्तीस रुपये**

सहामाही : **वीस रुपये**

परदेश : (जलमार्गे)
**पंचावन्न रुपये**

पुस्तके

# शुभसंचिताचे स्वस्तिक

प्रा. ग. भा. जोशी

गेल्या काही वर्षातील मराठी कवितेनं अनेकविध रूपं धारण केली आहेत. विशेषत: ग्रेस, महानोर, अनुराधा पोतदार, शंकर वैद्य, वसंत सावंत, वामन इंगळे, विलास कुलकर्णी, शांता शेळके यांच्या अलीकडच्या कविता आणि त्याचबरोबर वामन निंबाळकर, नामदेव ढसाळ, चंद्रकांत खोत यांच्या काव्यापर्यंत जर आपण नजर टाकली तर सारांश रूपानं आणि स्थूलमानाने आपल्याला असं म्हणता येईल की, मराठी कवितेचं रूप विविधांगी आहे. सोप्या भाषेत असं म्हणता येईल की, ही कविता सुरवरूप तशी कुरूप, सोपी तशीच सुबोध, हलकी फुलकी तशीच गंभीर, वालबोध तशी कृत्रिम, संकेत प्रिय आणि संकेताना झिडकारणारी, आत्मनिष्ठ तशी समाजनिष्ठ, कवितेला त्याच त्याच पारंपरिक विषयात मर्यादित करणारी आणि विषयान्तर करणारी– भाषा, विषय, रचना यांची अन्तरबाह्य बंधने तोडून टाकणारी, प्रिय-अप्रिय कविता उदंड लिहिली गेली आहे.

मराठी वाचक सोशिक म्हणा, चोखंदळ म्हणा, रसिक म्हणा, नाविन्याची आवड असणारा म्हणा तो आजही ही कविता प्रेमानं, आपुलकीनं. सहृदयतेनं वाचतो आहे. आवडणारी कविता पुन्हा पुन्हा वाचतो आहे, तर नावडणारी कविता दुर्लक्षितो आहे. कवितेवर चर्चा करतो आहे. आणि आपलं वर्तमान जीवन सुसह्य करतो आहे. तृषार्त मनाला गारवा निर्माण करतो आहे. अशा स्थितीत आपुलकीनं वाचावा आणि बऱ्याच अंशी संतुष्ट व्हावं असा एक अलीकडचा अगदी नवा कोरा काव्यसंग्रह म्हणजे ' स्वस्तिक ' हा होय. 'पॉप्युलर प्रकाशन 'ला साजेल अशा परंपरेत या काव्यसंग्रहाची मांडणी मोठी चित्तवेधक झाली आहे. मुखपृष्ठ, छपाई, सजावट कोणाचेही मन आकर्षून घेईल इतकी सुरेख आहे.त

## कवितेचा प्रवास

मला आठवते सुमारे ११ वर्षापूर्वी सावंतवाडीच्या महाविद्यालयात आम्ही काही मित्रांनी वसंत सावंताच्या कविता ऐकल्या होत्या. बाहेर धुवांधार पाऊस कोसळतो आहे आणि कवी आपली ताजी नवीन कविता " शब्दात पकडता येत नाही इतका पाऊस-आणि तुझ्या आठवणी " ही तन्मयतेनं वाचतो आहे. तेव्हापासून कवीचा काव्य प्रवास चालू आहे. मित्रांच्या कोंडाळ्यात, रसिका समवेत, वृत्तपत्रात आणि मासिकात त्यांची कविता आकारते आहे, फुलते आहे, बाढते आहे. कवीला ओढ आहे अमर्याद अशा निळ्या–निळ्या आकाशाची, विराट महासागराची, विकसित होणाऱ्या चंद्रकोरीची, कोकणातल्या तांबड्या मातीची, सह्याद्रीच्या घनदाट आसमंताची, डोंगरकड्याची! कोकणातल्या या नैसर्गिक वातावरणात ती अंकुरते. मंद तेवणाऱ्या निरांजनाच्या प्रकाशात उजळून निघते. संस्कारीत अशा शब्दसामर्थ्यानं ती धीट होते. तरल, सूक्ष्म, नाजूक संवेदनानी ती साकारते. संपूर्णत: ती विशुद्ध आणि आत्मपर आहे. निसर्गाची, संस्कृतीचा, शब्दकलेची, सवेदनाची प्रतिमांची सारी सारी शुभचिन्हे ' स्वस्तिक 'मध्ये वाचकांच्या प्रत्ययाला येतात.

## बाह्यरूप

' स्वस्तिक ' वरवर जरी चाळला तरी प्रथमदर्शनीच काही विशेष नजरेत भरतात. १ : ' स्वस्तिक 'मधील जवळ जवळ सर्व कविता कवी ' मी 'च्या आहेत. सर्वस्वी आत्मनिष्ठ आहेत. २ : कवीला स्वत:ला, स्वत:च्या मनाला, डोळ्याला, जे जे जाणवलं, भावलं, समजलं, दिसलं, ते ते सारं सरळ शुद्ध मनानं आणि भावनेनं चित्रीत केलं आहे. त्यात असत्य, खोटेपण, अनैसर्गिक किंवा कृत्रिम असं काहीही दिसत नाही. कवी स्वत:शी एकनिष्ठ आणि प्रामाणिक आहे. भडकपणा, नकलीपणा, ढोंगीपणा, ऊरबडवेपणा, आक्रस्ताळेपणा याचा लवलेशही जाणवत नाही. हा विद्यमान काळातला ' दुर्मिळ ' होत जाणारा गुण या काव्यसंग्रहात विशेषत्वानं जाणवतो. ३ : आजच्या संघर्षमय, रखरखीत, दिखाऊ जीवनव्यवहारापासून ही सारी कविता अलिप्त आहे. तिला वासनेचा, अतिवास्तवतेचा, जीवन कलहाचा, जीवनातील क्षुद्रतेचा, किंवा कोणत्याही ' इझमचा ' वास नाही, स्पर्श नाही, शाप नाही. उलट आत्मसंतुष्टतेच्या पोटी भाबडेपणा जाणवतो. काव्यमय भावजीवन जगणारा असं कवीचं सार्थ वर्णन करावं लागेल! ४ : काव्यसंग्रहाची ' अर्पण पत्रिका ', ' स्वतिक ', ' मनामनाला देह नवे ', ' श्रीरंग ' ' मुक्या जंगलातून जाताना ', ' वळणावरती वळण ', ' खूण ', ' दासांच्या पादुका नेताना ', 'जन्मवाद ', ' तो एक आणि तो एक ' इत्यादी सारख्या कवितेचं सामर्थ्य शब्दकळा, सगुण श्रद्धा, शुभसंचित यात दिसतं. ५ : सर्वसामान्य किंवा सर्वमान्य कवीला भुरळ घालणारे, मोहित करणारे जवळ जवळ सारे विषय या कवीनं स्पर्शिले आहेत. ' स्त्री-पुरुष ', ' प्रियकर-प्रेयसी ' हा विषय तर मानवी जीवनाच्या प्रारंभापासून तो आतापर्यंत न संपणारा, तरीही प्रत्यही नवंनवं काहीतरी देणारा, सांगणारा असा आहे. परांतर प्रवेश, परतत्त्वाचा शोध हा साधनेचा, संशोधनाचा, आव्हानाचा विषय ज्यानं त्यानं आपल्या मगदुराप्रमाणं हाताळावा. (तिने मला पाहिले...प्रश्न तुझे उत्तर मी ! पाठमोरी...फिका चंद्रमा भरला सागर...जन्मजोग...,दीपच झाकू लागतात. प्रकाश... आणि घुमसत्या प्रश्नांना,...चांदण्यात सुरूचे झाड अंगावर कोसळावे...मृग...साथी... मिठी...इत्यादी कविता) ६ : बालकवी, तांबे, बोरकर, कुसुमाग्रज, अनिल पाडगावकर, इत्यादी पूर्वसूरींच्या सुरांचा, प्रभावही काही कवितेवर आहे हे जाणवतं. (विशेषत: ' मनामनाला देह नवे ', तुझी लाभली ना घनाकार छाया ', ' जन्मजोग ', ' निळे शिल्प ', ' धुके ', ' शब्दात पकडता येत नाही ', ' चंद्रवेळ झावळीत ', ' दर्यामूर्त आकाश,' अकल्पित यात्रेतला मी प्रवासी, '

'टिळा लाव माझ्या जुन्या अक्षताना', या कविता) पण त्याचंबरोबर कवीचं स्वतंत्र अस्तित्व, आणि दृष्टिकोणही प्रत्ययाला येतो.

### अंतरंगात

काव्याच्या अन्तरंगात प्रवेश करताच जाणवतात त्या सुंदर सुंदर, विशुद्ध प्रतिमा, जाणवतं स्वरशिल्प, सुबोध शैलीत गुंफलेलं काव्यजीवन, रंगगंधाचा हवाहवासा वाटणारा सुगंध, निसर्गाची चित्रलिपी आणि इंद्रधनुष्याचं सौंदर्य! श्रद्धा, आर्तता, एकाग्रता यातून निर्माण झालेली सखोल माणसाची, निसर्गाची, स्वप्नांची ओढ हाच 'स्वस्तिक'चा आधारभूत पाया आहे. मांगल्य, पावित्र्य, सश्रद्ध अंतःकरण यांचं सामर्थ्य क्षणोक्षणी जाणवतं. निसर्ग, चंद्र, चांदणं, लताकुंज, वृक्षवेली या सग्या सोयऱ्यांच्या संगती घेऊन कवी एकेक सुरेख प्रतिमा, तरल प्रतिमा, नाजूक प्रतिमा निर्मितो. आणि अंतरंग समृद्ध, सचेतन करतो. अमूर्ताचा दिव्य आणि भव्य शोध घेण्याचा सफल प्रयत्न करतो. हेच कवितेचं मर्म, आणि हेच सामर्थ्य आहे.

'रंगमोर आठवणी...' कंकणाच्या किरमिजी आवाजाची सनई'...' अश्रूंची स्वस्तिके'...' सावल्याना चंद्रगीताची घाई' 'प्रकाश झाले प्राण थेंब...' 'पहाट नेसुनिया हसती'...' देहाचा पद्मबंध' 'स्वप्नांचा आकाशझुला'...' रंगलक्षीमन',...' क्षितीज लाजरे कुशीत आत आत कोंदले' 'दिठीत रक्त साकळे'...' आसावरीत बुडालेली तारांची रांगोळी'...' उधळीत पिंजर तरल धुक्याचे'...' निळे शिल्प भासातुनी शाश्वताच्या',...' वेलविजेची निळी प्रकाशे' 'आकाश संपले आहे' 'चांदण्यात सुरुचे झाड' 'जिथे झाडे रात्रीचे धुके पांघरतात' 'धुक्यावती सावल्या झाल्या'...' दिशाच्या पाकळ्या'...' आभाळ भुईवर येते'... 'डोले घन घन गोविंद!' अशा सुरेख कल्पना, प्रतिमा जागोजाग मुक्तपणे विखुरल्या आहेत.

'स्वस्तिक'चा आस्वाद घेत असतानाच या काव्याला मिळालेल्या पारितोषिकाची आनंददायी आणि शुभ वार्ता आली. कविराज! हा शुभशकून समजा! रसिकांच्या साऱ्या अपेक्षा पूर्ण कराल आणि 'स्वस्तिक'ची भावी वाटचाल शुभकारक कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो. ◻

शुभसंचिताचे स्वस्तिक
कवी : वसंत सावंत
किंमत : ५ रु. पृष्ठे ८०
पॉप्युलर प्रकाशन मुंबई


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७–०० |
| २. | पुरंदऱ्यांची दौलत | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ३. | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ४. | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३–५० |
| ५. | पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ६. | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४–०० |
| ७. | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७–०० |
| ८. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| ९. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |
| १०. | पूर्णिया | अनिल अवचट | ६–०० |
| ११. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १२. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर | ८–०० |
| १३. | संध्याकाळ | गजानन जागीरदार | १०–०० |
| १४. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १०–०० |
| १५. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| १६. | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४–०० |
| १७. | अग्निपुत्र | वसंत पोतदार | १४–०० |
| १८. | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५–०० |
| १९. | शतपावली | रवींद्र पिंगे | १०–०० |

**आगामी प्रकाशने**

| | | |
|---|---|---|
| २०. | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर |
| २१. | मी नेताजींना बघितलंय | अशोक शहाणे |
| २२. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ सुमती देवस्थळे |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३० : ५७३५९**

मध्यंतर

# चंद्रलेखाची 'गरूडझेप'

## शतकमहोत्सवाच्या निमित्ताने

प्रत्येक भाषेला स्वतःचा प्रदेश असतो तसेच त्या प्रदेशाचा इतिहास असतो. विशिष्ट भाषिक रसिकवर्ग असा शब्दप्रयोग करताना हे इतिहासाचे (राजकीय सामाजिक व सांस्कृतिक) समान संचित असणारा रसिकवर्ग आपल्याला निर्देशित करावयाचा असतो. मराठी प्रेक्षकवर्गाच्या अनेक समान वैशिष्टयांपैकी शिवाजीभक्ती हे एक प्रमुख वैशिष्टय आहे. किंबहुना महाराष्ट्रातील कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगी स्वतःला आश्वासन देण्यासाठी शिवाजीप्रतिमेचा आपण आधार घेत असतो. याचा अर्थ स्पष्ट आहे : आता मराठी माणसांच्या लेखी शिवाजी म्हणजे केवळ एक इतिहासप्रसिद्ध व्यक्ती नसून ती अनेक आदर्शांचे प्रतीक असणारी अतिमानवी प्रतिमा आहे. महाराष्ट्रात शिवकथा हा इतिहास नसून पुराणकथा आहे. ज्यावेळी एकादी विशिष्ट व्यक्ती वा प्रसंग इतिहासाच्या पानावरील तपशील न राहता, त्यापेक्षाही अधिक जिवंत असा भावनिक अन्वय वर्तमानाशी साधतो त्यावेळी त्या विषयाला स्पर्श करणाऱ्या कलावंताचे कार्य एकाच वेळी सोपे आणि अवघड होत असते. ते कार्य सोपे असते कारण प्रेक्षक त्या विषयात आधीच गुंतलेला असतो. ते अवघड असते कारण त्या प्रेक्षकाची विषयाशी असलेली गुंतवणूक जरा बाजूला करून नव्या कलात्मक अनुभवापर्यंत त्याला न्यायचे असते. प्रेक्षक विशेष जाणता नसेल तर त्याच्या मनातील विशिष्ट परंपरागत अशा प्रतिमेपासून दूर जायलाही तयार नसतो. ऐतिहासिक नाटयलेखन हे असे अवघड असूनही आजच्या युगात आपल्याच देशात नाही तर सर्वत्र नाटककार या प्रयत्नांकडे का वळतात? एक तर ऐतिहासिक नाटकातील घटनापरंपरा, विशिष्ट संघर्षांची परिणती प्रेक्षकांना आधीच ठाऊक असते. त्यामुळे नाटककाराला त्यापलीकडे जाऊन घटनांचे, ऐतिहासिक काळ आणि माणसाच्या नैसर्गिक प्रतिक्रिया यांच्यातील नात्याचे, भूतकाल व वर्तमानकाल यातील अन्वयाचे नवे व्यूह रचणे शक्य होते. त्यातूनच इतिहासाचे नवे संजीवित रूप निर्माण होते. परंतु मराठी नाटककाराची प्रवृत्ती ऐतिहासिक कलाकृती ढोबळ प्रबोधनासाठी वापरावयाची असल्यामुळे अनेकदा दिमाखदार बोधकथा एवढेच तिचे मर्यादित स्वरूप शिल्लक रहाते. स्वप्नरंजनासाठीच लेखक व प्रेक्षक दोघेही ऐतिहासिक कलाकृतीचा उपयोग करतात. १९६० च्या सुमारास कादंबरी व नाटक या दोन्ही क्षेत्रात ऐतिहासिकतेच्या लोकप्रियतेची एक नवी लाट आली. ती आली मुख्यतः 'स्वामी'कार रणजित देसाई आणि 'रायगडला जेव्हा जाग येते' चे कर्ते वसंत कानेटकर यांच्यामुळे. याच दोन लेखकांनी एकत्र येऊन 'गरूडझेप' हे नवे नाटक रचिले आहे. 'स्वामी'च्या लेखनानंतर रणजित देसाई यांनी 'श्रीमान योगी' साठी केलेला शिवकालाचा व्यासंग मराठी वाचकवर्गास विदित आहेच. परंतु कादंबरीकार देसाई यांना मिळालेले यश आजवर नाटककार देसायांच्या वाटयाला येत नव्हते. उलटपक्षी कानेटकरांचा नाटयरचनेतील हातखंडा आणि गल्या काही वर्षातील त्यांचे यश अपरिमित होते. असे दोन नाटककार एकत्र आल्यानंतर 'गरूडझेप'मध्ये ऐतिहासिक नाटकाच्या नव्या सामर्थ्याचा प्रत्यय येईल असे वाटले होते. परंतु 'गरूडझेप' या नाटकाचा प्रयोग पाहताना केवळ निराशाच वाटयाला येते.

'गरूडझेप' या नाटकाचा कालखंड शिवचरित्रातील एक अत्यंत नाटयपूर्ण कालखंड आहे. या कालखंडातील नाटय केवळ आग्र्याहून सुटका या घटनेपुरते मर्यादित नसून शिवाजीच्या राजकारणी जीवनाशी निगडीत आहे. शिवकालविषयक बखरींमध्येही या कालखंडाचे रोचक वर्णन आढळते. परंतु नाटयपूर्ण वाटणाऱ्या घटना पुढे असणे गोष्ट वेगळी आणि त्यातून नाटकाची निर्मिती करणे ही गोष्ट वेगळी. मराठीतील एक नामवंत नाटककार आणि एक नामवंत कादंबरीकार एकत्र येऊनही केवळ एकापुढे एक प्रसंग यापलीकडे नाटकाची रचना उभी राहू शकलेली नाही. 'गरूडझेप' हे शीर्षक अन्वयार्थक करण्याचे प्रयत्न केवळ कृत्रिम झाले आहेत. एक राजकारणी म्हणून शिवाजीचे चित्र रंगविण्याचा हा प्रयत्न नाही, तो माणूस म्हणून उभा केला आहे असे या नाटकाविषयी म्हटले जाते. या स्वरुपाचे प्रयत्न सफल व्हायला त्या काळाकडे, मानवी नात्याकडे पाहण्याचा एक सखोल, संथ दृष्टिकोन आवश्यक असतो तो या नाटयरचनेत अभावानेच जाणवतो Holy Grail विषयीच्या वाङ्मयात ख्रिस्त ग्रे सुटात दाखविण्याचे यशस्वी यत्नही पाश्चात्य साहित्यात दिसतात. परंतु त्यामागे विषयाची सखोल समज असते. याउलट या नाटकात भपकेबाज सजावटीला प्राधान्य आहे. अशा दृष्टिकोनाने सादर झालेल्या नाटकातून मानवी नाते कसे व्यक्त होणार?

या नाटकाचे दिग्दर्शन मा. दत्taराम यांनी केले आहे आणि प्रमुख भूमिका श्रीकांत मोघे यांची आहे. श्रीकांत मोघे हे हलक्या फुलक्या भूमिकांसाठी विशेष प्रसिद्ध आहेत. पूर्वी त्यांनी 'राजयाचा पुत्र अपराधी देखा' या नाटकात संभाजीची भूमिका केली होती पण मी ती पाहिलेली नाही. मोघ्यांची शब्दांच्या उच्चाराची आणि विशेषतः वाक्याचा अंत वर उचलण्याची खास ढब आहे. या नाटकात मा. दत्तारामांच्या उच्चारशैलीचे संस्कार आणि स्वतःची नैसर्गिक उच्चारशैली याचे इतकी विचित्र सरमिसळ मोघ्यांनी केली आहे की त्यामुळे त्यांची वाणी कृत्रिम वाटते. यातील औरंगजेब प्रभाकर पणशीकरांच्या औरंगजेबाची नक्कल करण्याचा आटोकाट यत्न करतो. जिजाबाईच्या भूमिकेत आशालता दिसतात. त्यांनी जिजाबाईचे वृद्धत्व चालीच्या थका-

वटीत दाखवले, आवाज मात्र तरुण, गोड असाच राहिला त्यामुळे संपूर्ण व्यक्तिमत्त्व काही उभे झाले नाही.

या नाटकाचे अनेक प्रयोग झाले आणि नंतर आता शिवराज्याभिषेकास तीनशे वर्षे पुरी होत आहेत त्यानिमित्ताने नाटकाची जाहिरात करून राज्याभिषेक सोहळा दाखवला जाऊ लागला. तीन मेच्या प्रयोगात औरंगजेबाला तीन शिवाजीही दिसले. नाटक म्हणजे काय विविध करमणुकीचा कार्यक्रम आहे का? की एक कार्यक्रम बदलून त्यात दुसरा घातला? अशी प्रदर्शनीय प्रलोभने दाखवून नाटक चालविणे म्हणजे मुळात नाटक कमकुवत असल्याची जाहिरात करण्यासारखेच आहे.

प्रथमपासूनच नाटकाला अप्रस्तुत अशा तपशीलांची जाहिरात 'गरुडझेप'च्या संदर्भात होत आहे. या नाटकाचा मुहूर्त लता मंगेशकर यांच्या हस्ते झाला हे प्रत्येक प्रयोगास जाहीर करण्याचे कारण काय? असो. 'चंद्रलेखा'ला बऱ्याच दिवसांनी द्रव्ययोग आला हेही नसे थोडके! ◻

# वर वर किस्नाऽऽ समान

## 'उपासना'चे मुक्तनाट्य

मराठी तमाशाचे नागरी कलावंतांच्या हाती लोकनाट्य झाले आणि या लोकनाट्याचे मुक्तनाट्यही होऊन खूप दिवस झाले. परंतु अजूनही मूळ तमाशा माध्यमातला मुक्त आवेग काही नागरी कलावंतांना गवसत नाही. किंबहुना व्यावसायिक रंगभूमीवर तर या मुक्तनाट्याचा एक ठरीव साचा बनला आहे. विजय तेंडुलकरांसारख्या कल्पक नाटककाराच्या हाती सुद्धा या माध्यमाचे वेगळे काही होऊ शकलेले नाही. ('फुटपायरीचा सम्राट') गेल्या काही वर्षात प्रायोगिक रंगमंचावर वावरणाऱ्या मंडळींना तमाशा माध्यमातील सबीजतेची जाणीव झाली आहे. या माध्यमाच्या गाभ्यात अजून बरेच अस्सल नाटक लपलेले आहे की ज्याचा उलगडा अजून कलावंतांना होत नाही आहे. युरोपीय रंगमंचावरील प्रायोगिक नाटककारांनी आणि दिग्दर्शकांनी ज्याप्रमाणे त्यांच्याकडील म्युझिक हॉल, क्लाऊन शोज इत्यादी पारंपारिक माध्यमाचे पुनर्संशोधन केले तसे आपल्याकडे अजून झालेले नाही. या संदर्भात विजया मेहता यांनी केलेला एक उल्लेख मला लक्षणीय वाटला. त्यांच्या परदेशच्या वास्तव्यात त्यांनी Alfred Jany च्या 'uby Roi' या प्रसिद्ध नाट्यकृतीतील काही भाग तमाशा पद्धतीने सादर केला होता. आपल्याकडील गेल्या काही वर्षांतले दशावतारी, वा तमाशारूपाकडे जाणारे प्रयत्न बरेचसे नव्या सजावटीच्या स्वरुपाचे होते. त्यामुळे या प्रयत्नांनी खास काही साधले नाही तरी नवी मंडळी त्याकडे लक्ष देत आहेत यात समाधान मानायचे का? हे लक्ष जर काही विशिष्ट दृष्टिकोन घेऊन आले नाही तर कारणी लागणार नाही.

हा सारा प्रपंच 'वर वर किस्नाऽऽ समान' या माधव साखरदांडेकृत मुक्तनाट्याच्या निमित्ताने केला. हे मुक्तनाट्य 'उपासना' या प्रायोगिक संस्थेने सादर केले. या नाट्याचे दिग्दर्शन आनंदा नांदोस्कर आणि दिलीप कोल्हटकर यांनी केले आहे. 'षड्ज' या नाटकाच्या दिग्दर्शनापासूनच दिलीप कोल्हटकर या तरुण दिग्दर्शकाकडे आपले सर्वांचेच लक्ष वेधले होते. त्यानंतर 'बुटपॉलिश' आणि 'एक अंडे फुटले' या नाटकाच्या दिग्दर्शनातील त्यांची कल्पकता आणि कार्यक्षमता दोन्ही वाखाणण्याजोगी होती. विशेषत: मुक्तनाट्याच्या संदर्भात बोलताना 'एक अंडे फुटले' या नाटकातील साधनरहित लोकनाट्याविष्काराचा विशेष उल्लेख करायला हवा.

या सर्व पार्श्वभूमीवर 'वर वर किस्नाऽऽ समान' या मुक्तनाट्याचा विचार करता निराशा होते. कारण मुळात लेखकानेच काही माध्यमसंशोधनाचा विचार वा प्रेरणा मनाशी ठेवून लेखन केलेले नाही. नागर लेखकाने नागर कलावंतांसाठी लिहिलेले मुक्तनाट्य म्हणून त्यात काही विशेष सामाजिक उपहास-उपरोध आहे असेही होत नाही. मुक्तनाट्य सादर करताना गवळण गाळून पुढे नाट्याच्या ओघात अनेक ठिकाणी 'मनोरंजनाचा कार्यक्रम' म्हणून नृत्य घालणे हे या मुक्तनाट्याचे लेखक व सादरकर्ते दोघांच्याही मनात असलेल्या गोंधळाचे लहानसे उदाहरण. पदे मुळातच तमाशा घाटणीची न लिहिता गीतपद्धती होती. त्यात शोभा राणे या पार्श्वगायिकेचा पट्टीचे भान न राखणारा आवाज भावगीत गायिकेसारखा आहे. त्यामुळे नृत्याच्या गायनाला अस्सलपणाचा स्पर्श नव्हता. विजयश्री ही नर्तिका पाहुणी कलावंत. त्यामुळे तिच्याविषयी लिहिण्याची गरज नाही. या संचातील शाहीर, आवाज, आविर्भाव, शरीरयष्टी कोणत्याही संदर्भात न शोभणारा असाच होता. यामुळे मुक्तनाट्याचा बाहेरचा सांचा फारच कमकुवत झाला.

या मुक्तनाट्यात आनंदा नांदोस्कर या नटाने किस्ना कासाराची प्रमुख भूमिका केली. या एका नटाला मुक्तनाट्यातल्या मुक्तपणाचा स्पर्श झाला होता. लोकनाट्याला आवश्यक असे लवचिक शरीर या नटाला लाभले आहे. पण प्रचलित लोकनाट्यातील लोकप्रिय सोंगाड्याचे अनुकरण करण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे अभिनयातली उत्स्फूर्तता नाहिशी झाली. या नटाची मी पाहिलेली ही पहिलीच भूमिका. इतक्या सुरुवातीच्या काळातच हा नट ज्या सरावाने रंगमंचावर वावरतो तो सराव आणि विशिष्ट भूमिकेच्या लकबी निर्माण करण्याचा चाणाक्षपणा प्रशंसनीय आहे.

आनंदा नांदोस्कर यांना शिरीष कर्णिक आणि निर्मल देव यांनी चांगली साथ दिली.

तमाशाची संहिता निमित्तमात्र असते, ती स्वभावतःच ढिसाळ असते, हे लक्षात घेऊनही 'वर वर किस्ना समान' या मुक्तनाट्याची संहिता दोषास्पद वाटली. दिग्दर्शकांनी व नटांनीही तीवर फारसे संस्कार केलेले नसावे. त्यामुळे संपूर्ण प्रयोगाला काही निश्चित रूप येऊ शकले नाही. आनंदा नांदोस्कर आणि दिलीप कोल्हटकर यांच्यासारख्या मेहनती कलावंतांनी यापेक्षा अधिक विचारपूर्वक आपले प्रयोग योजणे आवश्यक आहे.

'उपासना' या नव्या नाट्यसंस्थेला पुढील कार्यक्रमासाठी शुभेच्छा! ◻

—पुष्पा भावे

# कामगार रंगभूमीचे बोलके दर्शन

पुण्याचे औद्योगिक ललितकला मंडळ ही कामगारांच्या कलाजीवनास प्रोत्साहन देणारी संस्था. या संस्थेने गेली दहा वर्षे कामगारांसाठी रांगोळी, चित्रकला, भजन आदी विविध स्पर्धा आयोजित करून कामगारांच्या कलागुणास वाव दिला आहे. ज्याला खऱ्या अर्थाने कामगार म्हणता येईल असा कामगारवर्गच ह्या स्पर्धांतून दिसून येतो. या संस्थेने आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धा हा एक देखणा, कामगार रंगभूमीचे दर्शन घडवणारा एक सांस्कृतिक उपक्रम होय. ह्या स्पर्धांमधून मात्र कामगारांबरोबरच वरच्या श्रेणीतील अधिकारीवर्गही नजरेस पडतो. कसेही असले तरी तो अधिकारीवर्ग औद्योगिक क्षेत्रातील असतो हे विसरता कामा नये. औद्योगिक अशांतता व दंगलीमुळे गतवर्षी ह्या स्पर्धा उशीराने पार पडल्या. यंदा 'बंद' व 'संपा'ची झळ ह्या स्पर्धांना लागेल अशी भीती होती. परंतु तसे घडले नाही ही सुदैवाची बाब. यंदाच्या स्पर्धेची प्रेक्षकांच्या दृष्टीने समाधानाची बाब म्हणजे ह्या स्पर्धा यंदा गावात झाल्या. काही वर्षे ह्या स्पर्धा गावाबाहेर सहकारनगर येथे घेतल्या जात. त्यामुळे रसिकांची निराशा व्हायची. त्याशिवाय सहकारनगरच्या खुल्या नाटचगृहातील ह्या स्पर्धा काही वेळा केवळ परीक्षक छत्रीत व प्रेक्षक पावसात अशा घडल्या आहेत. यंदा भरत नाटचमंदिरात ह्या स्पर्धा तीन दिवस झाल्या. दररोज चार ह्या हिशेबाने एकूण मराठी बारा एकांकिका सादर करण्यात आल्या. (दररोज चार एकांकिका पहाणं हे रसिक मनाला सुखद वाटले नसले तरी स्पर्धा लवकर उरकल्या ही बाब समाधानाची.) हिंदी एकांकिकांचा प्रस्तुत लेखात परामर्ष घेणार नसल्याने त्याबद्दल वेगळे नमूद करीत नाही.

'तुमचे आमुचे गाणे' ही टेल्को कलासागर 'ब' संघाची एकांकिका प्रथम पारितोषकाची मानकरी ठरली. ही एकांकिका पहाणे हा एक सुखद अनुभव होता. कामगारवर्ग किती गुणी असू शकेल याचे कल्पनेतून मांडलेल्या गणिताच्या उत्तरापेक्षा छान उत्तर ही एकांकिका पाहून मिळाले. रत्नाकर मतकरी ह्यांनी लिहिलेली ही एकांकिका. ही एकांकिका सादर करणारे दिग्दर्शक, कलावंताचे मी विशेष अभिनंदन करतो ते आणखी एका कारणासाठी. ते कारण म्हणजे आजपर्यंत पुरुषोत्तम करंडक, रोटरी क्लब वा अन्य स्पर्धांतून विशेष न सादर झालेली (किंबहुना कधीच न सादर झालेली) एकांकिका निवडून ती सादर केल्याबद्दल. सामान्यतः पूर्वी सादर झालेल्या. त्यातूनही बक्षीस लाभलेल्या एकांकिका निवडण्याकडे कल असतो. त्याचे एक-दोन फायदे असतात. ते म्हणजे मुळात ती एकांकिका ज्या पद्धतीने सादर केली. त्या पद्धतीचे दोष वगळून अनुकरण करणे सुलभ असते. या एकांकिकेबद्दल तसे नव्हते.

एकांकिकेची कथा तशी साधीसुधी. अगदी तुमची, आमची. सर्वसामान्यांची आहे. लग्नाच्या (बाजारात) बाबतीत वर, वधू ह्या दोन्ही पक्षाकडील मंडळी प्रथम फार मोठ्या अपेक्षा बाळगून असतात. पण प्रत्यक्ष व्यवहारात तडजोड करावी लागते. नोकरी नसलेली मुलगी पत्करली जाते. नवरा ऑफिसर आहे की कारकून, बॅरिस्टर आहे की तिसऱ्या श्रेणीत कॉलेजची वर्षे पार पाडलेला सामान्य माणूस इ. भ्रमाचे भोपळे फुटतात. शेवटी जसे जमेल तसे करवून घेतले जाते. त्याला सर्वजण मान तुकवतात. अशी असते तुमची आमुची कथा. तशीच कथा आहे एकांकिका 'तुमचे आमुचे गाणे' एकांकिकेची.

ह्या एकांकिकेला पारितोषक लाभले ते उत्कृष्ट टीमवर्क असल्यामुळे. खरं तर माधव कानविंदे ह्या कथानायकाची ही एकांकिका. रमेश भाटकरने त्याच्या सहजसुंदर अभिनयाने ती भूमिका सुरेखपणे वठवली. परंतु कारकून टायपिस्टपासून कंडक्टर, ड्रायव्हरपर्यंत; परिपार्श्वकापासून मुलगा आई ह्या भूमिकेतील सर्व पात्रांनी त्यांना यथायोग्य साथ दिली. प्रत्येकांनी स्वतःच्या भूमिकेचा तोल राखला. एखाद्या सर्कशीत आखून दिलेल्या रेषेवर पात्रांनी नेमून दिलेली कामे करावीत तसे ह्या एकांकिकेत घडले. एकांकिकेत मुक्तछंदात्मक काव्य किंवा सम्यक सताल गद्याच्या ओळी आहेत. संगीत दिग्दर्शक चंद्रशेखर गाडगीळ ह्यांनी संगीताची ही बाजू छानदारपणे सांभाळली. मात्र क्वचित प्रसंगी संगीताचा अधिक वापर झाल्याने लेखकाचे शब्द, त्याचा अर्थ प्रेक्षकांपर्यंत पोहोचायला अवघड झाले. पुढील प्रयोगात त्यादृष्टीने सुधारणा होणे अवघड जाणार नाही.

'बदाम राणी चौकट गुलाम' व 'उपाशी खलाशी' ह्या त्यानंतरच्या क्रमांकाच्या पारितोषक लाभलेल्या एकांकिका. गरवारे नायलॉन्स व ॲटलास कॉपको हे ह्या एकांकिचे सादरकर्ते. पद्माकर डावरे ह्यांची 'बदाम राणी' ही विनोदी एकांकिका सर्वश्रुत आहेच. खालसा झालेल्या एका संस्थानिकेच्या शिकलेल्या मुलीच्या विवाह जुळण्याविषयीची कथा एकांकिकेची आहे. मात्र त्यातील नाटच आहे त्या मुलीचे गंमत म्हणून खेडवळ मुलीच्या भूमिकेत. एकांकिका विनोदी असली का एक मोठा फायदा असतो. तो म्हणजे त्यातील संवादामुळे तरी प्रेक्षकांना आवडते, रुचते. तो फायदा 'बदाम राणी'च्या स्पर्धकांनादेखील लाभला हे निश्चित. परंतु म्हणून त्यांचा काही उणेपणा होता असे मुळीच नाही. दिग्दर्शक सुधाकर जोशी ह्यांनी एकांकिकेस दिलेली फार्सिकल ट्रीटमेंट, पात्रांनी त्यादृष्टीने केलेला अभिनय व सांघिक काम सारे ठीक होते.

'उपाशी खलाशी' एकांकिकेची गोष्ट अगदी त्याविरुद्धची. कथानक गंभीर. बरेचसे प्रतीकात्मक. त्यामुळे समर्थ दिग्दर्शक व कलावंताखेरीज अशी एकांकिका. उभी करणे अवघडच. कथा आहे तिघा उपाशी खलाशांची. तिघेही अशा ठिकाणी पोहोचले आहेत की त्यांना खायला काही नाही. शेवटी ठरते की तिघांपैकी एकाला मारून दुसऱ्या दोघांनी खायचे. पण मग मारायचे कुणाला? मग सुरुवात होते निवडणुकीला. प्रत्येकाचे पुढारी छाप भाषण. प्रत्येकजण आपण कसा सर्वश्रेष्ठ हे सांगण्याचा प्रयत्न करतो. सर्वश्रेष्ठ पापी माणसालाच जीवदान दिले जाईल असे सांगितले तर प्रत्येकजण आपणच कसा अधिक पापी हे सांगण्याचा प्रयत्न करतो तसे

पण उलट अर्थाने इथेही घडते. कोणाला मारायचे हे ठरतच नाही. मग तुझी आई जिवंत म्हणजे दोघापेक्षा तू वेगळा म्हणून तूच मरायला हवं असा निर्णय होतो. (तू नाही तुझ्या बापाने पाणी गढूळ केले असेल असे सांगून कोकराला मारणाऱ्या लांडग्याची कथा ह्या प्रसंगी आठवते.) परंतु तेवढ्यात त्या दोघांना काहीतरी खायला लागते. मग ते दोघे त्या अन्नावर अधाशासारखे तुटून पडतात. मित्रांची आठवण विसरतात असे हे कथानक. आजचे पुढारी, जनतेची त्यांना वाटणारी काळजी (?), माणसाच्या स्वार्थीपणाचे दर्शन असे बरेच काही ही एकांकिका सांगून जाते. विजय कुलकर्णी (२ खलाशी) ह्यांची अभिनयाची समज, तिचे प्रकटीकरण वाखाणण्यासारखे होते. अन्य दोघा खलाशांच्या भूमिकेतील पात्रांनी तशीच तोलामोलाची साथ दिली असती तर कदाचित निर्णय वेगळाच लागला असता.

ह्याशिवाय काही उल्लेखनीय एकांकिका म्हणून गजांचे जग (टेल्को), पुढारी पाहिजे (स्वस्तिक रबर), पूर्वज (डॉ. बेक) इ. एकांकिकेचा उल्लेख करता येईल. तर अतिशय टाकाऊ म्हणून पांगुळगाडा (कूपर इंजिनियरिंग लि. चा निर्देश करावा लागेल.

'पांगुळगाडा'च्या संदर्भात एक-दोन गोष्टींचा निर्देश करावा लागेल. तो म्हणजे त्यातील बहुतेकांचे पाठांतर कच्चे होते. विशेषत: त्यातील सय्यद नावाचे कलाकार दोनचार मिनिटे विंगेत जाऊन नक्कल पाहून येत होते हा तर मोठा विनोदच होता. आणखीही काही एकांकिकांतून पात्रांचे पाठांतर नसणे अशी सर्रास बाब आढळली. तेव्हा सादर होणारी एकांकिका किमान काही विशिष्ट दर्जाची आहे किंवा नाही हे पहाण्यासाठी प्राथमिक चाचणी स्वरूपात काही योजना आखता आली तर बरे होईल. ह्या दृष्टीने संस्थेने एकांकिका लेखनस्पर्धेत पुरेसे गुण न मिळाल्याने ते पारितोषिक कुणालाच दिले नाही हे अभिनंदनीय. अन्यथा आलेल्या एकांकिकेतील उडदामाजी ठरवून एखाद्या साधारण एकांकिकेला पारितोषिक दिल्यास त्यावरून त्या पारितोषकाचे मूल्यमापन होते. व पुस्तक प्रसिद्धीस अकारण संधी दिल्याचे आढळते. स्मरणिकेत कलाकारांची (इतकेच नव्हे तर वृत्तप्रतिनिधींना दिलेल्या माहितीच्या कागदावर भूमिकेचा उल्लेख न करता कलावंताची नावे असणे) नावे नसणे हे खटकते. हा उपक्रम लवकरच एक तप पूर्ण करीत आहे तेव्हा मामुली स्वरूपाच्या उणीवा दूर होतील ह्यादृष्टीने संयोजक प्रयत्नशील असावेत ही अपेक्षा.

—दत्ता श्री. टोळ

## जय पिक्पॉकेटिंग !

इंग्लंडमध्ये असा एक कालखंड होता, की जेव्हा खिसेकापूगिरी (Pick-poketing) महाभयंकर गुन्हा समजला जाई नि खिसेकापूला देहांताची शिक्षा सुनावण्यात येई. एवढी भयंकर शिक्षा असूनही खुद्द खिसेकापूंनाही त्याची जरब बसली नव्हती. उलट फाशी देण्याच्या सार्वजनिक प्रसंगी जमलेल्या बघ्यांच्या प्रचंड गर्दीवरच खिसेकापू आपल्या 'व्यवसायाचा' प्रयोग मोठ्या उत्साहाने करीत. अशा गर्दीतच अनेकांचं पिक्पॉकेटिंग होत असे.

दोन खिसेकापूंना फाशी देण्याचा 'सोहळा' पाहण्यास जमलेल्या गर्दीचे वेळी चाळीस खिसेकापूंना पकडण्यात आल्याची आठवण अमेरिकेचे प्रख्यात फौजदारी वकील बॅ. क्लारेन्स एस्. डॅरो यांनी नमूद केली आहे. इंग्लंडमधील 'न्यू गेट' तुरुंगाच्या एका प्रमुख अधिकाऱ्यानं सांगितलं आहे, 'एका खिसेकापूनं मला बोलून दाखविलं, की सार्वजनिकरित्या फाशी देण्याच्या वेळी जमणारी बघ्यांची तुफान गर्दी म्हणजे आम्हा खिसेकापूंना महान सुवर्णसंधीच ! (Executions were the best harvests he and his associates had.) कारण उघड आहे. बघ्यांचे डोळे गळफास लावलेल्या खिसेकापूकडे वर लागलेले असत तेव्हा त्यांचे खालचे पॅंटचे खिसे आम्हाला पिक्पॉकेटिंगचं आमंत्रणच देत असत... (When the eyes of the spectators are fixed above, their pockets are unprotected below,')

आहे का नाही बेडरपणाचा कळस !

'देहांताची शिक्षा यशस्वी झाली आहे का ?' या प्रश्नाला 'मुळीच नाही,' असं क्लारेन्स डॅरो यांनी उत्तर दिलं आहे. ते म्हणतात : Thou shalt not kill... I do not know where I learnt it, but I must have picked it up in some bad company, If it is wrong for a murderer to commit murder, is it not wrong for a state to set the example and also kill ?'

आता फाशीसारखी अखेरचीही शिक्षा नको (डॅरो यांच्या मतानं), तर समाजातील प्रचंड गुन्हेगारीला निपटून काढायला आणखी कुठली शिक्षा उरली आहे, याचं उत्तर तुम्ही-आम्ही द्यायचं आहे. ते जोपर्यंत सापडत नाही तोपर्यंत म्हणावं लागणार आहे, जय पिकपॉकेटिंग ! दुसरं काय ?

— चित्तरंजन घोटीकर

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. २५ ते ३१ मे ७४

### केंद्र मंत्रिमंडळात सत्ता स्पर्धेची लागण

भारताच्या लग्नी मिथून राशीत शनी-मंगळाची युती एप्रिल महिन्यात होऊन गेली आणि त्याचे भीषण परिणाम–आर्थिक व राजकीय–प्रथम रेल्वे संपाने प्रत्ययाला आले. रेल्वे संपाचा बोजवारा वाजला की सरकारने तो चिरडला याला फारसे महत्त्व नाही. लोक शाहीभगवान झाले व देशाची आर्थिक परिस्थिती अधिक गंभीर बनली. पहिल्या वर्षाची पंचवार्षिक योजना 'गलितगात्र' होणार आहे. रेल्वे संपाने निर्माण केलेला दुसरा परिणाम म्हणजे केंद्रीय-मंत्रिमंडळात सत्ता-स्पर्धा गुप्तपणे सुरू झालेली असेल. इंदिरा गांधी व ललित नारायण मिश्र यांच्यात वेबनाव निर्माण होणार असून इंदिराजी संपाच्या बाबतीत स्वतःचा भाव वाढवतील. रेल्वे मंत्री मिश्रा यांच्यावर 'अक्षता' टाकल्या जातील. ◻

### मेष : पैसा येईल–जाईल.

अंतरिक्षातील 'राजग्रह' रवी धनस्थानी विराजमान झाला आहे. धनस्थान हे एक कुटुंबस्थान आहे. तसेच धनस्थानदेखील आहे. हा रवी आपणाकडून लाखो रुपयांची उलाढाल निश्चितपणे घडवणार आहे. पण हाती भरमसाट पैसा येऊनदेखील तुमचा हात रिकामाच राहाण्याची शक्यता नाकारू नका. कारण बारावा गुरू ही एकच गोष्ट तुमच्याबाबतीत जरा चमत्कारिक बनली आहे. व्यसन, चैनबाजी अशा मोहात तुम्ही सापडण्याची शक्यता आहे. शनिवार, सोमवार ते गुरुवार या दिवशी सावध रहावे. सर्वसामान्य रोजच्या खर्चासाठी पैसा मिळेल. नोकरीत 'जैसे थे' परिस्थिती राहील. महिलांस : हौसेला मोल नसते अशा पद्धतीने वागणे टाळा. नोकरीत काळजी घ्या. ◻

### वृषभ : राजकीय नेतृत्व

या आठवड्यातील 'हिरो' म्हणून जर कुणाचा खास उल्लेख करावा लागेल तर तो फक्त तुमचाच. ग्रहराज रवी सध्या तुमच्यावर इतका खूश आहे की जे जे तुम्ही मनात आणाल ते ते तुमच्याकडून यशस्वी होईल. एकटा रवीदेखील तुमचे राजकीय नेतृत्व उंचावणार असून आजवर राजकारणात झालेली तुमची उपेक्षा व अनास्था भरून काढणार आहे. गुरूसारखा तेजस्वी ग्रह लॉटरी-रेससारख्या मार्गाने आर्थिक समृद्धी घडवून आणील. नोकरीत जिकरीचे व त्रासाचे दिवस आता इतिहासजमा झाले आहेत. नोकरी नसणाऱ्यांना ती मिळेल. स्वतंत्र अशा नव्या उद्योगाचे तसेच भागिदारीतून मुक्त होण्याचेदेखील यावेळी जमावे. महिलांस : व्यावसायिक प्रगतीला हा काळ अनुकूल आहे. नोकरीत देखील कामाचे चीज व्हावे. ◻

### मिथून : नोकरीत ताण

साडेसातीत सारेच काही वाईट घडते असे नाही. साडेसातीच्या जोडीला अंतरिक्षातील इतर ग्रहांचे जे तात्पुरते राश्यंतर वा स्थानांतर घडते त्यामुळेच जीवनावर त्या त्या काळापुरते बरेवाईट परिणाम घडत असतात. या आठवड्यात तुम्हाला रवी हा तेवढासा अनुकूल नाही. नोकरीत तुमच्या आजूबाजूला काय चालले आहे याची कटाक्षाने काळजी घ्या. बुधवार ते शुक्रवार या दिवसाची या दृष्टीने नोंद घ्यावी. कामाचा ताण एवढा विलक्षण वाढणार आहे की डोके वर होणे कठीण आहे. तुमची तक्रार कोणीही ऐकून घेणार नाही. व्यवसायात एवढे दिवस तसे काही वाईट नाही. नवे धाडस मात्र करू नये. तब्येतीला जपावे. महिलांस . फसवणूक होणार नाही इकडे लक्ष द्यावे. प्रसन्न मन ठेवण्याचा प्रयत्न करा. ◻

### कर्क : नव्या योजनेला वाव

बारावा शनी-मंगळ आहे म्हणून निराश होऊ नका अथवा हातपाय गाळून बसू नका. दोन ग्रह प्रतिकूल असले तरी इतर अनेक ग्रह अनुकूल आहेत. सुखस्थानी हर्शलसारखा एक चमत्कृतीजनक असा ग्रह आहे. रवी तुम्हाला मदत करायला उत्सुक आहेच. म्हणूनच सोमवार ते गुरुवार नव्या योजनेच्या कार्यक्रमासाठी प्रयत्न करा. पैसा व तांत्रिक असे दोन्ही प्रकारचे सहाय्य तुम्हाला होऊ शकेल. या वेळी एखाद्या 'भांडवलदार राजकारणी' व्यक्तीबरोबर तुमचा निकराचा संबंध यावा. नोकरी मात्र इमाने इतबारे करा. मनाची चलबिचल होऊ देऊ नका. नव्या नोकरीच्या शोधात राहून वरिष्ठांच्या मनात संशय निर्माण करू नका. पैशाची कमतरता भासणार नाही. महिलांस : हा आठवडा छान आहे, पैसा नोकरी उद्योग या सर्वच बाबतीत अनुकूलता आहे. ◻

### सिंह : थोडे दमाने घ्या

राशीस्वामी रवी तुम्हाला इतका छान आहे की या वेळी जे मनात असेल तेच घडेल. आशा, स्वप्ने, राजकीय महत्त्वाकांक्षा नव्या

योजना. लेखन कल्पना सारेच काही उत्स्फूर्तपणे साकार होण्यासारखे हे दिवस आहेत. तुमचा पिंड मुळातच राजकारणी आहे. सध्या जर तुम्ही राजकारणात मागे पडलेले असाल तर मंगळवारनंतर तुम्हाला मोठा योग येणार आहे. तुमच्या भोवती तुमच्या सल्ल्यासाठी लोक जमणार आहेत. एखादे महत्वाचे पददेखील तुमच्या गळयात पडले तर नवल वाटू नये. लॉटरीत लाभ आहे. उद्योगात थोडा त्रास आहे. नोकरीत बढती-बदलीची शक्यता. महिलांस : विवाहाचा बेत कुमारिकांनी लांबणीवर टाकावा. नोकरी नसल्यास ती मिळेल. ¤

**कन्या : शुभदाय दिवस**

शनीसारखा जबरदस्त चिकाटीचा व कर्तृत्ववान ग्रह दशमस्थानी असता तुम्ही उगीचच कुरकुरत बसावे याला काय म्हणावे ? शिवाय पराक्रमात राहूही आहे. या ग्रहाचे धर्म असे आहेत की, प्रामाणिक चिकाटीने काम करा. तुमच्या साऱ्या आशा सफल होतील. सारी उराशी बाळगलेली स्वप्ने बहरून येतील. नोकरीच्या दृष्टीने काही महत्त्वाचे बदल या आठवडयात घडून येण्याची शक्यता आहे. सोमवार, मंगळवार व शुक्रवार हे दिवस नोंद करून ठेवा. दुय्यम व्यवसाय तेजीत येईल. प्रवासाचा बेत लांबणीवर टाका व प्रकृतीला जपा. महिलांस : मनातल्या मनात कुढत बसण्याच्या स्वभावामुळे मानसिक स्वास्थ्य कमी. एरवी आठवडा ठीक. ¤

**तूळ : दूरचा प्रवास**

या आठवडयातील रवीचे भ्रमण म्हणज तुमच्या जीवनात एक प्रकारे नवे पर्वच निर्माण करणारे ठरणार आहे. प्रामुख्याने प्रवास घडण्याची तुमची अपेक्षा ध्यानीमनी नसताना पुरी होईल. कुणाच्या मनातील रम्यस्थळे पाहण्याची इच्छा पुरी होईल तर कुणाचे परदेशी जाण्याचे जमून जाईल. कारण ग्रहमान छान आहे. शनिवार ते बुधवार या दिवसाची मुद्दाम नोंद घ्या. नोकरी व्यवसायातील रेंगाळलेली कामे आता गती घेऊ लागतील. नोकरीत काही आकस्मिक शुभ घटना देखील घडण्याची शक्यता नाकारू नका. नोकरीत होत असलेला त्रास कमी होईल. एकतर मनासारख्या कामावर बदली होईल किंवा नोकरीत चांगला बदल होईल. शेती पदवीधर, वाणिज्य पदवीधर, सिनेसृष्टीतील तांत्रिक ज्ञान असलेले तंत्रज्ञ यांना मनासारखी नोकरी मिळेल. कोणताही स्वतंत्र उद्योग करू नका. तसेच चालू उद्योगातदेखील नवे धाडस करू नका. मूळची नाजूक तब्येत असेल त्याने जरा जपावे. महिलांस : पंचमस्थ गुरूमुळे अनेक शुभदायक गोष्टी घडतील. परीक्षेत यश.

**वृश्चिक : तब्येतीला जपा**

या आठवडयात आपणास रवी व हर्शल हे महत्त्वाचे ग्रह हवे तेवढे अनुकूल नाहीत. एक प्रेमाचा सल्ला द्यावासा वाटतो. आणि तो म्हणजे आपण काही दिवस आपल्या पत्नीला माहेरी पाठवा. त्यामुळे आपली तब्येत सुधारेल. संसारात काही कटुता निर्माण होईल असे नव्हे. पण तब्येतीच्या दृष्टीने आपणास मुद्दाम हा सल्ला दिला आहे. नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा फारसा वाईट नाही. कामाचा ताण कमी झाला नाही तरी नवी जबाबदारी अंगावर पडणार नाही. चालू नोकरीत बदलीचा संभव नाही. व्यवसायात जैसे थे परिस्थिती राहील. कारखानदारांना संपाचा त्रास नाही. महिलांस : तुम्ही लहान प्रमाणात कोणताही नवा उद्योग सुरू करू शकता तब्येतीला मात्र जपा. ¤

**धनू : संसारात त्रास**

सप्तमस्थानी शनी व मंगळाचादेखील त्रास आहेच. रवी तब्येतीला अनुकूल नाही. चिडखोरपणा, नैराश्य, उदासीनता याचा उद्भव स्वभावात वारंवार होईल. त्यामुळे मन सतत खिन्न राहील. घरी एकही गोष्ट मनासारखी होणार नाही. सारे इच्छेच्या विरुद्ध घडेल. आर्थिक परिस्थिती अजून काही काळ तरी घसरगुंडीला लागलेली थांबणे अशक्य आहे. कितीही पैसा मिळाला तरी तो पुरणार नाही. सोमवार, बुधवार व गुरुवार या दिवशी मात्र काही मनासारखे घडेल. प्रामुख्याने नोकरी व्यवसाय सुरळीत होईल. महिलांस : पतिराजांच्या तब्येतीची काळजी घ्या. नोकरीत काही सवलती मिळतील. ¤

**मकर : हट्टी बनाल.**

अनेक ग्रहांची तुम्हाला सध्या साथ मिळत आहे. शनी, रवी, मंगळ यासारखे समर्थ ग्रह तुमच्या सामर्थ्याच्या वाढीसाठी तत्पर बनले आहेत. त्यामुळे अनेक चांगल्या घटना घडतील. त्याप्रमाणेच तुमच्या स्वभावाच्या बाबतीत अनेक कटू घटनादेखील घडण्याची शक्यता आहे. शनीचा हट्टी व कणखर धर्म तुमच्या ठायी उग्ररूप धारण करील. त्यामुळे तुमच्या भोवतालच्या लोकांपासून तुम्ही दूर जाल. अनेक मित्रांना तुम्ही या वृत्तीमुळे गमावून बसाल. राजकारणपद वा सत्तेवर तुम्ही असाल तर हाताखालच्या माणसांना त्रास होणार नाही


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

**पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.**

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

याची काळजी घ्या. **महिलांस :** शनिवार सोमवार व मंगळवार पतिराजांबरोबर भांडण. पैसा मिळेल.

### कुंभ : कर्तबगारीला संधी

अंतरिक्षातील राशीपैकी सध्या विजयी असलेली रास म्हणजे कुंभ होय. या वेळचे ग्रहमान इतके छान आहे की आजवर उराशी बाळगलेली अनेक स्वप्ने साकार होण्यासारखी अनुकूल परिस्थिती यावेळी निर्माण होईल. व्यापारी क्षेत्रातील तुमची कर्तबगारी नवे रूप धारण करणार असून तुमच्या कर्तृत्वाने अनेक जण थक्क होऊन जातील राजकारणातील तुमच्या कौशल्याला एखादे नवे क्षेत्र उपलब्ध होईल. एखादे उच्च पददेखील तुम्हाला लाभेल. नोकरीत अनेक वर्षानंतर इतका छान काळ आला आहे की महत्त्वाची सूत्रे तुमच्या हाती आली तर आश्चर्य वाटू नये. **महिलांस :** नोकरीत चीज होईल. वरिष्ठ जागेवर बदली होईल. कुमारिकांचे विवाह ठरतील.

### मीन : आर्थिक समस्या

मीन ही गुरुची रास आहे. गुरु हा धर्म शिक्षण, विचारशक्ती, विवेकबुद्धी यांचा कारक ग्रह आहे. संपत्तीशी त्याचा एवढासा संबंध पोचत नसला तरी तो तुमच्या व्यय-स्थानी आहे हे विसरून चालणार नाही. कोणताही आर्थिक व्यवहार करताना काळजी घ्या. मोठ्या रकमेची उलाढाल करताना 'संरक्षक' म्हणून बरोबर योग्य व्यक्ती घ्यायला विसरू नका. बँक व ट्रेझरी येथे काम करणाऱ्यांनी ती विशेष काळजी घ्यावी. व्यापारी लोकांनीदेखील हे अवधान बाळगावे. नोकरी व्यवसाय व्यवस्थित चालेल. नोकरीत थोडाफार कामाचा ताण वाढेल. पण त्रास नाही. **महिलांस :** विवाह लांबणीवर पडला तरी निराश होऊ नका. कुलदेवतेची उपासना करा. □

---

## मुक्काम मुंबई : पृष्ठ ४ वरून

मध्ये आम्ही सोडून कुणीही नव्हते. इतर डब्यातही एकदोन हमाल किंवा बूटपॉलीशवाले. आम्ही चक्क ताणून दिली. पाच वाजता सुटलेली गाडी सव्वासहा वाजता कुर्ला स्टेशनात आली.

कुर्ला स्टेशनमध्ये तुफान धावाधाव. स्टेशनमास्तरची पळापळ. मोटरमनला हार घालणे वगैरे प्रकार. गाडी जवळ जवळ पंधरा मिनिटे स्टेशनात थांबली. या काळात गाडीतून कुणीही उतरले नाही की कुणीही गाडीत चढले नाही. स्टेशनवर पुन्हा आनौंसमेंट झाली. कुर्ला स्टेशनमधला सिग्नलचा दिवा हिरवा झाला. गाडी निघाली. पुन्हा तसेच. तेच प्रवासी घेऊन. प्रत्येक स्टेशनात गाडी थांबत होती. प्रवाशांची वाट बघत. पण कुणीच चढत नव्हते. शेवटी कंटाळून पुढल्या स्टेशनची वाट धरीत होती. होता होता शेवटी दादर स्टेशन आले. आम्ही झटपट खाली उतरलो. आमच्यापाशी तिकिट नव्हते. पण काही हरकत नाही. तिकिट तपासनीचाच पत्ता नव्हता. आम्ही स्टेशनच्या आरपार झालो. रेल्वेच्या 'भरून' जाणाऱ्या गाड्या ह्या अशा होत्या. □

प्रसंग दुसरा दिनांक : १६ मे. वेळ सं. ४ वाजता. स्थळ : माटुंग्यातल्या श्रद्धानंद रोडवरील श्रद्धानंदसदन. खाली गॅरेजवर 'सिव्हिक वेल्फेअर क्लब' असा बोर्ड. गॅरेजमध्ये इंदिरा गांधींचा एक प्लॅस्टरचा पूर्णाकृती पुतळा. पुढे टेबल खुर्ची. खुर्चीत आमदार श्रीमती कमला रामन ऐसपैस बसलेल्या. पुढे दोन तीन बायका आणि चार पाच पुरुष चमचेगिरीच्या पोझमध्ये. एक दोघे वार्ताहर येतात. कमलाबाई दिलखुलास हास्य देतात.

'मोर्चा कधी निघणार ?'

'थोड्या वेळात निघेल.' उत्तर.

'निदर्शक कुठं आहेत ?'

'येतील इतक्यात. शिवाय बरेच जमलेत.'

वार्ताहर बाहेर बघतात. तिथे पंधरा वीस बाया बापड्या बसलेल्या असतात. तेच निदर्शक.

'आता वाट कुणाची पाहाता ?'

'टी. व्ही. वाले यायचेत.'

'ते कधी वेळेवर यायचे नाहीत.' वार्ताहर.

'आम्ही आताच फोन केलाय.'

'तुम्ही निघा तर. ते वाटेत गाठतील.'

'नको उगाच रिस्क. थोडं थांबूच.'

शेवटी टी. व्ही. वाले येतात. त्यांचे आगत स्वागत होते. माटुंग्याच्या रेल्वे वर्कर्स कॉलनीवर मोर्चा जायचा असतो. संप मागे घ्या या मागणीसाठी. सतरा लाख रेल्वे कामगारांनी संप मागे घ्यावा अशी मागणी करण्यासाठी जेमतेम दीडशे लोक निघतात.

टी. व्ही. चा कॅमेरा मोर्चाचे शॉट घेत असतो. पुढून, मागून, इकडून, तिकडून कॅमेरावाला मोर्च्याच्या पुढे येतो. अग्रभागी असलेल्या कमला रामन मस्त हसतात. मोर्चा घोषणा देत पुढे पुढे जात असतो. पण त्यात दम नसतो. इतर वार्ताहर कंटाळून निघून गेलेले असतात.

मोर्चा कॉलनीजवळ येतो. टी. व्ही. चा कॅमेरावाला सामान आवरतो. त्यांची गाडी भुर्रकन निघून जाते. मोर्चाचा जणू प्राणच जातो. मरगळलेली माणसे कॉलनीत प्रवेश करतात.

तर अशी ही संपातली दोन दृश्ये. अशी दृश्ये अनेकांनी अनेक ठिकाणी पाहिली असतील. तशीच आम्हीही पाहिली. या संपाबद्दल अनेक तऱ्हांनी बोलले जातेय. राष्ट्रीय पातळीवरून, माणुसकीच्या दृष्टिकोनातून, व्यवहाराचा विचार करून, सर्वांगीण हित लक्षात घेऊन वगैरे.

पण आपल्याला दिसले ते हे असे आहे. बाकी... नो कॉमेंट्स.

—भारतकुमार राऊत, १६ मे १९७४

---

रेल्वे संप परिस्थितीमुळे दि. १८ मे १९७४ चा साप्ताहिक माणूसचा अंक प्रसिद्ध होऊ शकला नाही. ग्राहक-वर्गणीदारांनी कृपया नोंद घ्यावी. —व्यवस्थापक.

# अर्थव्यवस्था कोलमडूद्याच : पृष्ठ ३ वरून

केवळ त्याच्या मालाच्या किमती वाढवून हे साधणार नाही. कारण त्याच्या मालाच्या किमती वाढवल्या तर पक्क्या मालाच्या किमती वाढतील. व शेतकरी हाही ग्राहक असल्याने तो बाजारात खरेदी-साठी जाईल तेव्हा त्याला वाढीव किमत मोजावी लागेल ! शेत-मालाच्या किमती वाढवून देऊन शेतकऱ्याचा फायदा होणार नाही तर त्याला शेतीसाठी लागणारी साधने कमीत कमी खर्चात उपलब्ध केली पाहिजेत. सरकारकडे वाटपव्यवस्था असेल तर सरकारला किमती निश्चित करता येईल. वाटप सरकारकडे येण्यासाठी मालही सरकारकडे आला पाहिजे. त्याकरता सरकारला कडक निर्बंध घालावे लागतील. शेतकऱ्याला त्याच्या जीवनासाठी लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करण्याची हमी सरकारने घ्यावी, त्याच्या मुलांच्या संपूर्ण शिक्षणाची, आरोग्याची जबाबदारी स्वतःवर घ्यावी. या बदल्यात त्याच्या सर्व मालाची खरेदी करावी. त्याची गरज सरकार वाजवी दरात भागवू लागले की पिकलेला माल स्वतःसाठी, स्वतः-जवळ ठेवण्याची गरज त्याला भासणार नाही.

शेतमालाच्या किमती दलालांमुळे, वाटप व्यवस्था सरकारकडे नसल्याने वाढतात. वाटप सरकारकडे आले की कच्च्या मालाच्या किमती वाढणार नाहीत. त्यामुळे पक्क्या मालाच्या किमतीवरही परिणाम होईल. उत्पादन खर्चाच्यापेक्षा थोडचा अधिक परंतु निश्चित प्रमाणात पक्क्या मालाच्या किमती ठरवल्या जाव्यात. त्यामुळे नफ्याचे प्रमाण मर्यादित होईल. याचा परिणाम ग्राहकाला वाजवी भावाने वस्तू मिळतील. सरकारला पक्का माल दिला तर कारखानदारांच्या नफ्यात प्रमाणशीर परंतु किमतीवर परिणाम होणार नाही अशा पद्धतीने वाढ करावी. यामुळे वाटपासाठी सर-कारच्या ताब्यात काही प्रमाणात माल येईल. किमतवाढ रोखण्या-साठी सरकारला हा माल बाजारात काढता येईल.

जीवनावश्यक वस्तूंच्या किमती स्थिर ठेवून त्याच्या प्रमाणात वेतन निश्चित करावे. किमती स्थिर राहिल्या की वेतनवढीची मागणी होणार नाही. मालाच्या किमती, कारखानदारांचे नफे निश्चित केल्यावर मग वेतनही निश्चित केले जावे. वेतना-वेतना-तील फरक अफाट प्रमाणात ठेवला जाऊ नये. वेतनाचे प्रमाण निश्चित करताना शेतकऱ्याला मिळणाऱ्या उत्पन्नाशी ते निगडित करावे. उद्योगक्षेत्रात उत्पादन वाढ होण्यासाठी उत्पादनवाढीवर बोनस ठेवला जावा. किंवा किमतीवर परिणाम होणार नाही अशा पद्धतीने कामगारांना इन्टेसिव्ह द्यावा. शेतीच्या उत्पादन वाढीसाठी अशाच प्रकारचा उपाय योजावा ! शेतकऱ्याने उत्पादनवाढ केली तर त्याला शेतीसाठी लागणाऱ्या साधनाची उपलब्धता आणखी कमी खर्चात करून द्यावी. आज शेतीपेक्षा नोकरी बरी, ती शाश्वत अधिक पैसा देणारी आहे असे शेतकऱ्याला वाटते. त्याऐवजी शेती नोकरीपेक्षा चांगली वाटण्याजोगी परिस्थिती निर्माण करावी. शेत-मजुराला जमिनीचा मालक करण्याचा प्रामाणिक प्रयत्न झाला पाहिजे. बागायती पिके व अन्यधान्य किमती यांचीही सांगड घालून नगदी पिके गरजेच्या प्रमाणात होतील याची दक्षता घेतली जावी.

शेतकऱ्याला शेतीसाठी व त्याच्या जीवनासाठी लागणाऱ्या वस्तूंची हमी मिळाली की, त्याच्या मालाला किमती वाढवून देण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. त्यायोगे पक्क्या मालाच्या किमती स्थिर होतील. नफे मर्यादित केल्यानेही किमती वाढणार नाहीत. किमत वाढ झाली नाही म्हणजे वेतनवाढ करावी लागणार नाही.

आता प्रश्न आहे तो समान कामासाठी समान वेतनाचा ! आजच्या परिस्थितीने समान वेतन करायचे म्हणजे ज्यांचे पगार कमी आहेत त्यांचे वाढवावयाचे ! ते या परिस्थितीत शक्य होणार नाही. ज्यांचे पगार जास्ती आहेत त्यांचे कमी करून वेतनाचे प्रमाण समान करता येणार नाही. वर सुचवलेले उपाय अमलात येतील तेव्हा वेतनाचे तत्त्व नव्याने निश्चित करता येईल. शास्त्रशुद्ध पाया-वर वेतन निश्चित करणे त्यावेळीच शक्य होईल.

## खर्चावर मर्यादा

किमतवाढ होण्याला काळा पैसाही कारणीभूत आहे. तो काढ-ण्यासाठी प्रथम नोटा बदलण्यासारखे उपाय योजले पाहिजेत. उद्योगपतीकडेच काळा पैसा आहे असे नव्हे. त्यांच्याकडे तो उफाट आहे. सरकारच्या व्यवस्थेने नोकरशाहीकडे काळा पैसा आहे नोकरशाहीकडे लाचलुचपतीमुळे काळा पैसा जमा होत आहे. य पैशामुळे किमतीचा विचार न करता खरेदी होते. व त्याने किमती वाढतात. काळा पैसा निर्माण होऊ द्यावयाचा नसेल तर उत्पन्नावर जशी मर्यादा घातली गेली तशी खर्चावरहीमर्यादा घातली पाहिज. खर्चावर मर्यादा आल्याने काळा पैसा खर्च करण्यावर मर्यादा पडेल. व पैसा खर्च करायला वाव नाही तर पैसा कशाला केला जाईल ?

अर्थव्यवस्था कोलमडल्यावर जी परिस्थिती निर्माण होईल त्यातून मार्ग काढण्यासाठी हे उपाय योजावे लागतील. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आल्याने त्यांना जनतेचा विरोध राहाण्याची शक्यता कमीच. पण यासाठी प्रथम अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली पाहिजे. सध्या जे उपाय चालले आहेत ते जुन्या वाड्याची डागडुजी करावी तसे आहेत. कोसळू लागलेला वाडा डागडुजीने कोसळण्याचा थांबणार नाही. तो पूर्णपणे कोसळल्यावरच तेथे नवी वास्तू बांधता येईल !

## राष्ट्रीय सरकार

ज्यांना अन्न, वस्त्र, निवारा नाही, त्याच्या या गरजा भागविण्यासाठी आहेरेवाल्यावर काही निर्बंध घालावेच लागतील. वर ज उपाय सुचवण्यात आले त्याच्या अमलबजावणीच्यावेळी निर्बंधही अपरिहार्य होणार आहेत. पण नाहीरेवाल्यांना देण्यासाठी उपाय योजण्यात येतात त्यावेळी मूलभूत हक्कांची ढाल पुढे करून काही पक्ष अड-थळे निर्माण करतात ! ज्यांच्याजवळ आहे ते टिकवण्यासाठी वा वाढवण्यासाठी मूलभूत हक्कांचा आधार घेतला जातो. उजवे पक्ष त्याबाबतीत आघाडीवर असतात. त्यामुळे त्यांचा अशा विचारांना, उपायाना विरोध राहण्याची शक्यता नाकारून चालणार नाही.

चीनमधील पक्षपद्धतीनुसार पक्षाची बांधणी बांधून हे उपाय अंमलात आणणे त्वरीत शक्य होईल की ज्यांचा या उपायांना विरोध नाही त्या सर्व पक्षांचे राष्ट्रिय सरकार स्थापून त्यांची अंमलबजावणी करता येईल? नव्या पक्षाची उभारणी करून वरील उपाय अंमलात आणतो म्हटले तर ते काळाची गती गाठणारे होणार नाही. यासाठी आर्थिक आणीबाणीत दुसराच पर्याय संभवतो. सर्व पक्षांनी हे निर्णय घेतले की त्याच्या अंमलबजावणीत त्यांचा विरोध राहाणार नाही. अशासारख्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करावयाची झाल्यास एका पक्षाच्या मागे सारी जनता उभी राहाणारी असावी लागेल. आणि जनता जर अनेक पक्षांच्या मागे विभागली असेल तर निश्चित कार्यक्रमाच्या आधारावर त्या पक्षांचे सरकार स्थापून सर्व पक्षांना सत्तेत सहभागी करून घेण्याने अंमलबजावणी होऊ शकेल! अशा वेळी उजव्या पक्षांनाही त्यांची धोरणे बदलावी लागतील! उदाहरण द्यावयाचे झाल्यास जनसंघाचे देता येईल! जनतेला डाव्या विचारांचा कार्यक्रम हवा आहे. ती त्या विचारांच्या मागे जात आहे असे पाहून संपूर्ण डावी विचारसरणी नसली तरी काही प्रमाणात जनसंघाला कागदोपत्री तरी का होईना आपला चेहरा बदलावा लागत आहेच ना! जनसंघ आपल्या बरोबर जनतेला घेऊन जाण्याऐवजी जनतेच्या बरोबर तो चालला आहे. तसा प्रयत्न तो करीत आहे म्हणूनच जनसंघ स्थापनेच्या वेळची त्याची जी धोरणे होती व आजची त्याची धोरणे यात अंतर पडत चालले आहे. हा जनसंघाच्या धोरणाचा विजय म्हणता येणार नाही, तर जनतेने त्यांची फरफट चालवली आहे. तसेच वरील उपायावर आधारित कार्यक्रमाच्या बाबतीत उजव्या पक्षांचे होईल! अर्थात अशा प्रकारचे राष्ट्रीय सरकार प्रदीर्घ काळ चालणार नाही. आर्थिक घडी स्थिरस्थावर झाल्यावर आणखी प्रगतीच्या प्रश्नांवर ते विघटीत होतील!

अशा सरकारला कोणत्या उत्पादनावर भर द्यावा हेही ठरवावे लागेल. मोटारींच्या कारखान्यांना प्राधान्य द्यायचे? की ट्रक टेंपो यांना प्राधान्य द्यायचे? चैनीच्या वस्तूंच्या निर्मितीवरील भर बाजूला ठेवावा लागेल! आणि गरजेच्यावस्तूवर भर द्यावा लागेल.

अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडून अराजकाची परिस्थिती येईल त्याचवेळी यासारखे विचार करण्यास नेते मंडळी प्रवृत्त होतील. म्हणून अर्थव्यवस्था कोलमडली पाहिजे. ती कोलमडू द्याच एकदा!

□ □

# मराठवाडा अद्याप शांत झाला नाही

दि.: १३ मे १९७४

स्थळ: नांदेड म्युनसिपल डाक बंगल्यातील विद्यार्थी कृती समितीचे कार्यालय.

वेळ: भर दुपारचे १२ वाजलेले. (खाली तापलेली जमिन व वर श्वास नांदेडी उन्हं.)

–तापलेल्या डोक्याचे पण विविध रंगी कपडे घातलेल्या तरुणांचे घोळके जमत आहेत. गुरुशर्ट बेलबॉटमपासून तो फेटा बांधलेल्या सरदारजीपर्यंत अनेक पोरे जमली आहेत. उन्हाप्रमाणेच वातावरण गरम. धुसफुस चालूच आहे; का, तर मराठवाडा विकास आंदोलन मागे घेण्यात आल्याची अचानक झालेली घोषणा. जवळजवळ सर्वच विद्यार्थी, 'विद्यार्थी कृती समिती'च्या नेत्यांना जाब विचारण्यासाठी आलेले. पदरात कुठलीच मागणी पडली नसताना केवळ आश्वासनावरच आंदोलन मागे का घेतले? विद्यार्थी समन्वय समिती किंवा जनता विकास परिषदेला हा अधिकार कुणी दिला? ह्या संबंधीची चर्चा चालू होती. विद्यार्थ्यांचा प्रत्येक घोळका आपापल्या परीने कारणांचा शोध घेत होता. एका बाजूला युक्रांदचा अरविंद देशपांडे व त्याचे मित्रमंडळ आंदोलन थांबविण्याच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी तयारीने आले होते. शिख स्टुडंट असोसिएशनचा वेदी व गुरुचरण फियाटमध्ये आपल्या मित्रांना घेऊन आला होता. तात्काळ वि. कृ. स. नेते प्रा. गावंडे यांना फोन लावण्यात आला. बैठकीस हजर राहण्याचे फर्मान सुटले. मला वाटले गावंडयांची चांगलीच कंबख्ती भरली...हाश... हुश...एकूण वातावरण तंग होते.

रघ्या पंडुरेबरोबर उदय जोशी (दोघेही नांदेडचे पण शिकायला औरंगाबादला असतात. परीक्षा बंद पाडून आले.) पिवळ्या गुरुशर्टात दिसला. त्याला म्हणालो–

–इकडे कुठे–

–मिटींगला. अवसानघातकी साले. उगाच आंदोलन थांबविले. आम्ही झक मारली आणि परीक्षा बुडवल्या.

उदय जोशी एकदम संतप्त. (M. Sc. प्रिव्हियसचा रात्रभर जागून केलेला अभ्यास चक्क बुडवून आला होता ना!)

–आयला आपण तर ह्या विद्यार्थी नेत्यांना जोडे मारणार. परीक्षा बुडवून, स्वतःचं नुकसान करून आम्ही आंदोलनात पडलो आणि ह्यांनी केवळ पोकळ आश्वासनावर आंदोलन मागे घेतले.

उदयचे म्हणणे बरोबर होते. आंदोलने थांबण्याचे कारण त्याच्या मते–काही नाही हे विद्यार्थी नेते नाईकांना विकले गेले आहेत. साल्यांनी बैठकीत सहा हुतात्म्यांचे बळी विसरून पाटर्या झोडल्या. आम्ही गोळ्या खाऊन मेलो तर ह्यांच्या बापाचे काय जाणार–

–अशीच कडवट प्रतिक्रिया–अनेकांची. केवळ पोकळ आश्वासनांवर आंदोलन मागे घेतल्याबद्दल तरुण वर्गात संतापाची लाट.

–थोडयाच वेळात विद्यार्थी नेते गर्जे, देशपांडे वगैरे आले. ताबडतोब बसाबस झाली व बैठकीला सुरुवात झाली. बैठकीस परभणीचे चारठाणकर व हिंगोलीचे दोन विद्यार्थी उपस्थित होते. बैठकीचे अध्यक्षस्थान सर्वानुमते परभणीच्या चारठाणकर यास देण्यात आले.

–आता बैठक चांगलीच रंगणार असे दिसू लागले. अनेक विद्यार्थी, विद्यार्थी नेत्यांची 'हजेरी' घेण्याच्या तयारीने आले होते.

प्रारंभी विद्यार्थी नेते गर्जे यांनी विद्यार्थ्यांना विश्वासात न घेता एकाएकी आंदोलन मागे घेण्यात आल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले व चारठाणकरला परभणीतील परिस्थितीबाबत निवेदन करण्यास सांगितले. (नांदेड-परभणीत नेहमीच असा सुसंवाद असतो.)

–चारठाणकरने परभणीच्या विद्यार्थ्यांचा आंदोलन थांबविण्यास

विरोध असल्याचे सांगितले. विद्यार्थी समन्वय समितीचा परभणीचा सदस्य विजय गव्हाणे याने मुख्यमंत्र्यांच्या चर्चेतून सभात्याग केला असल्याचेही त्याने सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या पोकळ आश्वासनावर आंदोलन मागे घेणाऱ्यांची संभावना त्याने 'मुख्यमंत्र्यांचे चमचे' अशी केली.

त्यानंतर हिंगोली व वसमत येथील विद्यार्थ्यांनीही दोन्ही ठिकाणी आंदोलन थांबले नसून जोरात चालू असल्याचे सांगितले. आता मात्र विद्यार्थ्यांना हायसे वाटले व नेत्यांच्या 'हजेरी' चा सूर मावळला. आंदोलन चालू ठेवण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. परत एकदा नव्याने ठराव मांडण्यात आले. त्यात महत्त्वाचा ठराव म्हणजे 'प्रत्येक मंत्री, आमदार खासदार यांना आता आपल्या पदाचे राजीनामे देऊनच आंदोलनात यावे लागेल.' असा होता. तो टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात पार पडला.

दुसऱ्या ठरावाद्वारे मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीत, मुख्यमंत्र्यांना फितूर झालेल्या सूर्याजी पिसाळ विद्यार्थ्यांचा निषेध करण्यात आला. (यातले बरेच काँग्रेसी आमदारांचे चिरंजीव होते म्हणे.) त्यांनी सहा हुतात्म्यांच्या प्रेतावर बसून बियर पार्टी झोडल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

दि. १७ रोजी आंबेजोगाई येथे भरणाऱ्या बैठकीस ट्रक भरून विद्यार्थी पाठवायचे असेही ठरले.

कुण्यातरी, वा. ह. कल्याणकर नावाच्या पोरीने म्हणे ७५ टक्के विद्यार्थी परीक्षेस बसण्यास तयार असल्याचे कुलगुरु नाथ यांना सांगितले त्याबद्दल अतिशय कडवट प्रतिक्रिया व्यक्त झाली.

अजून बरेच ठराव पास झाले. आंदोलन तात्काळ तीव्र करण्याचे ठरले. बैठकीच्या मध्यातच गावंडे आले. प्रा. गावंडे हे विद्यार्थी कृती समिती व जनता विकास परीषद दोन्हीचे नेते आहेत (वा ! एकाचवेळी दोन्हीकडे हात.) ते मुंबईला शिष्टमंडळात गेले होते. सुरुवातीला बरेच विद्यार्थी त्यांच्याकडे नाराजीने पाहत होते.

प्रा. गावडे यांना मुंबई येथे घडलेल्या घटनांचा वृत्तांत सादर करण्याची विनंती केली गेली.

—गावंडे यांचा मुंबई वृत्तांत म्हणजे एक भयंकर कटु सत्य होते. समन्वय समितीवर निवडून देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या गद्दारीचा तो एक प्रचंड पुरावा होता. मुख्यमंत्र्यांच्या काळ्या डावपेचाचा तो एक एक पाढा होता. दि. ६ रोजी नांदेड येथे होणारी जनता विकास परिषद व विद्यार्थी कृती समिती यांची बैठक होऊन त्यात काही ठरण्याआधीच मराठवाड्याच्या (ठराविक 'शिष्ट' असणाऱ्या) शिष्टमंडळास बोलावून आंदोलन फोडायचा त्यांचा कावा होता व तो यशस्वी झाला. अचानक ठरलेल्या या बैठकीमुळे जनता विकास परिषद व वि. कृ. समिती यांना काहीच निर्णय घेता आला नाही. शेवटी मुख्यमंत्र्यांच्या चर्चेनंतर विद्यार्थी समन्वय समिती जो निर्णय घेईल त्यामागे उभे रहायचे असे ज. वि. परिषदेने ठरविले. अपुऱ्या वेळात व घाईघाईने मुंबईला पोहोचलेल्या नांदेडच्या विद्यार्थ्यांनी परिस्थितीचे अवलोकन केले असता त्यांना असे आढळून आले, की समन्वय समितीचे कित्येक विद्यार्थी सदस्य विविध मंत्र्यांच्या (जे नाईकसाहेबांच्या मर्जीतले आहेत) मोटारीतून हिंडत आहेत. नांदेडच्या विद्यार्थ्यांना आता मात्र आंदोलनाचे भवितव्य अंधःकारमय दिसू लागले तात्काळ नांदेडच्या काही पोरांनी समन्वय समितीच्या सदस्यांना घेराव टाकला व मुख्यमंत्र्यांच्या चर्चेवरचा निर्णय केवळ मराठवाड्यातच जाहीर करावा अशी मागणी केली व त्या मागणीवर सही घेतल्यानंतरच हा घेराव उठविण्यात आला. (गावंडे यांनी ही माहिती सांगताच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. नांदेडच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व समन्वय समितीच्या तथाकथित नेत्यांचा निषेध करण्यात आला.) तरीही पण समन्वय समितीच्या नेत्यांनी आधीच ठरल्याप्रमाणे आंदोलन मागे घेण्याचा निर्णय मुंबईतच जाहीर केला.

मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत विद्यार्थी जाताच त्यांनी विद्यार्थी नेत्यांना 'आपल्या सारखे वीर तरुण असताना मराठवाडा मागास कसा राहील' असा मस्का लावताच हे तथाकथित नेते हरकून गेले. पलिकडच्या साईडने ना. कल्याणराव पाटील ५५५ सिगरेटचे झुरके (४ रु. चे पाकीट) घेत विद्यार्थ्यांना सांगत होते, की आम्ही तुमच्या मागण्या पूर्वीच मान्य केल्या आहेत. आता निघून जा. (असून मसून शंकरराव चव्हाण व नांदेडच्या विद्यार्थ्यांना शिव्या !

विकास परिषदेच्या नेत्यांनी विचारलेल्या प्रश्नाला मुख्यमंत्र्यांची उत्तरे तऱ्हेवाईक होती. म्हणजे अगदी बोलक्या शंखासारखी. उदाहरणादाखल नेते आम्हाला ८० टक्के नोकऱ्या हव्यात.

मुख्यमंत्री : १०० टक्के घ्या ना ! (सामच्या बापाचं काय जातय, असा सूर)

नेते : किमान माणशी १२ किलो धान्य द्यावे.

मुख्यमंत्री : माझं मत २० किलो धान्य द्यावे असे आहे.

—मंत्रीमहाशयांच्या असल्या तऱ्हेवाईक उत्तराने विकास परिषदेचे सर्वच नेते कपाळावर हात मारून बसले. ह्या तऱ्हेवाईक उत्तरानंतर आधिच ठरल्याप्रमाणे विद्यार्थी समितीच्या नेत्यांनी उतावळेपणाने आंदोलन मागे घेतल्याचे पत्रक काढले व विकास परिषदेच्या गोविंदभाई श्रॉफ प्रभृतींना त्यामागे गुपचूप रहावे लागले

पोरांना खरी वस्तुस्थिती कळली. गावंडे-श्रॉफ यांच्यावरचा राग थंड झाला. पण तरी डोकी मात्र भडकली होती. नाईकसाहेब आमच्याशी 'चाल चालले' अशी भावना निर्माण झाली. यापुढे सुर्याजी पिसाळ विद्यार्थ्यांना नांदेड बंद करण्याचे ठरले.

—आत्ता नांदेड जसेच्या तसे पेटलेले आहे. विद्यार्थी समन्वय समितीचे नेतृत्व विद्यार्थ्यांनी अमान्य केले आहे. आतापर्यंत आंदोलनात नांदेडची पोरे शांतपणे भाग घेत होती. आता मात्र त्यांची डोकी संतापाने भडकली आहेत. मुख्यमंत्री व तथाकथित नेत्यांनी फसवल्याची त्यांना जाणीव झाली आहे.

विजय गव्हाणे व चारठाणकर यांनी परभणी जिल्हा आंदोलनात असल्याचे जाहीर केले आहे. बिड येथेही आंदोलन तिव्रच आहे.

विकास कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीशिवाय आंदोलन मागे घेतले जाणार नाही असा निर्णय घेतला गेला आहे. तिकडे कुलगुरू नाथ पुन्हा परीक्षा घेण्याचा निष्फळ प्रयत्न करीत आहेत. तोही हाणून पाडायचे ठरले आहे.

—मराठवाडा अद्याप शांत झाला नाही, तेथली आग आता वेगाने पेट घेत आहे.

—दिवाकर देशपांडे, नांदेड

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर